



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार ७ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





## उमेदवार देण्याचा काँग्रेसचा अधिकार



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अजित पवारांच्या अकाली निधनामुळे आम्हाला दुःख आहे, त्यामुळे पवार कुटुंबप्रमुख म्हणून बारामतीची निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला असं वक्तव्य ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केलं. काँग्रेसने बारामतीमध्ये उमेदवार देण्याचा निर्णय घेतला, तो त्यांचा अधिकार आहे असंही शरद पवार म्हणाले. तसेच काँग्रेस पक्षावर वक्तव्य करण्याइतपत परिपक्वता पार्थ पवार यांच्याकडे आहे की नाही याची माहिती नाही असंही शरद पवार म्हणाले. अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादीच्या नेत्या आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अर्ज भरला. शरद पवारांच्या पक्षाकडून बारामतीमध्ये उमेदवार देण्यात आला नाही. परंतु महाविकास आघाडीचा घटकपक्ष असलेल्या काँग्रेसने मात्र त्यांच्या उमेदवार उभा केला आहे. या सगळ्यांवर शरद पवारांनी त्यांची प्रतिक्रिया दिली. (पान २ वर)

## आता पत्त्याच्या पुराव्याशिवाय ५ किलोचा सिलिंडर मिळेल



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मध्य पूर्वेकडील वाढता तणाव आणि पुरवठा साखळीतील अडचणींच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने ५ किलो वजनाच्या एलपीजी सिलेंडरच्या विक्रीचे नियम सोपे केले आहेत. आता कोणतीही व्यक्ती पत्त्याच्या पुराव्याशिवाय छोटा गॅस सिलेंडर खरेदी करू शकेल. पेट्रोलियम मंत्रालयाच्या मते, हे पाउल स्थलांतरित मजूर आणि ज्यांच्याकडे शहरात कायमस्वरूपी पत्ता नाही अशा लोकांसाठी उचलण्यात आले आहे. आता ग्राहकांना अधिकृत वितरकाकडे जाउन फक्त आपले कोणतेही एक फोटो-आयडी दाखवावे लागेल आणि ते लगेच सिलेंडर घेउ शकतील. मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, ५ किलो वजनाच्या फ्री ट्रेड एलपीजी (FTL) सिलेंडरसाठी आता अनेक कागदपत्रांची गरज नाही. ग्राहक आधार कार्ड, पॅन कार्ड आणि मतदार ओळखपत्र यांसारखी कागदपत्रे दाखवून सिलेंडर घेउ शकतात. (पान २ वर)

## कुंभमेळ्यातील IIT यन बाबाचं शुभ मंगल सावधान



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** प्रयागराज महाकुंभमेळ्यातून अनेक जण प्रकाशझोतात आले होते. व्हायरल गर्ल मोनालिसानंतर IIT बाबा अर्थात अभय सिंह देखील प्रकाशझोतात आला होता. अभय सिंहचे व्हिडीओ सोशल मीडियात व्हायरल झाले होते. त्याची लाइफ स्टोरीही काही प्रमाणात रंजक होती. अशातच अभय सिंह पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. परंतू, सध्या चर्चेत येण्यामागचं कारण वेगळं आहे. माहितीनुसार, IITan बाबानं लग्न केलं असल्याची माहिती आहे. ब-याच दिवसानंतर अभय सिंग आपल्या पत्नीसोबत ६ एप्रिल रोजी हरियाणातील झज्जर येथे दिसला होता. त्यानं सांगितलं की, दोघांनी १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीच्या मुहूर्तावर हिमाचल प्रदेशातील अघंजर मंदिरात लग्न केले होतं.यानंतर १९ फेब्रुवारी (पान २ वर)

## काँग्रेसला तोंड दाखवायला जागा राहणार नाही, असा पराभव करु



**पुणे/प्रतिनिधी :** बारामती पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसवर जोरदार निशाणा साधत आक्रमक भूमिका मांडली. बारामतीत काँग्रेसने निवडणूक लढवू नये. जर लढलीच तर त्यांचा असा पराभव करू की त्यांना तोंड दाखवायला जागा राहणार नाही, असा थेट इशारा त्यांनी काँग्रेसला दिला आहे. बावनकुळे यांनी अजित पवार यांच्या राजकीय प्रवासाचा संदर्भ देत काँग्रेसला भावनिक साद घातली. अजित दादांचा बहुतांश राजकीय काळ काँग्रेससोबत गेला आहे. त्यांचे संबंध, सहवास (पान २ वर)

# संपूर्ण बारामती माझं कुटुंब

## अजित दादांच्या आठवणीत सुनेत्रा पवार भावूक



**बारामती/ प्रतिनिधी-** अजित पवारांच्या निधनानंतर सुनेत्रा पवारांनी बारामती पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरण्यापूर्वी भावूक आवाहन केले. फक्त पार्थ आणि जय नाही, तर संपूर्ण बारामती माझं कुटुंब आहे, या त्यांच्या विधानाने उपस्थितांना गहिवरून आले. अजितदादांचा वारसा पुढे नेण्याचे आश्वासन देत, त्यांनी बारामतीच्या विकासाची प्रतिज्ञा केली. त्यांच्या या हृदयस्पर्शी शब्दांनी महाराष्ट्राच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी लगेच उपमुख्यमंत्रीपदाची कमान हाती घेउन पक्षाची सुत्रेही हाती घेतली. अजितदादा नेहमी जनतेच्या सेवेत मग्न असायचे. त्याच पावलावर पाउल ठेवून सुनेत्रा पवार यांनीही स्वतःला जनसेवेत झोकून दिले. नागरिकांच्या समस्या सोडवण्यावर त्यांनी भर दिला. आता त्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीला सामोरे जात आहेत. या निवडणुकीचा अर्ज भरण्यापूर्वी त्यांनी बारामतीकरांना संबोधित केलं. दादा गेल्यानंतर पहिल्यांदाच त्यांनी बारामतीकरांना संबोधित केले. यावेळी बोलताना त्यांचा कंठ दाटला होता. त्यांना गहिवरून आले होते. कंठ दाटलेला असतानाच त्यांनी एक विधान केले. त्याने केवळ बारामतीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेच्या डोळ्याच्या कडा पाणवल्या. त्या म्हणाल्या, फक्त पार्थ आणि जय माझं कुटुंब नाही. तर संपूर्ण बारामतीकर माझं कुटुंब आहे. त्यांनी हे वाक्य उच्चारताच अनेकांच्या मनात घालमेल झाली अन् डोळ्यात टचकन पाणी आलं. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २८ जानेवारी रोजी बारामती येथे विमान अपघातात मृत्यू झाला. त्यांच्या निधनाने फक्त बारामती नव्हे तर अख्ख्या राज्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. त्यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभेच्या जागेवर लवकरच पोटनिवडणूक होणार असून सुनेत्रा पवार या ही निवडणूक लढवणार आहेत. त्याच निवडणुकीच्या उमेदवारीचा अर्ज भरण्यासाठी आज त्या बारामती येथे आल्या होत्या. त्याआधी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचा मेळावा झाला. त्यावेळी जय पवार, पार्थ पवार ही त्यांची मुलं, सून, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे सर्व प्रमुख नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे हेही उपस्थित होते. (पान २ वर)



## भाजपचा वटवृक्ष कार्यकर्त्यांच्या संघर्षातून उभा-रविंद्र चव्हाण

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय जनता पक्षाने ६ एप्रिल रोजी ४७ व्या वर्षात पदार्पण केलं. ६ एप्रिल १९८० रोजी स्थापन झालेल्या पक्षाने ४६ वर्षांचा प्रवास पूर्ण केला आहे. या निमित्ताने भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी एक्स पोस्टद्वारे पक्षाच्या वाटचालीचा आढावा घेत कार्यकर्त्यांच्या योगदानाचा गौरव केला.रवींद्र चव्हाण यांनी नमूद केलं की, विचारधारेच्या भक्कम मुळांवर उभा असलेला आणि कार्यकर्त्यांच्या संघर्षातून घडलेला भाजप आज विशाल वटवृक्ष बनला आहे. ६ एप्रिल १९८० रोजी रोवलेलं बीज आज २५ कोटींहून अधिक कार्यकर्त्यांच्या मेहनतीने देशभर विस्तारलं आहे.

**सामान्य कार्यकर्त्यापासून नेतृत्वापर्यंतचा प्रवास-** रवींद्र चव्हाण यांनी आपल्या प्रवासाचा उल्लेख करत सांगितलं की, सामान्य कार्यकर्ता ते प्रदेशाध्यक्ष हा प्रवास केवळ भाजपसारख्या (पान २ वर)

## आईसह चार मुलांना विषबाधा, तीन चिमुकल्यांचा मृत्यू



**बुलढाणा /प्रतिनिधी :** जिल्ह्यातील धाड येथे धक्कादायक घटना घडली आहे. आईसह चार मुलांना विषबाधा झाली होती. यामध्ये तीन चिमुकल्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.या दुर्दैवी घटनेने संपूर्ण परिसर हादरला आहे. एकाच कुटुंबातील आईसह चार मुलांना विषबाधा झाल्याने तीन लहानग्या बहीण-भावांचा मृत्यू झाला असून आई व एक चिमुकलीवर उपचार सुरु आहेत. अन्नातून विषबाधा झाल्याचा संशय व्यक्तकेला जात आहे. या घटनेमुळं परिसरात शोककळा पसरली आहे. मोहंमद अली मोहंमद वसीम जमदार (वय ४), मशिरा मोहंमद वसीम जमदार (वय ७) आणि फातिमा मोहंमद वसीम जमदार (वय ८) या तिघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर आई अफरीन मोहंमद वसीम जमदार (वय ३४) आणि अश्मिरा वसीम जमदार (वय ३) यांच्यावर बुलढाणा येथील वेगवेगळ्या खासगी रुग्णालयांत उपचार सुरू आहेत.दुर्दैवी घटनेमुळे धाड परिसरात शोककळा -रविवारीपासूनच या कुटुंबातील सदस्यांना पोटदुखी, मळमळ व उलट्यांचा त्रास सुरू झाला होता. सोमवारी सकाळी प्रकृती अधिक बिघडल्याने सर्वांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान अली व मशिरा यांचा मृत्यू झाला. आई अफरीन यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना, फातिमा व अश्मिरावर बालरोगतज्ज्ञांकडे उपचार करण्यात येत होते. सायंकाळी पावणेआठच्या सुमारास फातिमा हिचाही मृत्यू झाला. सध्या अश्मिराची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डाक्टरांनी दिली आहे. प्राथमिक माहितीनुसार, अन्नातून विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## राज्याच्या जडणघडणीत अजित पवारांचा सिंहाचा वाटा



**बारामती / प्रतिनिधी-** महाराष्ट्राच्या जडणघडणीत माजी मुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या जागेवर महायुतीच्या उमेदवार म्हणून सुनेत्रा पवार या निवडणूक लढवत आहेत. ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी अपेक्षा असली तरी कोणताही कार्यकर्ता गाफील राहता कामा नये. निवडणूक लागलीच तर ती झुंजारपणे लढून सर्व रेकार्ड मोडीत काढत विक्रमी विजय मिळवायचा आहे, असा इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला. सुनेत्रा पवार यांनी महायुतीकडून उमेदवारी अर्ज दाखल केला, त्यावेळी ते बोलत होते. अजितदादांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करताना शिंदे म्हणाले की, ही पोटनिवडणूक (पान २ वर)

# 9 पोलिसांना फाशीची शिक्षा

## 6 वर्षांपूर्वी पोलिस कोठडीत वडील-मुलाचा मृत्यू






दोषी ठरलेल्या पोलिसांना न्यायालयाच्या आवारातून घेउन जाताना

**चेन्नई/वृत्तसंस्था :** तमिळनाडूच्या मदुराई सत्र न्यायालयाने सोमवारी सथानकुलम कोठडीतील मृत्यू प्रकरणात ९ पोलिसांना फाशीची शिक्षा सुनावली. न्यायालयाने याला 'दुर्मीळातील दुर्मीळ' (रेयरेस्ट ऑफ रेअर) असे म्हटले आणि हे अत्यंत क्रूरता आणि सत्तेच्या गैरवापराचे प्रकरण असल्याचे सांगितले. न्यायालयाने सर्व दोषींना मृतांच्या कुटुंबीयांना १ कोटी ४० लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे निर्देश दिले. हे प्रकरण २०२० सालचे आहे. सहा वर्षे सुनावणी चालली. या प्रकरणात एकूण १० आरोपी होते, त्यापैकी एकाचा कोविड दरम्यान मृत्यू झाला. खरं तर, १९ जून २०२० रोजी पोलिसांनी मोबाईल व्यावसायिक पी. जयराज (५९) आणि त्यांचा मुलगा जे. बेनिक्स (३१) यांना ताब्यात घेतले होते. त्यांनी लॉकडाउन दरम्यान दुकान उघडे ठेवले होते, असा आरोप होता. दोघांना सथानकुलम पोलिस ठाण्यात नेण्यात आले. तेथून त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले, जिथे काही दिवसांतच त्यांचा मृत्यू झाला. कुटुंबीयांनी आरोप केला की, दोघांनाही पोलिस ठाण्यात रात्रभर मारहाण करण्यात (पान २ वर)

# मराठमोळ्या अंदाजात महाराष्ट्राच्या शिलेदारांची राज्यसभेत एन्ट्री!



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राज्यसभेत महाराष्ट्रातील दिग्गज नेत्यांसह एकूण १९ नवनिर्वाचित खासदारांनी ६ एप्रिल २०२६ रोजी राज्यसभा सदस्यत्वाची खासदारकीची शपथ घेतली. या नवनिर्वाचित सदस्यांना राज्यसभा अध्यक्ष सी.पी. राधाकृष्णन यांनी शपथ दिली. महाराष्ट्रामध्ये राज्यसभेच्या ७ जागांसाठी निवडणूक झाली होती. या सातही जागांवरील सर्व सात उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. यामध्ये सत्ताधारी महायुती आघाडीचे सहा आणि विरोधी महाविकास आघाडीच्या एका उमेदवाराचा समावेश होता.

सलग तिस-यांदा राज्यसभेवर शरद पवार आणि रामदास आठवले

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि केंद्रीय मंत्री, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (A) अध्यक्ष रामदास आठवले हे देखील सलग तिस-यांदा (3rd Time) राज्यसभेवर नियुक्त झाले आहेत. महाविकास आघाडीकडून शरद पवार यांची बिनविरोध निवड झाली. भाजपकडून केंद्रीय मंत्री रामदास आठवले, विनोद तावडे, रामराव वडकुते, माया इवनाते यांची बिनविरोध निवड झाली. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या ज्योती वाघमारे आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांची बिनविरोध निवड झाली. १० राज्यांमधील ३७ जागा भरण्यासाठी होणा-या राज्यसभेच्या निवडणुकीसाठी १६ मार्च रोजी मतदान झाले आणि त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता मतमोजणी पार पडली. महाराष्ट्र, ओडिशा, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, बिहार, छत्तीसगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणा येथून निवडून आलेल्या ३७ सदस्यांचा कार्यकाळ एप्रिल महिन्यात संपेल, त्यामुळे नवीन सदस्यांच्या निवडणुकीसाठी जागा रिक्त होतील.डॉ. ज्योती वाघमारेंनी घेतली मराठमोळ्या अंदाजात शपथ

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्यासह रामराव वडकुते (भाजप), माया इवनाते (भाजप), डॉ. ज्योती वाघमारे (शिवसेना) यांनी मराठमोळ्या अंदाजात राज्यसभा खासदार म्हणून शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्यात नवनिर्वाचित खासदार ज्योती वाघमारे यांनी सर्व महाराष्ट्राचे लक्ष वेधले . त्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत शपथ घेण्यासाठी पोहोचल्या होत्या. त्यांच्या या वेशभूषेमुळे महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारांचे दर्शन देशाला मिळाले. याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.राज्यसभा अध्यक्ष सी.पी. राधाकृष्णन यांनी त्यांना शपथ दिली, ज्यामुळे उच्च सभागृहातील त्यांची नवी टर्म अधिकृतपणे सुरू झाली आहे. संसदेचे अधिवेशन सध्या सुरू असून ते १६ एप्रिल २०२६ पर्यंत वाढवण्यात आले आहे. त्यामुळे उर्वरित सर्व सदस्यांचे शपथविधी याच कालावधीत टप्प्याटप्प्याने पूर्ण होतील.

## नाशिकच्या बड्या महिला अधिका-याचे 'खरात कनेक्शन' उघड!



**नाशिक :** नाशिकमधील वादग्रस्त भोंदूबाबा अशोक खरात याच्या काळ्या कारनाम्यांचे एकामागून एक धक्कादायक पदर उलगडू लागले आहेत. पोलीस कोठडीत असलेल्या खरातची कसून चौकशी सुरू असतानाच, या प्रकरणाचे धागेदोरे आता थेट प्रशासकीय वर्तुळापर्यंत पोहोचले आहेत. या प्रकरणात एक वरिष्ठ महिला अधिकारी पोलिसांच्या रडारवर आली असून, यामुळे खळबळ उडाली आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाच्या (SIT) हाती मोठी माहिती लागली असून, एक वरिष्ठ महिला अधिकारी आता थेट तपास यंत्रणेच्या रडारवर आली आहे. नाशिकमध्ये कार्यरत असताना या महिला अधिका-याने खरातला प्रशासकीय मदत केल्याचा खळबळजनक आरोप होत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या तत्कालीन महिला अधिका-याने आणि अशोक खरातने एकमेकांना 'कथीत' सहकार्य केल्याचे समोर येत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या महिला अधिका-याने प्रशासकीय पातळीवर खरातचे काम सुलभ केले आणि त्या बदल्यात अशोक खरातने आपले राजकीय व प्रशासकीय नेटवर्क वापरून या महिला अधिका-याला त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी पोस्टिंग मिळवून दिल्याची चर्चा सध्या नाशिकच्या वर्तुळात रंगली आहे. केवळ बदली आणि पोस्टिंगच नाही, तर या महिला अधिकारी आणि अशोक खरात यांच्यात मोठे आर्थिक व्यवहार झाले आहेत का? या दिशेनेही एसआयटीने आपला तपास चक्राकार फिरवला आहे. जर या व्यवहारांचे पुरावे सापडले, तर संबंधित महिला अधिका-याच्या अडचणीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.

# पाचव्या खुनातील आरोपीला गोळीबार करून पकडले

## नांदेडात थरार, नागरिक भयभीत, सलग होणा-या खुनामुळे नागरिकांना धास्ती

**नांदेड /प्रतिनिधी-** गेल्या तीन दिवसांपासून नांदेड शहर हादरले आहे. तीन दिवसांत पाच जणांची हत्या झाल्यामुळे नांदेड शहराचे बिहार होत आहे का, अशी प्रतिक्रिया सामान्य नागरिकांतून व्यक्त होत आहे. नागरिकांचा संताप लक्षात घेता पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय यांना तात्काळ गुन्हेगारांना पकडा असे आदेश दिल्यानंतर सोमवारी दुपारी झरी परिसरात मुख्य आरोपी अंकुश गंदमवार याच्या पायावर गोळी झाडून त्याच्यासह अन्य दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे अशी माहिती पोलिस निरीक्षक खंडेराय यांनी दिली.

सोमवारी सकाळी भाजपचे माजी शहर युवा अध्यक्ष सोनू कल्याणकर यांचा श्रीनगर परिसरात मुख्य रस्त्यावर खून करण्यात आला. सदरील घटनेचे वृत्त वा-यासारखे शहरात पसरले. सोशल मीडियामार्फत पोलिस विभागावर आरोप-प्रत्यारोप करण्यात आले. ही बाब पोलिस अधीक्षकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेश दिल्यानंतर खंडेराय यांनी आपली टीम पूर्णतः कामाला लावली. यामध्ये अशी माहिती प्राप्त झाली आहे की, शिवसेना शिंदे गटाच्या युवा सेनेचे शहराध्यक्ष सोनू कल्याणकर यांचा कट रचून खून करण्यात आला आहे. जेलमधील गोलू मंगनाळे या गुन्हेगाराने त्याला मारण्याची टीप दिली असल्याचे सांगण्यात येते. यातील आरोपी रोहित लोट, अंकुश मानेसह जोगदंड यास ताब्यात घेण्यात आले आहे. सोमवारी सकाळी साडेपाचच्या दरम्यान श्रीनगर परिसरात सोनू कल्याणकर हे आपल्या कुत्र्याला घेउन



नेहमीप्रमाणे मार्निंगवाकला निघाले होते. त्यावेळी पंचशील कापड दुकानाच्या बाजूस कुमार ड्रेसेससमोर जात असताना अचानक त्यांच्यासमोर चारचाकी वाहन येउन थांबले. त्या वाहनातून उतरलेल्या सहा ते सात हल्लेखोरांनी तलवारी, चाकूचा वापर करीत कल्याणकर यांच्यावर हल्ला केला. हल्लेखोरांनी त्यांच्या मानेवर, पाठीवर सपासप वार केले. त्यामुळे सोनू कल्याणकर यांचा जागीच मृत्यू झाला. मृत्यू झाल्यानंतर हल्लेखोरांनी पळ काढला. पोलिस विभागाला माहिती कळताच त्यांनी घटनास्थळाची पाहणी केली. पोलिस अधीक्षकांच्या सुचनानंतर तात्काळ शोध मोहीम सुरू झाली. सदरील आरोपी झरी परिसरात असल्याची माहिती मिळताच उदय खंडेराय यांनी आपली टीम घेउन त्या ठिकाणी रवाना झाले. आरोपी नजरेस पडताच पोउपनि मिलिंद सोनकांबळे यांनी फायर करीत आरोपीला थांबण्याच्या सूचना केल्या. परंतु आरोपी पळ काढत असल्याचे लक्षात आल्यानंतर अंकुश गंदमवार या आरोपीच्या पायावर गोळी झाडत त्याला ताब्यात घेतले. इतर तीन आरोपी मात्र पळ काढण्याचा प्रयत्नात असताना तिघांनाही अटक करण्यात आली आहे.

**शहरात तीन दिवसांत अब तक ५ खून-** ४ एप्रिलच्या पहाटे गँगवार झाले. शहरातील डी मार्ट परिसरात २ खून झाले तर १ खून शासकीय हॉस्पिटलमध्ये झाला. त्यात अर्जितसिंग चव्हाण, आवेज सय्यद खलील, मोहम्मद अरबाज मोहम्मद फारुख यांचा समावेश आहे. दरम्यान या खून प्रकरणी भाग्यनगर पोलिसांनी ६ जणांना अटक करून न्यायालयासमोर उभे केले असता त्यांना ८ एप्रिल पर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यानंतरची ५ एप्रिल रोजी शहरातील मुरमुरा गल्ली येथे तलवार व खंजरच्या साह्याने रणजीत सिंग तबेलेवाले उर्फ रज्जा याचा खून करण्यात आला. हा शहरातील ४ था खून होता. त्यानंतर ६ एप्रिल रोजी सोनू कल्याणकर याचा निर्घुन खून करण्यात आला. याप्रकरणी एका संशयीताला अटक करण्यात आली आहे. अशाप्रकारे शहरात ३ दिवसात ५ खून झाले आहेत. या तिन्ही प्रकरणात ७ ते ८ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांची सखोल चौकशी करण्यात येत आहे.पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलिस अधिकारी व्यंजने, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय, भाग्यनगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संतोष तांबे, वजीराबाद पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक परमेश्वर कदम, शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक राजेश पुरी यांनी तपासाकरिता विविध पथके तयार करून पाठविले आहेत. (पान २ वर)



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
e paper www.janmadhyam.com

# बालकांच्या कर्करोग उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचा पुढाकार

## मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, बीपीसीएल फाउंडेशन आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात सामंजस्य करार

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) फाउंडेशन आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोगाच्या उपचारासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या प्रकल्पाची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री सहायता कक्ष बीपीसीएल फाउंडेशन आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात हा त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कराराद्वारे सर्व संबंधित घटकांमध्ये समन्वय राखला जाईल आणि प्रकल्पाच्या अंमलबजावणीस गती मिळणार आहे तसेच, प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यक्षेत्र आणि जबाबदा-यांना सर्व संबंधितांनी मान्यता दिली असून, अंतिम सामंजस्य कराराध्ये ठरविण्यात येणा-या अटी व शर्तीचे पालन करण्याबाबत सहमती दर्शविण्यात आली आहे.

**लवकर निदान, परवडणारे उपचार आणि जागरूकता आवश्यक-** या सामंजस्य करारासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुलांचे संरक्षण हे राज्याचे कर्तव्य आहे. कर्करोगाविरुद्ध लढण्यासाठी लवकर निदान , परवडणारे उपचार आणि जागरूकता आवश्यक आहे. शासन आणि समाज दोघांनी मिळून हे काम करणे गरजेचे आहे. टाटा मेमोरियल सेंटर यांनी बालक कर्करोग रुग्णांच्या ऑपरेशनच्या खर्चासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून खर्चाची मागणी केली होती. यासाठी विविध संस्थांनी एकत्रितपणे पुढाकार घेतला आहे. त्यामध्ये बीपीसीएल फाउंडेशने मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आपला सहभाग नोंदवला आहे. त्यानुसार बीपीसीएल फाउंडेशन टाटा मेमोरियल सेंटरमध्ये कर्करोगाचे उपचार घेणा-या बालक रुग्णांच्या सहाय्यासाठी योगदान देणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



**या करारामुळे बालकांच्या कर्करोग उपचारांतील आर्थिक अडथळे कमी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील सामाजिक दायित्व (सीएसआर) उपक्रमांतर्गत बीपीसीएल फाउंडेशन यांच्या योगदानाचे कौतुक करण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी बीपीसीएल फाउंडेशनकडून विशेष निधी सामाजिक दायित्वमध्ये देणार आहे. अशा या सामंजस्य करारामुळे बालकांच्या कर्करोग उपचारांतील आर्थिक अडथळे कमी होतात. गुणवत्तापूर्ण उपचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत असतात. महाराष्ट्रात आरोग्यसेवांचा दर्जा उंचावत आहे. कर्करोगाशी झुंज देणा-या बालकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी या करारामुळे मोठी मदत होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुले हे देशाचे भविष्य आहेत, त्यामुळे त्यांना कर्करोगासारख्या आजाराशी लढण्यासाठी मदत करणे आवश्यक आहे. या हेतूने प्रेरित होऊन मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून जेवढी मदत करणे शक्य आहे तेवढी मदत करण्यात येत आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

सामंजस्य करार घडवून आणण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी महत्वाचे योगदान दिले असून मुख्यतः गरीब व गरजू नागरिकांना, विशेषतः रुग्णांना, तातडीची आर्थिक मदत मिळवून देणे आणि संपूर्ण प्रणाली कार्यक्षम बनवणे हे मुख्य उद्दिष्ट असल्याची माहिती कक्षामार्फत देण्यात आली आहे.

# राज्यात पेट्रोलियम पदार्थांचा पुरेसा साठा

## एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी शासनाची व्यापक उपाययोजना

### अन्न नागरी पुरवठा अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात पीएनजी जोडण्यांची संख्या २५.३६ लाखांवर पोहोचली असून एका महिन्यात ७३ हजार नवीन जोडण्या देण्यात आल्या आहेत. सीजीडी पाईपलाईनसाठी देण्याचा निर्णय घेतल्याने नेटवर्क विस्ताराला गती मिळणार आहे. ज्या ठिकाणी पीएनजी नेटवर्क पोहोचलेले आहे त्याठिकाणी ग्राहकांनी त्यासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. ज्या भागांमध्ये पीएनजी पाईपलाईन टाकणे शक्य नाही त्या ठिकाणी एलपीजीचा पुरवठा पूर्ववत सुरू राहणार असून महाराष्ट्रात एलपीजी, पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिली. मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत अपर मुख्य सचिव डिग्गीकर यांनी ही माहिती दिली. यावेळी शिधा नियंत्रक चंद्रकांत डांगे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, पीआयबीच्या महासंचालक स्मिता वत्स-शर्मा, तेल उत्पादक राज्य समन्वयक उमेश कुलकर्णी, भारत पेट्रोलियम कार्पोरेशन, कृषी संचालक सुनिल बोरकर यांच्यासह संबंधित उपस्थित होते.

**पीएनजी व सीजीडी नेटवर्कला चालना-** मध्यपूर्वेतील सध्याच्या भू-राजकीय तणावामुळे पेट्रोलियम पदार्थांच्या पुरवठा साखळीवर काही प्रमाणात दबाव निर्माण झाला असला, तरी राज्यातील पुरवठा सुरळीत असल्याचे सांगून अपर मुख्य सचिव डिग्गीकर म्हणाले की, जिथे जिथे शक्य आहे तिथे पीएनजीचा वापर वाढवण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी पाईप लाईन गॅस पुरवठा शक्य आहे. त्या ठिकाणी ३० जून पर्यंत पीएनजी बंधनकारक असून ज्या भागांमध्ये पीएनजी पाईपलाईन टाकणे शक्य नाही त्या ठिकाणा एलपीजीचा पुरवठा पूर्ववत सुरू राहणार आहे. पीएनजी कनेक्शन ज्या भागांमध्ये उपलब्ध तिथे त्याचा वापर वाढवायचा असून ग्राहकांच्या दृष्टीने विचार करता पीएनजी स्वस्त असून त्याचे देशांतर्गत उत्पादन जास्त आहे. पीएनजी नेटवर्क जिथे पोहोचले आहे तिथे तिथे ग्राहकांनी नोंदणी केली पाहिजे असे अपर मुख्य सचिव डिग्गीकर यांनी यावेळी सांगितले. राज्यात सुमारे २४ तेल डेपोमार्फत ८,१०० पेट्रोल पंपांना सेवा पुरवली जात असून दररोज सुमारे १८,५०० केएल पेट्रोल आणि ४०,००० केएल डिझेलचे वितरण केले जात आहे. १ ते ४ एप्रिलदरम्यानची विक्रीही मागील महिन्यांच्या सरासरीशी सुसंगत असल्याने इंधनटंचाईची स्थिती नाही.

पान १ व १० वरून

## उमेदवार देण्याचा कॉंग्रेसचा

शरद पवार म्हणाले की, 'कोणतीही निवडणूक लढवायची असेल तर समोर कुणीतरी असेल हे मान्य करु नच लढवावी लागते. आम्ही उमेदवार उभा केला नाही. अनेक लोक अनेक निवडणुका लढवतात. अजित पवार अकाली गेले त्याचं दुःख म्हणून कुटुंब म्हणून आम्हाला आहे. पवारांमध्ये कुटुंब प्रमुख म्हणून माझी जबाबदारी आहे. त्यामुळे ही निवडणूक आपल्याला लढवायची नाही असं आम्ही ठरवलं. या निवडणुकीत आम्ही उमेदवार उभा केला नाही.'राहुरीमध्ये प्राजक्त तनपुरे यांनी माघार का घेतली याची माहिती नाही. माझ्या पक्षाने सांगितलं की तनपुरे लढणार नसतील तर स्थानिक पातळीवर निर्णय घ्यावा. त्यानंतर गोविंद मोकाटे यांनी उमेदवारी देण्यात आली असं शरद पवार म्हणाले. बारामतीमध्ये उमेदवार देणं हा कॉंग्रेसचा अधिकार आहे, परिस्थिती पाहून कॉंग्रेसने निर्णय घेतला असेल असं शरद पवार म्हणाले. महाविकास आघाडी म्हणून एकत्र असताना एखाद्या मतदारसंघात अशा काही अडचणी येतात, तो काही राष्ट्रीय विषय नाही. राष्ट्रवादीचे खासदार पार्थ पवार यांनी कॉंग्रेसवर टीका केली होती. त्यावर प्रतिक्रिया देताना शरद पवार म्हणाले की, राजकारणामध्ये अशा प्रकारचं वक्तव्य करण्यासाठी परिपक्वता लागले. राजकारणातील परिपक्वता पार्थ पवार यांच्याकडे आहे की नाही याची माहिती नाही. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा ही जयंत पाटील आणि अजित पवार यांच्यामध्ये झाली होती. त्यावेळी अजित पवारांचा आग्रह हा वेगळा होता. आता ते राहिलेले नाहीत. त्यामुळे आमच्या पक्षात आता विलिनीकरणाची चर्चा केली जात नाही, असं शरद पवार म्हणाले.

## आता पत्त्याच्या पुराव्याशिवाय

पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या तणावामुळे उर्जा लाजिस्टिक्सवर परिणाम झाला आहे. हे लक्षात घेउन, सरकारने लहान सिलिंडरची उपलब्धता वाढवण्याचाही निर्णय घेतला आहे. सरकारी आकडेवारीनुसार, २३ मार्चपासून आतापर्यंत सुमारे ६.६ लाख लहान सिलिंडर विकले गेले आहेत. एकट्या ४ एप्रिल रोजी ९०,००० युनिट्सची विक्री झाली. अधिका-यांचे म्हणणे आहे की, वितरण केंद्रांवर साठ्याची कोणतीही कमतरता नाही. कामासाठी दुस-या शहरांमध्ये राहणा-या लोकांना मदत करण्यासाठी सरकारने त्यांच्या च्या निवडक आउटलेट्सवर ११ विशेष हेल्प डेस्क तयार केल्या आहेत. हे डेस्क ग्राहकांना जवळच्या वितरकाची माहिती देतील आणि त्यांना कोणत्याही अडचणीशिवाय सिलिंडर मिळवून देण्यास मदत करतील. घरगुती गॅसची मागणीही विक्रमी पातळीवर आहे; एकाच दिवसात ५१ लाखांहून अधिक घरगुती सिलिंडर्सची डिलिव्हरी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, एकूण मागणीपैकी ९५ऽ हिस्सा आता ऑनलाइन बुकिंगद्वारे येत आहे.स्वयंपाकाच्या गॅसचे संकट टाळण्यासाठी सरकारने प्राधान्यक्रम निश्चित केले आहेत. घरगुती ग्राहक, रुग्णालये आणि शाळांसारख्या आवश्यक संस्थांना पूर्ण पुरवठा केला जात आहे.यासाठी व्यावसायिक एलपीजीचा पुरवठा संकटपूर्व पातळीच्या ७०ऽ पर्यंत कमी करण्यात आला आहे. तर, खत प्रकल्पांसाठी दिलासादायक बातमी आहे; ६ एप्रिलपासून त्यांना ९०ऽ गॅस पुरवठा मिळण्यास सुरुवात होईल. नेहमी अधिकृत गॅस एजन्सीकडूनच सिलिंडर घ्या. पत्ता पुराव्याशिवाय असलेला हा सिलिंडर 'फ्री ट्रेड मार्केट'चा भाग आहे, त्यामुळे त्याची किंमत सामान्य घरगुती सिलिंडरपेक्षा वेगळी असू शकते. सिलिंडर घेताना त्याची मुदतची अंतिम तारीख (एक्सपायरी डेट) नक्की तपासा.

## कुंभमेळ्यातील IIT यन बाबाचं

रोजी कोर्ट मॅरेज केलं आहे. अभय सिंहचा आपल्या पत्नीसोबतचा फोटो सोशल मीडियात व्हायरल होत आहे. अभय सिंहने मुलाखतीत सांगितले की, तो आणि त्याची पत्नी, नवीन आयुष्य खूप आनंदात जगत आहेत. 'माझी पत्नी प्रतिका ही मुळची कर्नाटकातील रहिवासी आहे. ती एक इंजिनिअर आहे', अशी माहिती IITian बाबानं पत्नी प्रतिकाबाबत दिली. लग्नानंतर दोघेही हिमाचल प्रदेशातील धर्मशाला येथे राहत असल्याची माहिती समोर आली आहे. दोघांचा सुखी संसार या ठिकाणी सुरु असल्याची माहिती समोर आली आहे. सोमवारी अभय सिंह आपल्या कुटुंबाला भेटण्यासाठी झज्जरला गेला होता. भगवे वस्त्र परिधान करुन अभय वडिलांना भेटला. या ठिकाणी त्यानं आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. त्यानं सांगितलं की, 'अध्यात्मात आवड निर्माण होण्यापूर्वी मी अनेकदा आपल्या वडिलांच्या दालनात जाउन, कायदेशीर अर्ज आणि केस स्टडी करत असायचो. जीवनाचा अर्थ शोधण्याच्या प्रवासाने, त्याला विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या जगातून अध्यात्माकडे आणले, असं IITian बाबानं स्पष्ट केलं. अभय सिंह आणि त्याचा परिवार हे मुळचे झज्जर येथील सासरौली गावातील रहिवासी आहेत. त्याचे वडील कर्ण सिंह हे वकील आहेत. तसेच ते झज्जर येथील बार असोसिएशनचे अध्यक्षही होते. अभय सिंहची पत्नी प्रतीका म्हणाली, ' अभय सरळ, साधा आणि प्रामाणिक व्यक्ती आहे. आम्ही दोघेही सुमारे १ वर्षांपूर्वी भेटलो होतो'. प्रतिकाने सांगितलं की, ते आता एकत्र सनातन धर्म आणि अध्यात्माचा प्रसार करण्याचं काम करतील. भविष्यात दोघेही एकत्र सनातन विद्यापीठ स्थापन करण्याची योजना आखत असल्याचं त्यांनी सांगितलं. जिथे गुरू, साधक आणि अध्यात्माशी संबंधित लोक एकाच व्यासपीठावर एकत्र येउ शकतील.

## कॉंग्रेसला तोंड दाखवायला

आणि कामाचा इतिहास कॉंग्रेसशी जोडलेला आहे. त्यामुळे कॉंग्रेसने काही राजकीय संस्कार जपायचे असतील, तर त्यांनी बारामतीत निवडणूक लढवू नये आणि सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी उभं राहावं, असं ते म्हणाले.बारामतीतील विजयाबाबत त्यांनी मोठा दावा केला. बारामतीत ७५ टक्क्यांहून अधिक मतांनी विजय मिळवू. कॉंग्रेसचा आजवर कधीच झाला नसेल इतका मोठा पराभव येथे होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**'पक्षाचा विस्तार हे आमचे उद्दिष्ट'**-दरम्यान, आज भाजपच्या वर्धापन दिनानिमित्त पक्ष संघटनाबाबतही त्यांनी महत्त्वाचे विधान केले. पक्षाचा विस्तार आणि बळकटीकरण हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. पुण्यात आणि राज्यात, देशभरात भाजपचे संघटन ५१ टक्क्यांपेक्षा अधिक नेण्याचा संकल्प केला आहे. युवकांना मोठ्या प्रमाणावर पक्षाशी जोडणार आहोत. राज्यभर संघटना मजबूत करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

**'दोषी अधिका-यांना बडतर्फ करु '**-अशोक खरात प्रकरणावर त्यांनी सावध भूमिका घेतली. हे प्रकरण संवेदनशील आहे. माझ्यासारख्या कार्यकर्त्यांनी माध्यमांसमोर यावर भाष्य करणं योग्य नाही. SIT कडून जे निष्कर्ष समोर येतील त्यानुसारच कारवाई होईल. जर अधिकारी दोषी आढळले, तर त्यांना बडतर्फ करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.दरम्यान, अजित पवार यांच्या अपघातावर कॉंग्रेसकडून गुन्हा दाखल करण्याच्या मागणीवर त्यांनी पलटवार केला आहे, निवडणूक डोळ्यासमोर ठेवून अशा मागण्या केल्या जात आहेत. मात्र बारामतीतील जनता सुनेत्रा पवारांना प्रचंड मतांनी विजयी करेल आणि कॉंग्रेसला मोठा धक्का बसेल, असा दावा बावनकुळे यांनी केला.

## संपूर्ण बारामती माझे

बारामतीकरांशी मनाचा संवाद साधताना त्यांनी सर्वांना आश्वासन देत बारामतीचा विकास असाच चालू राहील असा शब्द दिला. फक्त जय आणि पार्थ हेच माझं कुटुंब नव्हे तर संपूर्ण बारामती माझं कुटुंब आहे. त्यांच्या तोंडून हे वाक्य ऐकताच उपस्थित सगळेच गहिवरले, अनेकांना अश्रू अनावर झाले. बारामतीची प्रतिष्ठा कमी होणार नाही याचे वचन देते, असंही सुनेत्रा पवार यावेळी म्हणाल्या. यावेळी सुनेत्रा पवार यांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा दिला. आपण आपल्या लाडक्या नेत्याला, दादाला गमावलं. मला स्वप्नातही वाटलं नव्हतं, बारामतीत पोटनिवडणूक होईल. दादा आपल्यात नाहीत हे अजूनही वाटत नाही, आणि दादा नाहीत हे मला मान्य नाही. दादांसाठी बारमती म्हणजे आईसारखी होती. त्यांचा अखेरचा श्वास हा बारामतीतच विसावला. सगळ्यात दादांचा सहवास आहे. दादांचं स्वप्न पूर्ण करण्याआधी दुःख तळघरात कोंडल आणि धीराने बाहेर पडले. हा धीर तुम्हा बारामतीकरांकडे बघून आला आहे. आदरणीय पवार साहेबांनी बारामतीला विकासाचा दृष्टीकोण दिला. दादांनी या बारामतीत रंग भरला आणि कष्टाने फुलवले असे त्या म्हणाल्या.

## भाजपचा वटवृक्ष कार्यकर्त्यांच्या

संघटनेतच शक्य आहे. भाजयुमो उपाध्यक्ष, नगरसेवक, आमदार, मंत्री आणि आता प्रदेशाध्यक्ष असा प्रवास करताना पक्षाच्या विचारधारेने कार्यकर्ते घडवले, तर कार्यकर्त्यांनीही पक्ष घडवला, असं त्यांनी म्हटलं.जनसंघाच्या काळात श्यामा प्रसाद मुखर्जी, दीन दयाळ उपाध्याय आणि अटल बिहारी वाजपेयी यांसारख्या नेत्यांनी प्रवाहाच्या विरुद्ध जाउन बहुसंख्य समाजाला केंद्रस्थानी ठेवण्याचं काम केलं. त्यांची दूरदृष्टी आजही मार्गदर्शक असल्याचं चव्हाण यांनी नमूद केलं.महाराष्ट्रातील भाजपच्या प्रवासात उत्तमराव पाटील, गोपीनाथ मुंडे, नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील आणि चंद्रशेखर बावनकुळे यांसारख्या नेत्यांचं मोठं योगदान राहिलं आहे. या नेत्यांनी संघटना तळागाळात नेउन मजबूत केली, असं त्यांनी सांगितलं.

**जातीय राजकारणाला उत्तर-** भाजपवर कधी शेटजी-भटजी पक्ष अशी टीका झाली होती. मात्र गेल्या ४६ वर्षांत महाराष्ट्रात ११ बहुजन समाजातील प्रदेशाध्यक्ष देत भाजपने त्या टीकेला उत्तर दिलं आहे. पक्षाने समाजातील सर्व घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचं काम केलं असल्याचं चव्हाण यांनी नमूद केलं.भाजप ही केवळ निवडणूक लढवणारी संघटना नसून विचारधारेवर उभी असलेली चळवळ आहे. भारतीयत्व म्हणजेच राष्ट्रीयत्व हा विचार तळागाळात पोहोचवण्यात पक्ष यशस्वी ठरला आहे. राष्ट्र प्रथम हीच पक्षाची मूलभूत भूमिका असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. .

## राज्याच्या जडणघडणीत अजित

आपल्यावर दुर्दैवाने ओढवली आहे. त्यांच्या आकस्मिक दुःखद निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला. बारामतीसह संपूर्ण राज्याच्या विकासात त्यांनी भक्कम पायाभरणी केली. अनेक खात्यांची, विशेषतः अर्थ खात्याची जबाबदारी त्यांनी अत्यंत सक्षमपणे पेलली. एक कणखर प्रशासक, धारदार संघटक आणि जनतेचा नेता म्हणून त्यांनी आपली छाप उमटवली. ते पुढे म्हणाले की, आम्ही अनेक वर्ष खांद्याला खांदा लावून काम केले. मुख्यमंत्री असताना माझी लाडकी बहीण योजना राबवताना मोठे आर्थिक आव्हान होते. तरीही देवेंद्र फडणवीस, मी आणि अजितदादांनी ठाम निर्णय घेतला. अजितदादांनी आर्थिक ताळमेळ ढळू न देता ही योजना प्रभावीपणे राबवली. त्यांचा स्वभाव स्पष्ट, कणखर आणि तेवढाच आपुलकीचा होता. त्यामुळे त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी प्रचंड आहे. सुनेत्राताईंनी या कठीण काळात जबाबदारी खंबीरपणे उचलली आहे. दुःख पचवून त्यांनी कामाचा वेग कमी होउ दिलेला नाही. सांत्वन करणे सोपे असते, पण दुःख पचवून उभं राहणं कठीण असतं आणि ते त्यांनी करून दाखवलं आहे.

## 9 पोलिसांना फाशीची शिक्षा

आली. त्यांच्या शरीरावर गंभीर जखमा आणि रक्तस्त्रावाच्या खुणा होत्या.

**सीबीआय चौकशीत कोठडीत मारहाण झाल्याची पुष्टी झाली**

मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, राज्याच्या सीबी-सीआयडीकडून सीबीआयकडे तपास सोपवण्यात आला होता. एजन्सीने एका इन्स्पेक्टर, दोन सब-इन्स्पेक्टर आणि इतर पोलिस कर्मचा-यांसह १० आरोपींना अटक करून त्यांच्याविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला होता. चौकशीदरम्यान, एका महिला कान्स्टेबलने जबाब दिला की, वडील-मुलाला रात्रभर मारहाण करण्यात आली होती. पोलिस ठाण्यात टेबल आणि लाठ्यांवर रक्ताचे डाग होते. ही साक्ष या प्रकरणात महत्त्वाचा पुरावा ठरली. फर्स्ट डिशनल डिस्ट्रिक्ट अँड सेशन्स जज जी. मुथुकुमारन यांनी क्एक्ष चा युक्तिवाद मान्य केला की, दोघांनाही कोठडीत पद्धतशीरपणे छळण्यात आले. त्यामुळे त्यांना कमाल शिक्षा सुनावण्यात आली. मात्र, तपासात हेही समोर आले की, सथानकुलम पोलिस ठाण्याचे क्क्ज फुटेज सुरक्षित ठेवण्यात आले नव्हते. रेकार्डिंग दररोज आपोआप डिलीट होत असे, त्यामुळे महत्त्वाचे पुरावे मिळू शकले नाहीत.

९ पोलिसांमध्ये एक इन्स्पेक्टर आणि एक सब-इन्स्पेक्टर

दोषी ठरवण्यात आलेल्या पोलिसांमध्ये इन्स्पेक्टर एस. श्रीधर, सब-इन्स्पेक्टर पी. रघु गणेश आणि के. बालकृष्णन, हेड कान्स्टेबल एस. मुरुगन आणि ए. समदुरई यांचा समावेश आहे. तसेच, कान्स्टेबल एम. मुथुराज, एस. चेल्लादुरई, एक्स. थामस फ्रान्सिस आणि एस. वेलुमुथु यांचाही समावेश आहे. या प्रकरणात १०वा आरोपी स्पेशल सब-इन्स्पेक्टर पालदुरई याचा खटल्यादरम्यान कोविडमुळे मृत्यू झाला होता.

## पाचव्या खुनातील आरोपीला

**सलग होणा-या हत्येमुळे नागरिकांत आता सहाव्या खुनाची दहशत?**

नांदेड शहरात सलग तीन दिवसांत ५ जणांचा खून करण्यात आला. सलग खुनाच्या मालिकेमुळे पोलिसांच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. तर शहरातील नागरिक आता पहाटे सहावा खून कोणाचा होतो, अशी भीती मनात बाळगुन प्रचंड दहशतीखाली वावरत आहेत.

## चारचाकीची दुचाकीला धडक;

अरुण मोरे यांच्या हात, पाय व डोक्याला मार लागला. घटनास्थळी उपस्थित असलेल्या प्रथमेश मानकर व नरेंद्र ठाकरे यांनी तत्काळ मदत करत दोघांना खासगी वाहनाने अमरावती येथील रेडीयंट रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू असताना ५ एप्रिल रोजी पहाटे १.१५ वाजताच्या सुमारास पंडीत ठाकरे यांचा मृत्यू झाला. अरुण मोरे यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. दरम्यान, अपघातानंतर अज्ञात वाहनचालक घटनास्थळावरून फरार झाला असून, त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न सुरू केले आहेत. या प्रकरणी आशीष ज्ञानेश्वर ठाकरे (रा. भिवापूर) यांच्या तक्रारीवरून आरोपी वाहनचालकाविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## उधारीच्या पैशावरून महिलेशी

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ४ एप्रिल रोजी रात्री सुमारे ९ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. फिर्यादी महिलेच्या मुलाने आरोपींकडून काही रक्कम उधारीवर घेतली होती. त्या पैशांची परतफेड करण्याबाबत वाद सुरू असताना आरोपी थेट फिर्यादीच्या घरी आले. फिर्यादीने पती घरी आल्यानंतर पैसे देण्याची विनंती केली. मात्र, आरोपींनी तात्काळ पैसे देण्याचा हट्ट धरत शिवीगाळ सुरू केली. यावेळी वाद अधिक चिघळला आणि आरोपींनी महिलेबरोबर गैरवर्तन केले. आरोपी हर्ष मोहोड याने फिर्यादीचे हात धरून तिला फिरवत जखमी केले, तर दुसऱ्या आरोपी मिलिंद मोहोड याने महिलेच्या मानेवर पकड घेत तिचा विनयभंग केल्याचा आरोप आहे. तसेच तिसऱ्या आरोपीने शिवीगाळ करत फिर्यादी व तिच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर पीडित महिलेने पोलिसांकडे धाव घेत तक्रार नोंदवली. तिच्या जबानीवरून गाडगेनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता अंतर्गत संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सराईत गुन्हेगार बादल लुंडवर

एमपीडीए अंतर्गत प्रस्ताव सादर केला. हा प्रस्ताव गुन्हे शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तपासून पुढील कार्यवाही करण्यात आली. या प्रक्रियेत एमपीडीए सेलचे अधिकारी, राजापेठ पोलीस ठाण्याचे अधिकारी तसेच गुन्हे शाखेचे पथक यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली. त्यानंतर पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी ६ एप्रिल २०२६ रोजी स्थानबद्धतेचा आदेश जारी केला. आदेशानंतर संबंधित आरोपीला तात्काळ ताब्यात घेऊन मध्यवर्ती कारागृह, अमरावती येथे दाखल करण्यात आले.

## लैंगिक अत्याचारानंतर ब्लॅकमेल

सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. या भीतीमुळे पीडित महिला काही काळ गप्प राहिली. या घटनेनंतर काही महिन्यांनी आरोपीने पुन्हा संपर्क साधत, तिचे आक्षेपार्ह फोटो व व्हिडिओ आपल्या ताब्यात असल्याचा दावा केला. ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत पैशांची मागणी सुरू केली. सुरुवातीला दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीच्या साथीदारानेही फोन करून दबाव वाढवला. बदनामीच्या भीतीने पीडितेने टप्प्याटप्प्याने पैसे देण्यास सुरुवात केली. कुटुंबीयांकडून उसनवारी करून तिने एकूण सुमारे चार लाख रुपये आरोपींना दिल्याचे समोर आले आहे. तरीही आरोपींचा त्रास थांबला नाही. पीडितेला सतत अश्लील शिवीगाळ, धमक्या आणि मारहाणीला सामोरे जावे लागले. तिच्या पतीच्या जीवाला धोका असल्याच्या धमक्या दिल्याने ती अधिकच भयभीत झाली होती. सततच्या छळाला कंटाळून अखेर पीडितेने फ्रेजरपुरा पोलिसांकडे तक्रार दाखल केली. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध विविध गंभीर कलमांखाली गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. मुख्य आरोपी सध्या बाहेरगावी शासकीय बंदोबस्तावर असल्याची माहिती समोर आली असून, संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. दुसरा आरोपीही शासकीय सेवेत असल्याची बाब समोर आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## मजूरांना काम नाकारणे

ठेवता जलसंधारण विभागाची कामे सांगून वेळकाढूपणा करण्यात आला.

**प्रकरणात ९० दिवसाचा बेरोजगारी भत्ता-**

या प्रकरणातील १९ मजूरांना ९० दिवसांचा बेरोजगारी भत्ता देय ठरला आहे. ३१२ रुपये मजुरीप्रमाणे एकुण ५,३३,५२० रक्कम होते. नियमानुसार यातील पन्नास टक्के रक्कम २,६६,७६० रुपये चार कर्मचाऱ्यांच्या पगारातून कापण्याचे आदेश देण्यात आले आहेत. उर्वरित मजुरांच्या बाबतीतही कागदपत्राची पडताळणी करुन निर्णय घेतला जाणार आहे.

किरण काळे (एपीओ) ४४,४६०, अभिजित काळे (पीटीओ) ८८,९२०, सागर निर्मळ (ग्रामसेवक ) १,११,१५०, सुदेश बोरकर (रोजगार सेवक ) २२,२३० यांच्या पगारातून ही रक्कम कापली जाणार आहे.

## ९ व १० एप्रिलला विश्रोळी

योजनेच्या अशुद्ध जलवाहिनीचे कामही याच काळात पूर्ण केले जाणार आहे. या तांत्रिक कामांच्या दृष्टीने दि. ९ आणि १० एप्रिल २०२६ रोजी संपूर्ण दिवसभर या योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या गावांचा पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

या योजनेत समावेश असलेल्या सर्व १०५ गावातील नागरिकांनी कोणत्याही प्रकारची गैरसोय टाळण्यासाठी आधीच आवश्यक पाण्याचा साठा करून ठेवावा. दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर पाणी पुरवठा पूर्ववत करण्यात येईल, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले असून नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, अशी विनंती करण्यात आली आहे.

## जुन्या वादातून तरुणावर चाकू

झाली असून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. हल्ल्यानंतर सर्व आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. जखमी अवस्थेत फिर्यादीने पोलिसांकडे धाव घेत तक्रार नोंदवली. त्यांच्या जबानीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या घटनेमुळे शहरात पुन्हा एकदा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू आहे. लवकरच त्यांना अटक करण्यात येईल, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

## पाण्याच्या टाकीत आढळला

घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तेथे पाहिले असता वृद्ध व्यक्ती पाण्याच्या टाकीत तरंगताना आढळले. यानंतर स्थानिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात आला. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. दरम्यान, मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. नांदगाव पोलिसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. ही घटना संशयास्पद की अपघात, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.

## अंत्यसंस्कारानंतर धक्का

नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे हा गुन्हा अधिक गंभीर ठरत असून, तपास यंत्रणेसमोर खऱ्या मृत व्यक्तीची ओळख पटवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. ओझीलाल जिवंत परतल्याने पोलिसांना पुन्हा तपासाची सुरुवात करावी लागणार असून, डीएनए अहवालानंतरच या प्रकरणाचे खरे रहस्य उलगडण्याची शक्यता आहे.

## बारदाना अभावी नाफेड खरेदी

करण्यात आला. मात्र, गेल्या आठ दिवसांपासून बारदान्या अभावी खरेदी प्रक्रिया ठप्प झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आपला शेतमाल हमीभावात विकता न आल्याने बाहेरील बाजारात अत्यल्प दरात विक्री करावी लागत आहे.

या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, यासाठी केंद्र सरकार जबाबदार असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी पुढील दोन दिवसांत खरेदी केंद्रावर बारदाना उपलब्ध करून द्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

हे निवेदन माजी आ. प्रा. वीरेंद्र जगताप यांच्या नेतृत्वात देण्यात आले असून यावेळी गोविंदराव देशमुख, पंकज शिंदे , अशोक चौधरी, गणेश आरेकर, अमोल होले , श्रीनिवास सुर्यवंशी, नितीन कोपरकार, नितीन गोंडाने,प्रविण चिंचे व पवन चौधरी, शिट्टू सूर्यवंशी तसेच यावेळी शेकडो शेतकरी सुद्धा उपस्थित होते.

## मेळघाटातील आदिवासींचे

अर्जुना यांच्या उपस्थितीत बैठक झाली.

मेळघाटातील आदिवासी व गैरआदिवासी बांधवांचे आराध्य दैवत असलेल्या सेमाडोह येथील भुमका बाबा पिळी मंदिरात पूजा तसेच भंडारा करण्यास व्याघ्र प्रकल्पाच्या अधिका-यांनी बंदी घातली होती. यामुळे या परिसरातील आदिवासी बांधवांमध्ये वन विभागाबाबत तीव्र असंतोष निर्माण झाला होता. त्यामुळे धारणी ते परतवाडा महामार्गावर चक्काजाम आंदोलन करून त्यांच्या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी सर्व विभागांना लेखी कळविले होते. तसेच खासदार बळवंत वानखडे यांना देखील निवेदन दिले होते. याची दाखल घेत खासदार बळवंत वानखडे यांनी दिनांक ०२ एप्रिल २०२६ रोजी संसदेत देखील हा मुद्दा उपस्थित केला होता.

उच्च न्यायालयाच्या निर्देशाला अधीन राहून भुमकाबाबा येथील देवस्थानात वन विभागामार्फत आठवड्यातून केवळ एक दिवस दर्शनासाठी खुले करून दिले होते. भुमकाबाबा हे देवस्थान आदिवासी बांधवांचे श्रद्धा , संस्कृती आणि परंपरेचे केंद्र आहे. त्यामुळे येथे अमरावती , बैतुल , खंडवा या भागातील आदिवासी आणि गैरआदिवासी बांधव मोठ्या प्रमाणात मन्नत मागासाठी येतात. तसेच येथे मन्नत पूर्ण झाल्यावर दानस्वरूपी जेवणाचा कार्यक्रम करतात. परंतु या परिसरात वाघाचा संचार असून याबाबत पाऊलखुणा देखील सापडल्या आहेत. त्यामुळे वनविभागा मार्फत चुकीच्या पद्धतीने येथे येणाऱ्या भाविकांना मनाई करण्यात आली होती.

परंतु चैत्र महिन्यात येथे भाविक त्यांच्या मनोकामना पूर्ण होण्याच्या दृष्टीने दुरून येत असल्याने सदर देवस्थान एप्रिल ते जून या काळात शनिवार वगळता पूर्ण दिवस सुरु ठेवणेबाबत आदिवासी बांधवांची मागणी होती. यावर तोडगा काढण्याच्या दृष्टीने खासदार बळवंत वानखडे यांनी वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन सेमाडोह येथील ग्रामस्थ , पोलीस प्रशासन , आणि वन विभागाच्या सहकार्याने कोणताही अनुचित प्रकार घडू नये या मध्यस्तीने सदर देवस्थान भाविकांसाठी खुले करण्याबाबत निर्देशित केले. यामुळे सदर देवस्थान हे एप्रिल ते जून या महिन्यात सुरु असून आदिवासी बांधवांसाठी सुरु असणार आहे. सदर आढावा बैठकीस वीरेंद्र जगताप माजी आमदार , महेंद्र गैलवार , अध्यक्ष धारणी तालुका कॉंग्रेस कमेटी , राजेश सेमलकर , विलास बोरेकर , पंकज मोरे , गटनेता न प धारणी , राहुल येवले , जिल्हाध्यक्ष , युवक कॉंग्रेस , गोलू मुंडे आणि वनविभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## शासनाच्या सातबारा संकेतस्थळावर

कर्ज प्रक्रियेला गती देणे गरजेचे असताना सातबारा मिळण्यात अडथळे निर्माण होत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

संबंधित महसूल व आयटी विभागाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन संकेतस्थळातील तांत्रिक त्रुटी दूर कराव्यात, तसेच सेतू केंद्रांवरील कामकाज सुरळीत करावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.ऑनलाइन सेवा नावालाच प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांची फरफट अशी संतप्त प्रतिक्रिया सर्वत्र उमटत आहे. यासह तांत्रिक अडचणी या नेहमीच्याच बनल्या असून सेतू केंद्रावर कुठलेही धड काम होत नसल्याने ऑनलाइन प्रणालीवर मोठ्या प्रमाणात प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्रामिण भागातील नागरिकांना व शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे

पिक कर्ज भरण्यासाठी शेतकऱ्यांना सातबारा हा अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज असून पिक कर्ज भरण्यासाठी तो आवश्यक आहे. मात्र सेतू केंद्रावरील नित्याच्या तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शासनाने ही समस्या तातडीने सोडवून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.तसेच सेतू केंद्राच्या सुविधा विनाविलंब जलद गतीने सोडवाव्यात.
-सुधाकर भारसाकळे, तालुका कॉंग्रेस अध्यक्ष

महा-ई-सेवा केंद्रावर सातबारा काढण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ऑनलाइन प्रणालीतील सततच्या तांत्रिक त्रुटींमुळे कामकाज ठप्प होत असून प्रशासनाची उदासीनता दिसून येत आहे. पालकांना व विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी कागदाची पूर्तता करावी लागत आहे. त्यांना सुद्धा अधिक त्रास सहन करावा लागतो. शासनाने याकडे तात्काळ लक्ष देऊन सेतू केंद्रातील सुविधा जलद व सुरळीत करणे अत्यंत गरजेचे आहे.
-नितीन गावंडे, सामाजिक कार्यकर्ते

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १३० ■ मंगळवार ७ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

# बालकांच्या कर्करोग लढ्याला नवे बळ

## मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचा ऐतिहासिक करार

### बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटरचा पुढाकार; उपचारांना मिळणार मोठा आर्थिक आधार

**मुंबई जनमाध्यम :** राज्यातील कर्करोगग्रस्त बालकांच्या उपचारांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय घेत मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकारातून साकारलेल्या या करारामुळे गरीब व गरजू कुटुंबांतील बालकांना गुणवत्तापूर्ण आणि परवडणारे उपचार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या करारामुळे कर्करोग उपचार प्रक्रियेत पारदर्शकता, समन्वय आणि कार्यक्षमता वाढणार आहे. संबंधित संस्थांमध्ये स्पष्ट जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या असून, उपचारांसाठी आवश्यक निधीची उपलब्धता सुनिश्चित करण्यात येणार आहे. त्यामुळे कर्करोगाशी झुंज देणाऱ्या बालकांच्या उपचारांमध्ये येणारे आर्थिक अडथळे मोठ्या प्रमाणात कमी होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

या प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बालकांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे अधोरेखित केले. मुलांचे संरक्षण हे राज्याचे कर्तव्य आहे. कर्करोगासारख्या गंभीर आजाराविरुद्ध लढण्यासाठी लवकर निदान, परवडणारे उपचार आणि जनजागृती या गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत. शासन आणि समाज यांनी एकत्रितपणे पुढाकार घेतल्यास या समस्येवर प्रभावी मात करता येईल, असे ते म्हणाले.



टाटा मेमोरियल सेंटरने बालकांच्या कर्करोग उपचारांसाठी, विशेषतः शस्त्रक्रियांच्या खर्चासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदतीची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर बीपीसीएल फाऊंडेशनने आपल्या सामाजिक दायित्व (एऐं) उपक्रमांतर्गत निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे उपचारांचा आर्थिक भार कमी होणार असून अधिकाधिक बालकांना वेळेत उपचार मिळण्यास मदत होईल.

मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, गरजू रुग्णांना तातडीची आर्थिक मदत मिळवून देणे आणि संपूर्ण प्रक्रिया अधिक कार्यक्षम बनवणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या कराराच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी त्यांच्या नेतृत्वाखाली महत्त्वपूर्ण भूमिका पार पडली आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील आरोग्यसेवेचा दर्जा उंचावण्यास मदत होणार असून, कर्करोगाशी झुंज देणाऱ्या बालकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडविण्याची आशा व्यक्त करण्यात येत आहे.

# कापसाच्या ढिगाऱ्यातून उसळली ज्वाला

## देवळीतील साबाजी जिनिंग थोडक्यात बचावले

**देवळी जनमाध्यम :** शहरातील साबाजी जिनिंगमध्ये रविवारी उशिरा रात्री अचानक लागलेल्या आगीने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण केले. रात्री सुमारे अकराच्या सुमारास कापूस रेच्यातून ठिणगी उसळली आणि क्षणार्धात आगीने रौद्ररूप धारण केले. परिसरातील कापूस व रुई जळून खाक झाली, मात्र वेळीच धावून आलेल्या अग्निशामक दलामुळे मोठा अनर्थ टळला.



घटनेची माहिती मिळताच देवळी नगर परिषदेच्या अग्निशामक दलाने क्षणाचाही विलंब न लावता घटनास्थळी धाव घेतली. अग्निशामक जवानांनी तत्परतेने पाण्याच्या फवाऱ्यांचा मारा करत आगीवर नियंत्रण मिळवले. स्थानिक नागरिक आणि कामगारांनीही जीवाची पर्वा न करता मदतीचा हात पुढे केला. या सामूहिक प्रयत्नांमुळे आगीचा विस्तार थांबवण्यात यश आले.

आगीत कापसाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून जिनिंग मालकाला आर्थिक फटका बसला आहे. मात्र, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. नुकसानीचा नेमका आकडा अद्याप स्पष्ट झालेला नाही.

दरम्यान, आग नेमकी कशामुळे लागली याचा तपास सुरू असून प्राथमिक अंदाजानुसार कापसाच्या रेच्यातूनच ठिणगी पडून आग भडकली असावी, असे सांगितले जात आहे.

या घटनेमुळे औद्योगिक परिसरातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अग्निशामक यंत्रणा आणि स्थानिकांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला असला, तरी अशा घटना टाळण्यासाठी अधिक खबरदारीची गरज असल्याची चर्चा शहरात रंगत आहे.

# वर्ध्यात दुहेरी हत्याकांड;

## अल्पवयीन आरोपी बालसुधारगृहात

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील महिलाश्रम परिसरात घडलेल्या दुहेरी हत्याकांडाने खळबळ उडाली असून, काका आणि चुलत भावाचा चाकूने वार करून खून करणाऱ्या अल्पवयीन आरोपीची बालसुधारगृहात रवानगी करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रितेश प्रभाकर भलमे (२५) व प्रभाकर फुलचंद भलमे (५४), दोघेही रा. बरबडी, हे लग्नसोहळा आटोपून ट्रॅव्हल्सने परतत होते. महिलाश्रमजवळील हनुमान मंदिर परिसरात उतरल्यावर दबा धरून बसलेल्या अल्पवयीन मुलाने रितेशवर चाकूने वार केले. त्याला वाचवण्यासाठी पुढे सरसावलेल्या प्रभाकर भलमे यांच्यावरही आरोपीने हल्ला चढवला. या घटनेत दोघांचा मृत्यू झाला. या प्रकरणी शहर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपी आणि मृतकांमध्ये जागेच्या वादातून निर्माण झालेल्या वैमनस्याची माहिती समोर आली. यापूर्वी हा वाद सेवाग्राम पोलिस ठाण्यात पोहोचला होता. दोन्ही बाजूंनी तक्रारी दाखल झाल्या होत्या.

दरम्यान, आरोपीने काही दिवसांपूर्वी ऑनलाईन चाकू खरेदी करून हल्ला केल्याची कबुली दिली आहे. पोलिसांनी त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याची बालसुधारगृहात रवानगी करण्याचे आदेश दिले.

या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पुढील तपास सुरू आहे.

# आजपासून आजनसरात संत भोजाजी महाराज पुण्यतिथी महोत्सव

**आजनसरा जनमाध्यम :** श्रीक्षेत्र आजनसरा येथे संत भोजाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त ७ ते १४ एप्रिलदरम्यान भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. भागवतकार कथाव्यास युवराज महाराज यांच्या वाणीतून कथा होणार आहे.

मंगळवारी सकाळी ८ वाजता रामाजी पर्बत यांच्या हस्ते कलश स्थापना व वीणा पूजनाने महोत्सवाची सुरुवात होईल. दररोज पहाटे काकडा आरती, सकाळी व रात्री भागवत कथा, तसेच दुपारी कीर्तन, भजन व हरिपाठाचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहात विविध कीर्तनकारांची उपस्थिती राहणार असून १२ एप्रिल रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते समाधीस्थळी अभिषेक व महापूजा होणार आहे.

भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मोई (तांडा) गावात दूषित पाण्याचा कहर; आरोग्य धोक्यात

## नवीन विहीर खोदण्यासाठी निधी उपलब्ध करून द्याः गावकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली मागणी

**आष्टी शहीद जनमाध्यम** तालुक्यातील घनदाट जंगलात वसलेल्या मोई (तांडा) गावात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. वन तलावातील विहिरीतून पाईपलाईनद्वारे येणारे पाणी दूषित होत असल्याने गावकऱ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.



गावकऱ्यांनी गट विकास अधिकारी रामटेके यांना निवेदन देऊन नवीन विहीर मंजूर करून शुद्ध पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे. मोई (तांडा) येथे पिण्याच्या पाण्याची समस्या अनेक वर्षांपासून कायम आहे. यापूर्वी ग्रामस्थांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकल्यानंतर शासनाने पाणीपुरवठा योजना मंजूर केली होती. मात्र सध्या सुरू असलेली योजना अपुरी ठरत असून नागरिकांना दूषित पाणी पिण्याची वेळ आली आहे.

वन तलाव परिसरातील विहिरीत जनावरांचे अवशेष, साचलेली घाण आणि दूषित पाणी मिसळत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. तसेच पाणी शुद्धीकरण यंत्रणा बंद पडल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. परिणामी गावात विविध आजार पसरत असल्याचे दिसून येत आहे.

माजी उपसरपंच किसन महाराज चव्हाण, गजानन चव्हाण, बालकिसन राठोड, अंकुश चव्हाण, मनोज चव्हाण आदींनी प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.दरम्यान, गट विकास अधिकारी रामटेके यांनी गावाला भेट देऊन समस्या सोडवण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र प्रत्यक्षात उपाययोजना केव्हा होणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# सिंदीविहीरी जवळ दोन सख्या बहिणींचा बालविवाह थांबविला

## कारंजा तालुक्यात बालविवाह प्रतिबंधक कारवाई यशस्वी

**वर्धा जनमाध्यम :** महिला व बाल विकास विभागाच्या समन्वयाने कारंजा तालुक्यातील एका शेतातील कुटुंबात आयोजित दोन अल्पवयीन बहिणींच्या बालविवाहावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. तालुक्यातील सिंदीविहिरी ग्रामपंचायतीच्या हद्दीत एका छोट्याशा गावापासून अंदाजे ३ किमी अंतरावर शेतात राहणाऱ्या कुटुंबातील दोन सख्या बहिणींचा विवाह आयोजित करण्यात आला होता.

यातील एक बालिका १४ वर्षे तर दुसरी १५ वर्षांची आहे. बालविवाहाची गोपनीय माहिती चाईल्ड हेल्पलाइनचे जिल्हा समन्वयक आशिष मोडक यांना मिळाली होती. माहितीची पडताळणी करून त्यांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तृप्ती चव्हाण यांना कळविली. त्यांच्या मार्गदर्शनाने आणि आदेशाने पोलिस स्टेशन कारंजाचे पोलिस निरीक्षक प्रल्हाद मदन यांच्यासोबत समन्वय साधून थेट घटनास्थळी जाऊन प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.



ग्रामपंचायत सिंदीविहिरीचे अधिकारी व कर्मचारी तसेच बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी सचिन शिंदे यांच्या मार्फत बालिकांच्या पालकांकडून विवाह थांबविण्याबाबतचा जबाबनामा लिहून घेण्यात आला. सदर कारवाई जिल्हा बाल संरक्षण अधिकारी महेश कामडी, चाईल्ड हेल्पलाइनचे जिल्हा प्रकल्प समन्वयक आशिष मोडक व संरक्षण अधिकारी नितीन जुगनाके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या कारवाईत पोलिस स्टेशन कारंजा येथील निलेश मैदपवार, मंगेश निलके, समाधान पांडे, चाईल्ड हेल्पलाइनच्या समुपदेशक माधुरी शंभरकर, अंगणवाडी सेविका सविता इवनाथे, ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्टचे माधुरी थूल व वैभव भांदककर, पोलिस पाटील मारोती ठोले व आशा वर्कर ललिता भारंगे यांचा सहभाग होता.

पालकांनी आपल्या पाल्यांचे बालविवाह करू नये. बालविवाह होत असल्याचे आढळल्यास चाईल्ड हेल्पलाईन १०९८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तृप्ती चव्हाण यांनी कळविले.

# हिंगणघाटात भाजप स्थापना दिन उत्साहात साजरा

**हिंगणघाट जनमाध्यम :** भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिवस सोमवारी देशभर उत्साहात साजरा करण्यात आला.



त्याच अनुषंगाने हिंगणघाट शहरात आमदार समीर कुणावार यांच्या जनसंपर्क कार्यालयातही स्थापना दिन साजरा करण्यात आला.

आमदार कुणावार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात पक्षाच्या वाटचालीचा आढावा घेण्यात आला.

तसेच आगामी काळात संघटन अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमास नगराध्यक्ष प्रा. डॉ. नयना उमेश तुळसकर, जिल्हा भाजपा उपाध्यक्ष किशोर दिघे, जिल्हा भाजपा महामंत्री आकाश पोहाणे, गटनेते भूषण पिसे, पाणीपुरवठा सभापती सौ. रवीला आखाडे, उपाध्यक्ष निलेश ठोंबरे, बांधकाम सभापती चंदू माळवे, स्वास्थ सभापती संजय माडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी नगरपरिषद सदस्य, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती लाभली. कार्यक्रमात पक्षाच्या विचारधारेवर आधारित जनसेवा अधिक प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प करण्यात आला. उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

# फसव्या मेसेजने निवृत्त अधिकाऱ्यांचे उडवले ४.५६ लाख रुपये

## वर्ध्यात धक्कादायक प्रकार : सायबर पोलिसांकडे तक्रार, तपास सुरू

**वर्धा जनमाध्यम :** ऑनलाईन फसवणुकीच्या वाढत्या घटनांमध्ये आता निवृत्त अधिकारीही सुरक्षित नसल्याचे धक्कादायक वास्तव वर्ध्यात समोर आले आहे. पेन्शन कार्डच्या आमिषाला बळी पडलेल्या एका ७१ वर्षीय निवृत्त अधिकाऱ्याला तब्बल ४ लाख ५६ हजार ५५८ रुपयांचा आर्थिक फटका बसला आहे. अशोककुमार शुक्ला (रा. बेद ले-आउट) असे पीडित अधिकाऱ्याचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्ला यांच्या मोबाईलवर इंडुसइंड बँकेच्या कथित पेन्शन कार्ड योजनेबाबत आकर्षक संदेश आला होता. औषधांवर ३० टक्के, पेट्रोलवर १५ टक्के व रेल्वे तिकिटांवर ३० टक्के सवलतीचे आमिष दाखवत हा सापळा रचण्यात आला होता. सुरुवातीला त्यांनी दुर्लक्ष केले; मात्र दोन दिवसांत कार्ड घरी पोहोचेल, असा संदेश आल्याने त्यांनी त्यावर विश्वास ठेवला.

यानंतर पाठविण्यात आलेल्या लिंकवर क्लिक करून त्यांनी स्वतःची वैयक्तिक व बँकिंग माहिती भरून संबंधित नंबरवर पाठविली. यानंतर अवघ्या काही तासांत त्यांच्या ए.यू. बँकेच्या क्रेडिट कार्डमधून १.५० लाख रुपये 'फ्लिपकार्ट', १.९० लाख रुपये 'सेफ गोल्ड' आणि १.१६ लाख रुपये पुन्हा 'फ्लिपकार्ट'कडे वळते झाल्याचे संदेश त्यांना प्राप्त झाले.

आपण कोणतीही खरेदी केली नसतानाही मोठी रक्कम वळती झाल्याचे लक्षात येताच शुक्ला यांनी तात्काळ सायबर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदविली. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून, आमिषांच्या जाळ्यात अडकू नका, असा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे.

# विकासासाठी दिल्ली ते श्रीनगर धाव; खासदार अमर काळेंचा अभ्यास दौरा

**वर्धा जनमाध्यम :** जनतेच्या विकासाचा ध्यास घेतलेले वर्ध्याचे खासदार अमर काळे आता संसदीय स्थायी समितीच्या अभ्यास दौऱ्यासाठी श्रीनगरकडे रवाना होत आहेत. शिक्षण, महिला व बालकल्याण, युवक कल्याण आणि क्रीडा या महत्त्वाच्या क्षेत्रांवर काम करणाऱ्या या समितीचा दौरा ७ ते ९ एप्रिलदरम्यान पार पडणार असून या काळात खासदार काळे मतदारसंघात उपस्थित राहू शकणार नाहीत.

या दौऱ्यात उच्च शिक्षण संस्था, केंद्रीय विद्यापीठ, शालेय शिक्षण विभाग, युवक व क्रीडा विभाग तसेच सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधत विविध योजनांची अंमलबजावणी, अडचणी व सुधारणा यावर चर्चा होणार आहे.

वर्ध्याचा विकास हा माझा संकल्प आहे, या भूमिकेतून खासदार काळे या दौऱ्यातून मिळणारे अनुभव आणि माहिती मतदारसंघाच्या प्रगतीसाठी उपयोगात आणणार असल्याचे सांगितले जात आहे.



दिल्लीपासून श्रीनगरपर्यंतचा हा अभ्यास प्रवास वर्ध्यासाठी नवी दिशा ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.


## जाहीर नोटीस

माझी पक्षकार कु. अक्षयता गजानन सोरते ही मौजा पिपरी मेघे, ता. व जि. वर्धा येथील खाली नमूद केलेल्या मालमत्तेची मालकीण आहे. सदर मालमत्ता मौजा क्र. ८७, पी.एच. क्र. १९, फील्ड सर्व्हे क्र. २९९ मधील प्लॉट क्र. २१ च्या उत्तर बाजूचा भाग, क्षेत्रफळ १११.५२ चौ. मी. (१२००.०० चौ. फूट) अशी आहे.

**सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत,**
**पूर्व : ६ मीटर लेआउट रस्ता,**
**पश्चिम : प्लॉट क्र. २२,**
**उत्तर : प्लॉट क्र. २६,**
**दक्षिण : प्लॉट क्र. २१ चा उर्वरित भाग,**

श्री. गजानन रामाजी सोरते यांनी प्लॉट क्र. २१ च्या उत्तर बाजूचा भाग, क्षेत्रफळ १११.५२ चौ. मी. (१२००.०० चौ. फूट) हा आपल्या मुलगी कु. अक्षयता गजानन सोरते हिच्या नावे दिनांक २४/०९/२०२० रोजी दस्त क्र. २१३०/२०२० अन्वये उपनिबंधक कार्यालय, वर्धा येथे भेटपत्र (Gift Deed) करून दिलेला आहे व त्यानुसार कु. अक्षयता गजानन सोरते हिचे नाव सदर मालमत्तेवर विधिवत नोंद झालेले आहे.

कु. अक्षयता गजानन सोरते हिने वरील मालमत्तेबाबत प्लॉट क्र. २१ च्या उत्तर बाजूचा भाग, क्षेत्रफळ १११.५२ चौ. मी. (१२००.०० चौ. फूट) संदर्भात श्री. ललित हरिभाऊ बरखडे व श्री. विजय हरिभाऊ बरखडे यांच्यासोबत विक्री करार (Sale Agreement) केलेला आहे. तसेच श्री. ललित हरिभाऊ बरखडे व श्री. विजय हरिभाऊ बरखडे यांनी Piramal Finance Limited येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

माझ्या पक्षकारांचा मूळ लिंक दस्त दिनांक २८/०१/२००२, दस्त क्र. ४३२/२००२ हरवलेला आहे.

याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत असल्यास किंवा वरील नमूद मूळ लिंक दस्त कोणास सापडल्यास, सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड. आर. आर. तिवारी**
रामनगर, वर्धा
मो. नं. ९८२२४२६१६८



## जाहीर नोटीस

माझे पक्षकार श्री. विजय बाबुराव काळे हे मौजा उमरी मेघे, ता. व जि. वर्धा येथील खाली नमूद केलेल्या मालमत्तेचे मालक आहेत. सदर मालमत्ता ग्रामपंचायत उमरी मेघे हद्दीत येणारी असून फील्ड सर्व्हे क्र. ६७-३, ६७ मधील प्लॉट क्र. ४१ च्या दक्षिण बाजूचा भाग, क्षेत्रफळ ८८.२२ चौ. मी. (९६०.०० चौ. फूट) अशी आहे.

**सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत :**
**पूर्व : लेआउट रस्ता**
**पश्चिम : फील्ड सर्व्हे क्र. ६७**
**उत्तर : उर्वरित प्लॉटचा भाग**
**दक्षिण : प्लॉट क्र. ४०**

सौ. अनिता संजय अटकारे यांनी प्लॉट क्र. ४१ च्या दक्षिण बाजूचा भाग, क्षेत्रफळ ८८.२२ चौ. मी. (९६०.०० चौ. फूट) हा दिनांक ११/११/२०१३ रोजी दस्त क्र. ८१३१/२०१३ अन्वये उपनिबंधक, वर्धा यांच्या कार्यालयात माझे पक्षकार श्री. विजय बाबुराव काळे यांच्या नावे विक्रीखताद्वारे हस्तांतरित केला असून त्यानुसार सदर मालमत्तेवर त्यांचे नाव विधिवत नोंद झालेले आहे.

माझ्या पक्षकारांचा मूळ लिंक विक्रीखत दिनांक ०९/०३/२०१०, दस्त क्र. २०८४/२०१० हरवलेला आहे. तसेच माझ्या पक्षकारांनी Muthoot Housing Finance Company Limited येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत असल्यास किंवा वरील नमूद मूळ लिंक विक्रीखत कोणास सापडल्यास, सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड. आर. आर. तिवारी**
रामनगर, वर्धा
मो. नं. ९८२२४२६१६८

# खरात प्रकरणातील महिलांना मानसिक धक्का

■ मानसोपचार तज्ज्ञांकडून उपचार सुरू

■ व्हीडीओ व्हायरल झाल्याने मरणयातना



**नाशिक /प्रतिनिधी :** नाशिकचा भोंदू अशोक खरात प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवली असून त्यात त्याने अनेक महिलांसोबत लैंगिक संबंध ठेवल्याचे उघड झाल्याने बहुतांश महिलांची मानसिक स्थिती बिघडल्याचे समोर आले आहे. खरातच्या केबिनमधील काही व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

अशोक खरातने ज्या महिलांसोबत लैंगिक संबंध ठेवल्याचे व्हीडीओमधून समोर आले आहे, त्यातील १५-२० महिला मानसोपचार तज्ज्ञांकडून उपचार घेत असल्याची माहिती समोर आली आहे. या महिलांना आपली बदनामी झाल्याने एकटे पडल्याची भावना भेडसावत आहे. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी नेमण्यात आलेल्या विशेष तपास पथकाकडून महिलांना कोणतेही दडपण येउ नये, तसेच त्यांना पूर्णपणे सुरक्षित ठेवण्याची ग्वाही देण्यात आली आहे. तसेच या महिलांना न्याय मिळवून देण्यात येईल असे आश्वासनही देण्यात आले आहे.

**व्हायरल करणा-यांवर नजर**

अशोक खरात प्रकरणातील महिलांची ओळख उघड होउ नये म्हणून या महिलांची चौकशी देखील अज्ञातस्थळी नेउन केली जात आहे. अशोक खरात आणि महिलांचे व्हीडीओ व्हायरल करणा-यांवर कठोर कारवाई करत गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. तसेच सायबर पोलिसांकडून आक्षेपार्ह व्हीडीओ व्हायरल करणा-यांवर सातत्याने नजर ठेवली जात आहे.

**खरातचा मुलगाही फरार**

अशोक खरात प्रकरणाचा तपास करत असलेल्या विशेष तपास पथकाला मोठा धक्का बसला आहे. अशोक खरातची पत्नी फरार आहेच, त्यात आता त्याचा मुलगाही फरार झाल्याची माहिती समोर आली आहे. काही दिवसांपूर्वीच पोलिसांनी अशोक खरातच्या मुलाला ताब्यात घेउन चौकशी केली होती. चौकशीनंतर त्याला घरी सोडण्यात आले होते. मात्र, आता त्याचा मोबाइल नोट रिचेबल येत असल्याने तोही पळून गेल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, अशोक खरातची पत्नी कल्पना खरातच्या विरोधात लुकआउट नोटीस जारी करण्यात आली असून तिचा शोध घेणे सुरू आहे.

# अशोक खरातचे समताचे व्यवहार आणि अजितदादांच्या अपघाताचा संबंध असण्याची दाट शक्यता



**मुंबई/प्रतिनिधी :** समता नावाची एक पतसंस्था आहे, त्या संस्थेत पैसे भरले किंवा काढले की मेसेज येतो. मी ही सगळी माहिती दाते सरांना देणार होते. मी जी माहिती मांडली आहे ती मी आज दुपारी त्यांना देणार आहे. सगळं काही दाते सरांना मी सांगितलं आहे असं अंजली दमानिया म्हणाल्या. राजकारण एका बाजूला ठेवा, अशोक खरातच्या विरोधात आपला लढा द्यायचा आहे हे आरोप करणा-यांनी विसरु नये असंही अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे.

**अजित पवारांच्या अपघाताशी संबंध?**

या व्यवहाराचा आणि अजित पवारांच्या अपघाताचा काही संबंध आहे असं वाटतं आहे का? असं विचारलं असता अंजली दमानिया म्हणाल्या की त्याची दाट शक्यता आहे. अमुक दिवशी किती मेसेज आलेत ते पाहिलं. दिवसाला १९ मेसेज कसे आले? समता संस्थेत काय व्यवहार झाला? याची माहिती समोर आली पाहिजे असं अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे.

**समता संस्थेबाबत अंजली दमानियांनी काय माहिती दिली?**

समता संस्थेत १ एप्रिल २०२५ ते १७ मार्च २०२६ या कालावधीत कधी एक मेसेज यायचा, कधी दोन कधी पाच. मात्र अजित पवारांचा अपघात झाला त्याच्या एक दिवस आधी १७ मेसेज होते. २७ जानेवारी २०२६ ला १७ मेसेज आले होते. २८ जानेवारीला अजितदादांचा अपघात झाला त्यादिवशी १९ मेसेज आहेत. २९ जानेवारीला १० मेसेज आले आहेत. ३० जानेवारीला ८ मेसेज आहेत, ३१ जानेवारीला ८ मेसेज आहेत. हे दिवसाचे मेसेज आहेत. महिन्यातही जेवढे मेसेज येत नव्हते तेवढे या चार दिवसांत आले आहेत. याच्यात काय झालं त्याची चौकशी झाली पाहिजे. हे सगळे व्यवहार कुणी केले, पैशांची देवाणघेवाण कुणी केली? हे सगळं एसआयटीने शोधलं पाहिजे अशी माझी मागणी आहे असं अंजली दमानिया म्हणाल्या आहेत. २७ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत सर्वाधिक मेसेज आले आहेत. पैशांची देवाणघेवाण झाली आहे, हे पैसे अशोक खरातला आले आहेत की पैसे काढले गेले, की फिरवले गेले हे सगळं यंत्रणेने शोधावं अशी माझी मागणी आहे, असं अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे.

# अशोक खरातचे सीडीआर आणि संबंधित नावं कशी



## अंजली दमानियांनी प्रात्यक्षिक दाखवत दिली माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :** मागच्या चार ते पाच दिवसांपासून वेगवेगळ्या लोकांकडून प्रतिक्रिया येत आहेत. विषय काय? मी मांडलं काय? लोक काय बोलत आहेत. ३१ मार्च ते काल रात्रीपर्यंत मी मुंबईत नव्हते. त्यामुळे मी माध्यमांशी बोलू शकले नाही. माझी प्रतिक्रिया देण्यासाठी पत्रकार परिषद घेत आहे असं अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे आणि सगळ्या टीका करणा-या नेत्यांना उत्तर दिलं आहे.संजय राउत म्हणाले की मी रॉ ची एजंट आहे का? सुषमा अंधारे तर कायमच माझ्यावर टीका करत आहेत. मला भाजपाच माहिती देते आहे वगैरे सगळं सांगतात.अहो सुषमाताई साधं क्लाउड नावाचं ॲप आहे. त्यात सगळ्या गोष्टी मिळतात. ३१ मार्चच्या दुपारी १२ च्या सुमारास मला एका व्यक्तीचा मेसेज आला की मी अमुक अमुक आहे, माझ्याकडे अशोक खरातांची माहिती आहे, मला ती तुम्हाला द्यायची आहे. मी तुम्हाला फोन करु का विचारलं तेव्हा मी त्यांना हो म्हटलं. त्या व्यक्तीने मला फोन केला. त्यांनी मला सांगितलं की मी तुमची पत्रकार परिषद नेहमी बघतो, मला वाटतं की माझ्याकडे अशोक खरातचा सीडीआर आहे. मी त्यांना विचारला प्रश्न की तुम्ही कोण? तर त्या माणसाने त्याची ओळख खासगी गुप्तहेर अशी करु न दिली. त्या व्यक्तीने मला त्याचं नाव त्याच्या कंपनीचं नावही सांगितलं, मी दुस-या नंबरवरु न सगळे तपशील पाठवतो असंही सांगितलं. साधारण १२.४९ च्या सुमारास त्या व्यक्तीच्या दुस-या फोन नंबरवरु न मला एक्सएल शिट पाठवण्यात आलं. त्यात अनेक तपशील होते. त्याच्या कंपनीच्या वेबसाईटवर गेले, तिथे संपर्काचा नंबर दिला होता तो नंबर मी क्लिक केला तेव्हा तो माझ्या व्हाट्स ॲपवर गेला. त्यावरु न कळलं की समोरचा माणूस खोटं बोलत नाहीये. ती सगळी माहिती खरी होती. असं अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे. तसंच ही माहिती मी दाते सरांना दिली होती असंही त्या म्हणाल्या.

**कुणाची नावं घेतली आणि काय सांगितलं?**

**देवेंद्र फडणवीस**-एकही कॉल नाही
**उदय सामंत**- एकही कॉल नाही
**पंकजा मुंडे**-एकही कॉल नाही
**रामदास कदम**-एकही कॉल नाही
**सुषमा अंधारे**- एकही कॉल नाही
**धनंजय मुंडे**- एकही कॉल नाही
**संजय राउत**-एकही कॉल नाही
**बच्चू कडू**- एकही कॉल नाही
**राम कदम**-एकही कॉल नाही
**चित्रा वाघ**-एकही कॉल नाही
**प्रवीण दरेकर**-एकही कॉल नाही
**गिरीश महाजन**-एकही कॉल नाही

## रुपाली चाकणकर आणि सुनील तटकरेंचे सर्वात जास्त कॉल्स

अशा सगळ्यांची नावं मी घेतली होती. ज्यांचे नंबर मिळाले नाहीत त्यांच्या नावापुढे क्रॉस केलं आणि ज्यांचे नंबर मिळाले त्यांची नावं घेतली. लगेच माझ्यावर आरोप करण्यात आले. यात भाजपाचं नाव कसं काय नाही वगैरे विचारण्यात आलं. आम्ही फालतू राजकारण नाही. मिलिंद नार्वेकरांचे आठ कॉल आहेत, अंधारेंनी त्याचे तपशील का मागितले नाहीत? असा सवाल अंजली दमानियांनी केला आहे. मी जेव्हा शोधलं तेव्हा रु पाली चाकणकरांचे पानं भरु न फोन कॉल आहेत, सुनील तटकरेंचे फोन कॉल आहेत. सगळी माहिती तपशीलवार येते. १ एप्रिल २०२५ ते १७ मार्च २०२६ या कालावधीतले हे कॉल आहेत असंही अंजली दमानिया म्हणाल्या आहेत.

**काही नंबर माझ्याकडे होते, काही पत्रकारांना मागितले-**अंजली दमानिया

माझ्याकडे आलेलं एक्सएल शिट क्लाउडवर पोस्ट केलं. AI चं हे साफ्टवेअर आहेत. त्यावरु न मला ही सगळी माहिती मिळाली. तसंच हा सीडीआर आहे असंही कळलं असं म्हणत अंजली दमानियांनी क्लाउड शिट या ॲपवर पोस्ट केलं. त्याने मला ही सगळी माहिती दिली. त्यानंतर दुस-या दिवशी दाते सरांना मी तो मेसेज पाठवला. त्यांना मी काय घडलं होतं त्याची कल्पना दिली. मी बेकायदेशीर गोष्टी कुणाकडूनही मागत नाही. माझ्याकडे जी माहिती आली ती मी दाते सरांना, मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवली. काही नंबर माझ्याकडे होते, काही नंबर मी पत्रकारांना विचारले. ज्यांची नावं मी घेतली त्या सगळ्यांचे तपशील मी एआयला दिले होते.

# आरटीई प्रवेशाची सोडत जाहीर

## राज्यात कोणत्या शाळेला सर्वाधिक पसंती?

**पुणे/प्रतिनिधी :** शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांसाठीच्या प्रवेश प्रक्रियेत पुण्यातील बिबवेवाडी येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूल या शाळेला सर्वाधिक पसंती मिळाली आहे. शाळेतील ६९ जागांसाठी २ हजार ९४ अर्ज दाखल झाले.राज्य शैक्षणिक संशोधन आणि परिषदेच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांच्या हस्ते आरटीई प्रवेशाची सोडत काढण्यात आली.प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, सहसंचालक रमाकांत काठमोरे, एनआयसीच्या आदिती एकबोटे, एससीईआरटीच्या सह संचालक डा. कमलादेवी आवटे, पुणे महापालिकेच्या शिक्षण



विभागाच्या प्रशासन अधिकारी सुनंदा वाखारे या वेळी उपस्थित होत्या. पुणे महापालिकेच्या राजीव गांधी ई लर्निंग स्कूलच्या विद्यार्थ्यांच्या हस्ते सोडत काढण्यात आली.गोसावी म्हणाले, ८ हजार ७०१ शाळांमध्ये १ लाख १४ हजार ८२६ जागा उपलब्ध झाल्या आहेत. त्यासाठी २ लाख ८९ हजार ६०९ अर्ज दाखल झाले आहेत. गेल्या वर्षी आरटीईअंतर्गत सर्वाधिक ८८ हजारांहून अधिक प्रवेश झाले होते. सोडतीनंतर आता दोन दिवसांत प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची यादी, प्रतीक्षा यादी जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रत्यक्ष प्रवेश सुरू केले जातील.सिंह म्हणाले, शिक्षण हा विकासाचे सर्वांत उपयुक्त माध्यम आहे. प्रत्येक खासगी शाळेला २५ टक्के राखीव जागा वंचित आणि दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे बंधन आहे. केवळ उच्च वर्गाच्या शाळा निर्माण होउ नये, समावेशकता असावी हा कायद्याचा उद्देश्य आहे. गेल्या काही वर्षांत आरटीईमार्फत लाखो विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे. त्याशिवाय जिल्हा परिषद, नगरपालिका, महापालिका शाळाही गुणवत्तापूर्ण आहेत.गेल्या काही वर्षांत काही गैरप्रकार लक्षात आले आहेत, त्यावर उपाययोजना करण्यात आली. खोटी माहिती दिलेल्या पालकांवर कारवाई करण्यात आली. प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवणारे एजंट निर्माण झाले आहेत. मात्र, अशा कोणावरही पालकांनी विश्वास ठेवू नये. या प्रवेश प्रक्रियेत मानवी हस्तक्षेप नाही, संपूर्णपणे ऑनलाइन चालणारी प्रक्रिया आहे. गैरप्रकार आढळल्यास तक्रार करण्यासाठी दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून देण्यात येईल, असे सिंह यांनी सांगितले.

# युद्धाची झळ आता स्वंयपाक घरापर्यंत

**मुंबई/प्रतिनिधी :** आखाती देशांमध्ये सध्या सुरु असलेल्या युद्धाचा फटका दिवसेंदिवस महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसताना दिसत आहे. या युद्धजन्य परिस्थितीचे भीषण परिणाम महाराष्ट्रातील शेती आणि पूरक व्यवसायांवर होउ लागला आहे. आंतरराष्ट्रीय जलमार्गातील अडथळे आणि वाढलेल्या वाहतूक खर्चामुळे ज्वारी,लाल मिरची, टरबूज, कांदा आणि पोल्ट्री उत्पादनांची निर्यात पूर्णपणे कोलमडली आहे. याचा थेट परिणाम बाजारभावावर झाला आहे. त्यामुळे शेतकरी आणि उद्योजक मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.आखाती देशांतील युद्धमुळे दिवसेंदिवस महागाई वाढत आहे. ज्वारीचे उत्पादन घटले तर मिरचीला अवकाळीचा दणका बसला. इराण अमेरिका युध्दामुळे खाद्यतेलाचे भाव वाढले आहेत. मंगळवेढा (जि. सोलापूर) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत यंदाच्या रबी हंगामात ज्वारीने आघाडी घेतली आहे. इतिहासात प्रथमच ज्वारीला प्रतिक्विंटल तब्बल ४ हजार ५०० रुपयांपासून ते ५ हजार ३०० पर्यंत उच्चांकी दर मिळाला आहे. यंदा गहू, मका, बाजरी यांसारख्या पिकांच्या तुलनेत ज्वारीला अधिक भाव मिळत असून, मालदांडी ज्वारीला विशेष मागणी असल्याचे दिसून येत आहे. उत्तम प्रतीच्या ज्वारीला साडेचार हजार रुपयांपर्यंत दर मिळत असून, सरासरी दर्जाच्या ज्वारीस ४५०० रु पयांपासून भाव मिळत आहे. शेतक-यांनी मालाची गुणवत्ता टिकवून ठेवली तर पुढील काही काळही ज्वारीला चांगला भाव मिळण्याची शक्यता आहे.



**खाद्यतेलाच्या दरात वाढ-**धान्यासोबतच तेलाच्या दरातही वाढ झाली आहे. सोयाबीनच्या तेलात तब्बल ३० ते ३५ रु पयांनी वाढ झाली आहे. आधी तेल १३० ते १३५ रु पये किलो होते.आता १७० रु पये किलो झाले आहे. तसेच शेंगदाणा तेलाचे दर ३० रु पयांनी वाढले आहे. आधी १७० रु पये किलो असलेले दर २०० रु पये झाले आहे.

मिरची किलोमागे शंभर रु पयांनी वाढली

एकीकडे उन्हाचापारा वाढल्याने नागरिकांना चटके सहन करावे लागत असताना दुसरीकडे लाल मिरचीने ग्राहकांचे तोंड होरपळून निघाले आहे. गेल्या आठवड्यापेक्षा मिरचीच्या दरात सरासरी प्रतिकिलो शंभर रु पयांची वाढ झाली आहे. खरीप हंगामातील मिरचीला पावसाने फटका बसला आणि त्यानंतरच्या हंगामावरही अवकाळीचे पाणी पडल्याने आवक कमी झाली आहे. मे महिन्यात मिरचीला सर्वाधिक मागणी असते. मात्र यंदा तेवढी आवक शक्य नाही. त्यामुळे, एप्रिलपेक्षा मे महिन्यात किलोमागे किमान ५० रु पयांची वाढ होईल, असा अंदाज व्यापा-यांचा आहे.

**टरबूजाला केवळ ३ ते ४ रु पये प्रतिकिलो दर-**यंदा टरबूजाचे विक्रमी उत्पादन झाले होते. मात्र, ऐन हंगामात निर्यात बंद झाल्याने बाजारपेठेत शुकशुकाट पाहायला मिळत आहे. अनेक निर्यातदार व्यापा-यांनी पाठ फिरवल्यामुळे टरबूजाला केवळ ३ ते ४ रुपये प्रतिकिलो दर मिळत आहे. लागवड, खते आणि मजुरीचा विचार करता शेतक-यांना साधा उत्पादन खर्चही काढणे कठीण झाले आहे.

कांद्याच्या दरात मोठी घसरण

तर दुसरीकडे आशियातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या लासलगावमध्ये कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली आहे. यमन आणि इजिप्तमधून ट्रकद्वारे स्वस्त कांदा आखाती देशांत पोहोचत असल्याने भारतीय कांद्याची मागणी घटली आहे. युद्धामुळे जहाजांचे मार्ग बदलल्याने कंटेनर भाडे ६००-७०० डालरवरू न थेट ६५०० डालरवर पोहोचले आहे. यामुळे निर्यात करणे व्यापा-यांसाठी अशक्य झाले आहे.

**अंडी झाली स्वस्त**

आखाती देशांमध्ये होणारी अंड्यांची निर्यात युद्धामुळे पूर्णपणे बंद झाली आहे. यामुळे भारतातील अंडी साठ्याचा पुरवठा स्थानिक बाजारात वळवण्यात आला आहे. एका अंड्याचा उत्पादन खर्च साधारण ५ रु पये असताना सध्या बाजारात अंड ३.५० ते ४ रु पयांना विकले जात आहे. प्रत्येक अंड्यामागे व्यावसायिकांना १ ते १.५० रु पयांचा तोटा सहन करावा लागत आहे..

# नागपूरातील अथर्व नानोरेच्या हत्येचा उलगडा आरोपीचे नाव समोर येताच पोलिसांनाही बसला मोठा धक्का!

**नागपूर/प्रतिनिधी :** हनुमान जयंती शोभायात्रेतून अपहरण झाल्यानंतर अथर्व नानोरे या अवघ्या १४ वर्षांच्या शाळकरी मुलाचा खून झाल्याच्या घटनेने शहर हादरले होते. या हत्याकांडाचा अखेर सोमवारी गुन्हे शाखेने उलगडा केला. गिट्टीखदान पोलीस आणि गुन्हे शाखेने संयुक्त कारवाई करत तीनही मारेक-यांना अटक केली असून सर्व आरोपींचे वय २० ते २२ वर्षांच्या दरम्यान आहे. धक्कादायक बाब म्हणजे मुख्य आरोपी हा अथर्वचाच शेजारी असल्याचे समोर आले आहे.

जयराम गोपाल यादव (१९, रा. आयबीएमरोड, गिट्टीखदान), केतन उर्फ कुणाल रमेश साहू (२२, रा. कुतुबशाह मशिदीजवळ, गिट्टीखदान) आणि आयुष मोहन साहू(१९, रा. शिवशंकर मंदिरासमोर, मानकापूर) अशी मारेक-यांची नावे आहेत. हे तिन्ही आरोपी भाजीपाला विक्रीचे गाडे चालवत होते. ते पीडित मुलाच्या कुटुंबाच्या ओळखीचे होते.आरोपी अथर्वच्या वडिलांकडून हे तिघेही अनेकदा भाजीपाला खरेदी करत होते. त्यांचे काही पैसेही दिलीप यांना देणे होते. अथर्वचे वडील हे भाजीपाल्याचे घाउक विक्रेते आहेत आणि त्यांच्याकडे मोठी रोख रक्कम असते, याचीही आरोपींना कल्पना होती. याच लोभापोटी, घटनेच्या तीन दिवस आधी अथर्वचे अपहरण करण्याचा कट रचला होता. त्यासाठी आईसक्रीमचे आमिष दाखवून अथर्वला गर्दीतून आणण्याची जबाबदारी जयरामवर सोपवण्यात आली होती.

**आईस्क्रीमच्या बहाण्याने बाहेर नेले**



घटनेच्या दिवशी हनुमान जयंतीची शोभायात्रा सुरू असताना कटानुसार जयरामने अथर्वला आईस्क्रीमच्या बहाण्याने बाहेर नेले. जयरामने त्याला टाटा एस गाडीजवळ नेले. जिथे आयुष आणि कुणाल आधीच वाट पाहत होते. त्या तिघांनी अथर्वला बळजबरीने गाडीत कोंबले आणि अथर्वने आरडाओरडा करू नये म्हणून त्याच्या तोंडात कापडाचा बोळा कोंबला.

**अथर्व नानोरे हत्या प्रकरणातील आरोपी**

आरोपींनी गाडी गोरेवाड्याच्या दिशेने नेली. मात्र, गिट्टीखदान परिसरात सुरू असलेल्या गोंधळ आणि कोलाहलामुळे घाबरून त्यांनी कापडाच्या साहाय्याने अथर्वचा गळा आवळून खून केला. त्यानंतर, रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत त्यांनी ती गाडी रस्त्याच्या कडेला सोडून दिली आणि ते आपापल्या घरी निघून गेले. दरम्यान, अथर्वचा मृतदेह कळमेश्वर हद्दीत भरतवाडा परिसरात रिंगरोडलगत एका पोत्यात हात-पाय बांधलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेनंतर शहरात भीती आणि संतापाचे वातावरण पसरले होते.हत्याकांडानंतर आरोपी आपण काहीही केले नाही, अशा अविर्भावात अवती भवती फिरत होते.

**सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपासाला दिशा-**तपासादरम्यान अथर्व शेवटचा दोन मित्रांसोबत आईस्क्रीम पार्लरजवळ दिसल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर आरोपींनी त्याला सीसीटीव्ही कॅमेरे नसलेल्या ठिकाणी नेले. त्यामुळे हा गुन्हा पूर्वनियोजित असल्याचे तपासातून स्पष्ट झाले आहे. घटनास्थळी सापडलेल्या पोत्यावरील ट्रेडमार्क हा तपासातील महत्त्वाचा पुरावा ठरला. त्याच्या आधारे पोलिसांनी आरोपींपर्यंत पोहोचण्यात यश मिळवले. प्राथमिक चौकशीत वैयक्तिक वादातून ही हत्या झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. पुढील तपासात या भीषण हत्येमागील नेमके कारण उघड होण्याची शक्यता आहे.

**नेमके प्रकरण काय?-**हनुमान जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त गुरु वारी गिट्टीखदान परिसरात शोभायात्रा निघाली होती. अथर्व नानोरे हा तिथून बेपत्ता झाला. शोभायात्रा संपली तरी अथर्व घरी परतला नाही, तेव्हा कुटुंबीयांनी शोध घेतला. मात्र, त्यांना कोणताही मागमूस लागला नाही. कुटुंबीयांनी गिट्टीखदान पोलिसांकडे अथर्व बेपत्ता असल्याची तक्रार केली. शनिवारी दुपारी ३ वाजताच्या सुमारास, कळमेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भारतवाडा परिसरात, कोराडी-फेटरी बाह्यवळण रस्त्यावर एका बोअरवेलमध्ये अथर्वचा छिन्नविछिन्न मृतदेह आढळला. अथर्वची हत्या केल्यानंतर, मारेक-यांनी त्याचे हात-पाय बांधले. त्याचा मृतदेह बोअरवेलमध्ये कोंबला आणि रस्त्याच्या कडेला सोडून दिला. मृतदेह सापडल्याच्या बातमीने संपूर्ण शहर आणि पोलीस दलात खळबळ उडाली. पोलीस आयुक्त रवींद्र सिंगल यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करू न मृतदेह शवविच्छेदनासाठी मेयोत पाठवला. दरम्यान, मुलाच्या मृत्यूची बातमी समजताच, त्याच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आणि त्यांनी हंबरडा फोडला. या क्रू र हत्येमुळे परिसरातील रहिवाशांमध्येही संतापाचे आणि शोकाचे वातावरण होते.

# सरकारी कर्मचा-यांना पगारवाढीसाठी आता ट्रेनिंग अनिवार्य

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आठव्या वेतन आयोगाच्या प्रतीक्षेत असलेल्या सरकारी कर्मचा-यांसाठी आता पगारवाढीचा रस्ता 'ट्रेनिंग'मधून जाणार आहे. जर तुम्ही केंद्र सरकारचे कर्मचारी असाल, तर येते काही दिवस तुमच्यासाठी महत्त्वपूर्ण बदल घेउन येणारे आहेत. एका बाजूला आठव्या वेतन आयोगाबाबत चर्चांना उधाण आले असतानाच, दुस-या बाजूला सरकारने पदोन्नती आणि कामगिरी मूल्यमापनाच्या नियमांबाबत एक नवीन अट लागू केली आहे. केंद्रीय सरकारी कर्मचा-यांसाठी, वार्षिक कामगिरी मूल्यमापन अहवाल तयार करण्याची प्रक्रिया आता काहीशी अधिक आव्हानात्मक ठरू शकते. कार्मिक (सरकारी कर्मचारी, भरती प्रक्रिया, सेवा नियम आणि पेन्शन संबंधित कामकाज हे या मंत्रालयाच्या अखत्यारित येते.) राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी राज्यसभेत माहिती देताना सांगितले की, सर्व केंद्रीय सरकारी कर्मचा-यांसाठी तसेच अखिल भारतीय सेवांशी संबंधित अधिका-यांसाठीही Integrated Government Online Training पोर्टलवरील अभ्यासक्रम पूर्ण करणे आता अनिवार्य करण्यात आले आहे.याचा अर्थ असा की, कर्मचा-याची भूमिका आणि स्तर यांवर आधारित, विभाग काही विशिष्ट अभ्यासक्रम निश्चित करेल, जे पूर्ण करणे कर्मचा-यांना दरवर्षी अनिवार्य असेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या अभ्यासक्रमांची नोंद कर्मचा-याच्या वार्षिक कामगिरी मूल्यमापन अहवालामध्ये केली जाईल. हे अभ्यासक्रम पूर्ण करण्यात अपयशी झाल्यास, त्याचा त्यांच्या मूल्यमापनावर आणि पगारवाढीवर थेट परिणाम होउ शकतो. सर्व कर्मचारी आपल्या व्यावसायिक क्षमतांचे सातात्याने अद्ययावतीकरण करत राहतील, हे सुनिश्चित करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. आजकाल सरकारी नोक-यांमध्ये केवळ अनुभवच महत्त्वाचा राहिला नाही, तर सतत शिकत राहणेही अत्यावश्यक बनले आहे. यामुळे कर्मचा-यांची कौशल्ये विकसित होतील. कामाचा दर्जाही सुधारेल आणि पदोन्नतीच्या संधीही वाढतील.



**८ व्या वेतन आयोगाची प्रतीक्षा: पगारवाढ कधी होणार?**

सध्या, लाखो कर्मचारी आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीची आतुरतेने वाट पाहत आहेत. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, सरकारने नोव्हेंबर २०२५ मध्ये या आयोगाची स्थापना केली होती. आपला अहवाल आणि शिफारशी सादर करण्यासाठी आयोगाला १८ महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. आयोगाकडून आपला अहवाल २०२७ च्या पहिल्या सहामाहीपर्यंत सरकारकडे सादर केला जाईल, अशी अपेक्षा आहे.

या प्रक्रियेचा एक महत्त्वपूर्ण पैलू असा आहे की, जरी हा अहवाल २०२७ मध्ये प्रसिद्ध झाला, तरीही त्यातील तरतुदींची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच १ जानेवारी २०२६ पासून केली जाण्याची शक्यता आहे. असे झाल्यास, कर्मचा-यांना थकबाकीच्या स्वरू पात एक मोठी रक्कम प्राप्त होईल.

**२४ एप्रिल रोजी महत्त्वाची बैठक-** वेतन आयोग पथक सध्या पगार, भत्ते आणि सेवाशर्तीविषयी माहितीपूर्ण निर्णय घेण्याच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी विविध संबंधित घटकांशी संवाद साधत आहे. याच संदर्भात, आठव्या वेतन आयोगाचे पथक २४ एप्रिल २०२६ रोजी देहरादूनला भेट देणार आहे. वेतन आयोगासमोर आपली मते मांडू इच्छिणा-या कोणत्याही कामगार संघटनेने, संस्थेने किंवा मंडळाने १० एप्रिल २०२६ पर्यंत भेटीसाठी (मुलाखतीसाठी) विनंती अर्ज सादर करणे आवश्यक आहे. या बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे,

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# औद्योगिक क्रांतीच्या उंबरठ्यावर

केंद्र सरकारने 'मेक इन इंडिया २.०' आणि 'आत्मनिर्भर भारत' या मोहिमांद्वारे भारतीय अर्थव्यवस्थेतील उत्पादन क्षेत्राचा वाटा २५ टक्क्यांपर्यंत नेण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले आहे. कच्च्या मालाच्या वाढत्या किमती आणि जागतिक मागणीत चढ-उत्तार असूनही भारताचा 'उत्पादन खरेदी व्यवस्थापक निर्देशांक' (पीएमआय) सातत्याने ५० च्या वर राहणे, हे या क्षेत्रातील विस्ताराचे जिवंत लक्षण आहे. गेल्या काही वर्षांमध्ये चीनला पर्याय म्हणून जागतिक कंपन्यांनी 'चायना प्लस वन' ही रणनीती स्वीकारली आहे. याचा सर्वाधिक फायदा भारताला होताना दिसत आहे. केंद्र सरकारच्या 'उत्पादन संलग्न प्रोत्साहन' योजनेमुळे इलेक्ट्रॉनिक्स, औषधनिर्मिती आणि ऑटोमोबाईल क्षेत्रात क्रांती झाली आहे. एके काळी मोबाइलचा आयातदार असलेला भारत आज जगातील दुसऱ्या क्रमांकाचा मोबाइल उत्पादक देश बनला आहे. ॲपल आणि सॅमसंगसारख्या जागतिक कंपन्यांनी त्यांचे उत्पादन तळ भारतात हलवणे, ही भारताच्या उत्पादन क्षमतेवर जागतिक विश्वासाची मोहर आहे. संरक्षण क्षेत्रात आपण केवळ स्वयंपूर्ण होत नसून, विक्रमी निर्यातही करत आहोत. ही झेप केवळ आकडेवारीपुरती मर्यादित नसून भारताच्या धोरणात्मक स्वावलंबनाचे प्रतीक आहे. कोणत्याही देशाच्या विकासाचा खरा निकष हा त्यातून निर्माण होणारा रोजगार असतो. सेवाक्षेत्राची वाढ मोठी असली, तरी मोठ्या प्रमाणावर अकुशल आणि निमकुशल कामगारांना सामावून घेण्याची क्षमता केवळ उत्पादन क्षेत्रात आहे. सध्या हे क्षेत्र साधारणपणे २७.३ दशलक्ष लोकांना प्रत्यक्ष रोजगार पुरवत आहे. भारतीय उत्पादनक्षेत्राचा एकूण जीडीपीतील वाटा १७ टक्के आहे. तो २०२५ पर्यंत २५ टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट होते. आता २०३० पर्यंत तरी हे लक्ष्य गाठायचे, असे केंद्र सरकारने ठरवले आहे. हवामानबदलाच्या संकटामुळे शेती दिवसेंदिवस अधिक गर्तेत जात असून जास्तीत जास्त लोकांनी कारखानदारीकडे वळणे योग्य ठरणार आहे. याचा अर्थ शेतीची उपेक्षा करायची, असे बिलकुल नाही. परंतु शेतीवर आवश्यकतेपेक्षा जास्त लोक अवलंबून असून भारतात दरडोई शेतीचे सरासरी क्षेत्र अत्यल्प आहे. त्यामुळे त्यावर अख्ख्या कुटुंबाचा निर्वाह होऊ शकत नाही. म्हणूनच शेतीमध्ये अतिरिक्त ठरणाऱ्या लोकांना उद्योगात सामावून घेण्याची गरज आहे. भारतात मॅन्युफॅक्चरिंग किंवा उत्पादनक्षेत्राचा अपेक्षित विस्तार झालेला नाही. परंतु त्या दिशेने पावले मात्र अवश्य पडत असून उद्योगधंद्यांना बळकटी देण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. देशात ७,१३३ ठिकाणी एकूण २१ हजार मेगावॅट क्षमतेच्या लघु जलविद्युत प्रकल्पांसाठी सिद्धता करण्यात आली आहे. याचा फायदा उद्योगधंद्यांनाच होणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ३३,६६० कोटी रुपयांच्या 'भारत औद्योगिक विकास योजने'चा शुभारंभ करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत देशभरात शंभर 'प्लग अँड प्ले' औद्योगिक पार्क विकसित केले जातील. हे पार्क म्हणजे अशी विकसित औद्योगिक क्षेत्रे असतील, जिथे कंपन्या कोणत्याही विशेष तयारीशिवाय त्वरित उत्पादन किंवा कामकाज सुरू करू शकतात. या योजनेद्वारे अंदाजे १५ लाख प्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील, अशी सरकारला अपेक्षा आहे. देशांतर्गत उत्पादनाला चालना देणे, हा या महत्त्वाकांक्षी योजनेचा उद्देश स्वागतार्ह आहे. या योजनेंतर्गत शंभर ते एक हजार एकर क्षेत्रावर औद्योगिक पार्क विकसित केले! जातील. त्यासाठी सरकारतर्फे प्रति एकर एक कोटी रुपयांचे आर्थिक साह्य दिले जाणार आहे. 'प्लग अँड प्ले'ची व्यवस्था असल्यामुळे कारखाना स्थापन करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा रेडिमेड स्वरूपात उपलब्ध असतात. परिणामी, उत्पादन प्रक्रियेतूल विलंब टळतो आणि गुंतवणूकदारांचा वेळ आणि खर्च वाचतो. ही क्षेत्रे 'इज ऑफ डुइंग बिझिनेस' वाढवण्यासाठी आणि 'आत्मनिर्भर भारत'च्या स्वप्नाला साकार करण्यासाठी विकसित केली जात आहेत. इंडस्ट्रियल पार्क म्हणजे कारखाने किंवा गोदामे स्थापन करण्यासाठी नियोजित पद्धतीने विकसित केलेला एक सुसज्ज भागच असतो. बहुतेकदा हे पार्क रेल्वे, विमानतळ आणि बंदरांच्या जवळ असतात. त्यामुळे लॉजिस्टिक्स सुलभ होते. शेअर्ड इन्फ्रास्ट्रक्चर किंवा सामायिक सुविधांमुळे औद्योगिक पार्कमधील कंपन्यांचा प्रारंभिक खर्च कमी होतो. पायाभूत सुविधा तयार असल्याने आणि त्याबद्दलच्या सर्व परवानग्या आधीच मिळाल्या असल्यामुळे पटकन उत्पादन सुरू करता येते. एकाच ठिकाणी उद्योग असल्याने प्रदूषण नियंत्रणाचे नियम पाळणे सोपे जाते. २०२५ पर्यंतची आकडेवारी पाहिल्यास भारतात ४५०० औद्योगिक पार्क कवा वसाहती आहेत. ७ लाख ७० हजार हेक्टरवर असलेल्या या पार्क्समध्ये औद्योगिक कॉरिडॉर्स आणि स्पेशल इकॉनॉमिक झोन्सचाही समावेश होतो. यापैकी सर्वात जास्त पार्क किंवा वसाहती आंध्र प्रदेशमध्ये असून त्यांची संख्या ६३८ आहे. महाराष्ट्र (५२३), राजस्थान (४२०), कर्नाटक (३८४) आणि तामिळनाडू ३७२ असे एकूण चित्र आहे. भारतात एकूण ३०० पेक्षा जास्त प्लग अँड प्ले पार्क्स निर्माण करण्याचे केंद्र सरकारचे लक्ष्य आहे. महाराष्ट्रामध्ये २२५ हून अधिक औद्योगिक वसाहती असून महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचे आणि भारतातील तिसरे सर्वात मोठे आयटी पार्क हे पुण्याजवळ पुरंदर येथे होणार आहे. १५०० एकर क्षेत्रात ते साकार होईल. हिंजवडी आणि मगरपट्टा या दोन आयटी पार्क्समुळे पुण्याचा विकास गतिमान पद्धतीने झाला आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये ऑटोमोटिव्ह, फार्मा, ॲल्युमिनियम आणि बायोटेक उद्योगांचे। वर्चस्व आहे तर बृहन्मुंबई-कोकण प्रदेशात प्लॅस्टिक, रबर, पोलाद, खत आणि अभियांत्रिकी उद्योगांचे प्राबल्य आहे. नागपूर-वर्धा येथे १५०० एकरांवर राष्ट्रीय मेगा लॉजिस्टिक हबची निर्मिती करण्यात येत आहे. येत्या काही वर्षांमध्ये देशात फार मोठे औद्योगिक परिवर्तन येणार असून रोजगाराचे स्वरूपही बदलणार आहे. केवळ चीननेच नव्हे, तर पूर्व आशियाई देशांनी उत्पादन क्षेत्रावर भर देऊन, निर्याताभिमुख धोरण स्वीकारत प्रगती केली. भारतही आता नव्या औद्योगिक क्रांतीच्या उंबरठ्यावर आहे. भारत हे जागतिक गुंतवणूकदारांसाठी पसंतीच ठिकाण आहे. येथे कुशल कामगार मुबलक असून डिजिटल तंत्रज्ञानाचा वापरही भारतात मोठ्या प्रमाणावर होत आहे. या भारताच्या जमेच्या बाजू आहेत. मात्र प्रशासकीय भ्रष्टाचार आणि अकार्यक्षमता हे व्यवस्थेतील दोष काढून टाकण्याची गरज आहे.

# खाद्यतेलाप्रमाणे कडधान्यांतही सरकारचे आत्मघातकी धोरण

**सरकारने नुकतेच पुढील वर्षभरासाठी तूर, उडीद आणि पिवळा वाटाणा आयातीचे धोरण जाहीर केले. त्यामुळे सरकारने संसदेच्या कृषिविषयक स्थायी समितीच्या अहवालाला केराची टोपली दाखविल्याचे सिद्ध झाले. तसेच सरकार देशातील उत्पादन वाढीसाठी धोरणात्मक पातळीवर कष्ट न घेता स्वस्त आयातीचा आधार घेत राहणार हेही स्पष्ट झाले आहे. परिणामी एल-निनोचे सावट आणि युद्धामुळे निविष्ठांच्या टंचाईचे सावट असताना स्वस्त आयातीमुळे कडधान्य भावाची शाश्वती राहिलेली नाही. सरकारचे हे धोरण देशासाठी खाद्यतेलाप्रमाणे घातक ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.**



सरकारने तूर आणि उडदाच्या मुक्त आयातीला एक वर्ष म्हणजेच ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ दिली. म्हणजेच पुढील वर्षभर तूर आणि उडीद आयातीवर कसलेही बंधन नसेल. तर पिवळा वाटाणा आयातीवरील शुल्क वाढविण्याची मागणी केली जात होती, ती देखील सरकारने फेटाळत केवळ ३० टक्के आयात शुल्क कायम ठवले. हरभरा आणि मसूर आयातीवरही प्रत्येकी केवळ १० टक्के शुल्क असणार आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील स्थिती पाहता देशात कडधान्याची आयात मोठ्या प्रमाणात होणार हे स्पष्ट आहे.

देशात यंदा तूर आणि उडदाचे उत्पादन घटले आहे, तसेच २०२६ च्या खरिपावर एल निनोचे सावट असल्याने पाऊसमानाविषयी साशंकता आहे, हा धागा पकडत केंद्र सरकारने कडधान्य आयातीला पोषक धोरण कायम ठेवले आहे. आयात करून देशातील तूट भरून काढण्याचा सोपा मार्ग चोखाळायचा शिरस्ता सरकारने १९९० नंतर कायम ठेवला आहे. स्वस्त आयातीमुळे देशातील कडधान्यांचे भाव कमी होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होत आले आहे. शेतकऱ्यांना योग्य परतावा मिळाल्याने ते लागवड कमी करत आले. त्यात नैसर्गिक संकटांची भर पडत गेली. त्यामुळे देशातील कडधान्य उत्पादनात वाढ होण्याऐवजी घट होत गेली.

देशात २०२१-२२ मध्ये विक्रमी २७३ लाख टन कडधान्य उत्पादन झाले होते. त्यानंतर उत्पादनात चढ-उतार होत राहीले. यंदा तर खरीप आणि रब्बीतील कडधान्य उत्पादन २३९ लाख टनांवरच स्थिरावण्याचा अंदाज आहे. उन्हाळी हंगामात काही प्रमाणात मूग आणि उडदाचे उत्पादन होऊ शकते. पण उन्हाळी हंगामातील उत्पादनाची जास्त भर पडणार नाही. सध्याच्या वातावरणात आणि मे महिन्यातील जास्त तापमानाच्या तसेच उष्णतेच्या लाटांचा अंदाज असल्याने उन्हाळी हंगामातील उत्पादनाविषयी चिंता कायम आहे. तुरीचे उत्पादन यंदा ३४ लाख टनांवर स्थिरावण्याचा अंदाज आहे. तर गेल्या वर्षी ३६ लाख टन उत्पादन होते. उत्पादन कमी झाल्यामुळे आयात वाढत गेली.

एकूणच यंदा कडधान्य उत्पादन चांगला मॉन्सून होऊनही कमी राहिले आहे. पण उत्पादन कमी होऊनही यंदा शेतकऱ्यांना तूर आणि उडदासाठी चांगला भाव मिळाला नाही. मुगाचेही भाव हमीभावापेक्षा कमीच राहिले.

गेल्या आर्थिक वर्षात १२ लाख ३४ हजार टन तुरीची आयात झाली होती. तर नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात म्हणजेच एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या काळात विक्रमी १४ लाख ५० हजार टन तूर आयात झाल्याची माहिती आहे. उडीद आयातही यंदा जास्त झाली आहे. सरकारने मुक्त आयातीचे धोरण राबविल्याने भावात सुधारणा झाली नाही.

उत्पादन कमी राहूनही सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्यांना भाव मिळाला नाही. म्हणजेच आपल्या कडधान्य बाजाराची वाटचाल खाद्यतेल बाजाराप्रमाणे सुरू झाली आहे. देशातील उत्पादन वाढविण्याऐवजी केवळ भाव कमी करणे हा एकमेव अजेंडा राबवत सरकारने आयातीवरील अवलंबित्व वाढत असल्याच्या महत्त्वाच्या मुद्द्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले आहे. पिवळा वाटाणा आयात कमी झाल्यामुळे एकूण आयातीचे प्रमाण कमी दिसू शकते. पण तूर, उडीद तसेच मुगाची आयात लक्षणीय वाढत आहे. त्यामुळे देशातील तूर आणि उडदाचे उत्पादन यापुढेही कमी होत जाईल, अशी भीती उद्योगांनी व्यक्त केली आहे.

कृषिविषयक स्थायी समितीने देशात कडधान्य उत्पादन वाढीसाठी हमीभावाने १०० टक्के खरेदी, बदलत्या हवामानात तग धरणाऱ्या वाणांचा विकास, संशोधनावरील खर्चात वाढ करणे, स्थानिक प्रक्रियेला प्रोत्साहन देणे अशा अनेक शिफारशी केल्या आहेत. पण सरकार यापैकी कोणत्याच आघाडीवर काम करताना दिसत नाही. केवळ बियाणे कीट वाटणे, हमीभाव जाहीर करणे अशी सर्व धोरणे कागदावरच दिसतात. तुरीच्या बियाण्यावर संशोधन करून बदलत्या वातावरणात तग धरणारे वाण गरजेचे असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. ऐन तुरीच्या शेंगा भरण्याचा काळात वातावरणीय घडामोडींमुळे उत्पादकतेवर परिणाम होत आहे. त्यामुळे उत्पादकता कमी येत आहे. उडीद आणि मूग आता राज्यातून हद्दपार झाल्यात जमा आहे. राज्याच्या काही छोट्या छोट्या पॉकेटमध्येच या पिकांची लागवड होताना दिसते. कारण ही पिके काढणीला आली की अतिवृष्टी होत असल्याच्या घटना वाढल्या आहेत. तूर पिकाची वाटचालही त्याच दिशेने सुरु असल्याचे दिसते. मागील दोन वर्षांत तूर लागवड परवडत नाही, अशी अनेक शेतकऱ्यांची स्थिती आहे.

स्थायी समितीने देशात प्रत्येक पिकांच्या बदलत्या हवामानात तग धरणाऱ्या, अधिक उत्पादन देणाऱ्या आणि कीड-प्रतिरोधक वाण जाती विकसित करण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. तूर, मूग आणि उडीद पिकांसाठी ही आता तातडीची गरज बनली आहे. या दिशेने काम झाले तरच देशात या पिकांचे उत्पादन टिकून राहील. अन्यथा, वर्षागणिक या पिकांच्या उत्पादनात घट होण्याचा सध्याचा ट्रेंड कायम राहील आणि भारताला या पिकांची जास्ती जास्त आयात करावी लागेल. देशाच्या दृष्टीने ते घातक पाऊल ठरेल.

नुकत्याच झालेल्या संसदेच्या अधिवेशनात कडधान्याच्या प्रश्नावर उत्तर देताना सरकारच्या वतीने हमीभाव खरेदीवर जास्त जोर दिला होता. पण सध्याची हमीभाव खरेदी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर उत्तर नाही, हे अनेकदा स्पष्ट झाले आहे. सरकारने तूर आणि उडदाची १०० टक्के हमीभावाने खरेदीची खात्री (गॅरेंटी) दिली आहे. पण त्यासाठी शेतकऱ्यांना लागवडीच्या काळातच सरकारच्या ई-समृद्धी पोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक आहे. अनेक शेतकरी काही कारणास्तव ही नोंदणी करू शकत नाहीत किंवा अनेकदा नोंदणीत अडचणी येतात. त्यामुळे नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांची संख्या कमीच असते. त्यामुळे सरकारला जास्त शेतकऱ्यांची तूर आणि उडीद १०० टक्के खरेदी करावा लागत नाही. सरकारला खरंच देशातील तूर आणि उडदाचे उत्पादन वाढवायचे असेल तर शेतकऱ्यांनी कधीही नोंदणी केली तरी पूर्ण उत्पादन खरेदी करायला काय हरकत आहे? पण मुळात सरकारचा मनसुबा खरेदी करण्याचा नाहीच.

सरकारने आतापर्यंत कोणत्याच शेतीमालाची पूर्ण खरेदी केलेली नाही. सरकारची तेवढी क्षमताही नाही. सरकार हमीभाव खरेदीची प्रक्रिया राबवताना उत्पादनाच्या २५ टक्क्यांची मर्यादा लावते. समितीने ही मर्यादा १०० टक्के करण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांनी उत्पादन वाढवावे यासाठी हे गरजेचेही आहे. पण सध्या सरकार जे काही उद्दिष्ट जाहीर करते तेवढा शेतकऱ्यांचा माल खरेदीच होणार नाही, अशी प्रक्रिया राबवते. शेवटी शेतकरी खरेदी केंद्रांवर गेलाच तर लूट ठरलेलीच आहे. सरकारच्या खरेदीत शेतकऱ्यांऐवजी खरेदी संस्थाच गब्बर होत आल्या आहेत. या खरेदी प्रक्रियेत राजकारणाचा शिरकाव मोठ्या प्रमाणात झाला आहे. सध्या सुरू असलेल्या खरेदी प्रक्रियेत अनेक अडचणी आहेत. गोदामांची अडचण, बारदाना टंचाई, खरेदीस विलंब, नोंदणीची धीमी प्रक्रिया, आर्थिक लूट अशा अनेक समस्यांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते.

थोडक्यात, धोरणात्मक पातळीवर जास्त कष्ट घेण्याची गरज नसल्याने सरकार आयातीचा सोपा मार्ग सोडायला तयार नाही. सबब कडधान्य आणि तेलबिया आयातीची टांगती तलवार कायम राहणार आहे. कडधान्य बाजाराला आयातीचा विळखा आणखी घट्ट झाला आहे. आधी सरकार काही कालावधीसाठी आयात मुक्त करण्याचे धोरण राबवत होते. पण आता वर्षभरासाठी धोरण राबवत असल्याने भाव नियंत्रणात ठेवण्यात सरकार यशस्वी ठरत आहे.

आयात माल हमीभावापेक्षा कमी दरात देशात येऊ नये, ही मागणी केवळ शेतकरीच करत नाही तर उद्योगांनीही ही मागणी अनेकदा केलेली आहे. कृषिविषयक स्थायी समितीनेही ही शिफारस केलेली आहेच. पण सरकारने त्याला केराची टोपली दाखविली. सध्या युद्धामुळे आयातीत अडचणी आहेत. पण फेब्रुवारी महिन्यात आयात तुरीचा भाव हमीभावापेक्षा ३० टक्क्यांपर्यंत कमी होता. त्यामुळे आपल्याकडील शेतकऱ्यांच्या तुरीचे भाव पडले होते. येणाऱ्या खरिपावर संकटे अधिक असण्याची शक्यता आहे. 'एल-निनो'मुळे कमी पावसाचे सावट तर आहेच, शिवाय युद्धामुळे खत टंचाईचेही संकट गडद झाले आहे. खतांचा काळाबाजार होऊन शेतकऱ्यांची लूट होण्याची दाट शक्यता आहे. त्याची सुरुवात होऊन काही भागात शेतकऱ्यांना वाढीव भावात युरिया घ्यावा लागत आहे. या संकटांचे दिव्य पार करून शेतकऱ्यांनी तूर, उडीद आणि मुगाचे उत्पादन घेतले तरी सरकारच्या मुक्त आयात धोरणामुळे शेतकऱ्यांना रास्त भावाची शाश्वती राहिली नाही.

**अनिल जाधव**

# धास्ती 'सुपर अल निनो'ची

भारतासह संपूर्ण जग सध्या आखातातील युद्धामुळे निर्माण झालेल्या संकटांचा सामना करत असतानाच हवामानाशी संबंधित एका वृत्ताने या चिंतेत मोठी भर घातली आहे. युरोपीय हवामान केंद्राच्या (ईसीएमडब्ल्यू एफ) ताज्या आकडेवारीनुसार, या वर्षाच्या अखेरपर्यंत 'सुपर अल निनो'चा प्रभाव निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. प्रशांत महासागराच्या पट्ट्यातील पाण्याचे तापमान सरासरीपेक्षा दोन अंश सेल्सियस किंवा त्याहून अधिक वाढते तेव्हा त्याला 'सुपर अल निनो' असे संबोधतात. प्रशांत महासागरातील ही उष्णता जागतिक वातावरणातील वा-यांच्या प्रवाहाला बदलते. त्यामुळे जगाच्या एका भागात अतिवृष्टी आणि पूर येतो, तर दुस-या भागात भीषण दुष्काळ पडतो.

'सुपर अल निनो'चा प्रभाव केवळ भारतापुरता मर्यादित राहणार नाही. पश्चिम अमेरिकेमध्ये भीषण उष्णता आणि जंगलातील आगीच्या घटना वाढू शकतात. पॅसिफिक महासागरात चक्रीवादळांची संख्या वाढण्याची शयता आहे, तर अटलांटिक क्षेत्रात ती कमी राहू शकते. चीन, जपान आणि फिलिपाईन्ससारख्या देशांना शक्तिशाली टायफूनचा सामना करावा लागू शकतो. दुसरीकडे, ऑस्ट्रेलिया आणि इंडोनेशियामध्ये तीव्र दुष्काळाची स्थिती निर्माण होऊ शकते, तर दक्षिण अमेरिकेतील पेरू आणि इक्वाडोरमध्ये ढगफुटीसारखा पाऊस आणि विनाशकारी महापूर येण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.जागतिक तापमानवाढीच्या भीषण काळात आता निसर्गाचे एक असे रूप समोर येत आहे, ज्याने जगभरातील हवामान शास्त्रज्ञांची आणि धोरणकर्त्यांची झोप उडवली आहे. युरोपीय हवामान केंद्राच्या (ईसीएमडब्ल्यूएफ) ताज्या आकडेवारीनुसार, या वर्षाच्या अखेरपर्यंत 'सुपर अल निनो'चा प्रभाव निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. ही घटना इतकी दुर्मिळ आणि शक्तिशाली आहे की, ती साधारणपणे दर १० ते १५ वर्षांनी एकदाच येते आणि संपूर्ण जगाच्या हवामान चक्राला विस्कळीत करून सोडते. भारतासाठी ही चिंतेची बाब आहे. कारण याचा थेट परिणाम आपल्या मान्सूनवर आणि पर्यायाने शेतीवर होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

सामान्यत 'अल निनो' ही एक हवामानविषयक स्थिती आहे, ज्यामध्ये विषुववृत्तीय प्रशांत महासागराच्या पृष्ठभागावरील पाण्याचे तापमान सरासरीपेक्षा जास्त वाढते. जेव्हा हे तापमान सरासरीपेक्षा ०.५ अंश सेल्सियसने वाढते तेव्हा त्याला 'अल निनो' म्हटले जाते. मात्र जेव्हा प्रशांत महासागराच्या या पट्ट्यातील पाण्याचे तापमान सरासरीपेक्षा दोन अंश सेल्सियस किंवा त्याहून अधिक वाढते तेव्हा त्याला शास्त्रज्ञ 'सुपर अल निनो' असे संबोधतात.प्रशांत महासागरातील ही उष्णता जागतिक वातावरणातील वा-यांच्या प्रवाहाला बदलते. त्यामुळे जगाच्या एका भागात अतिवृष्टी आणि पूर येतो, तर दुस-या भागात भीषण दुष्काळ पडतो. सध्या हरितगृह वायूंच्या वाढत्या प्रमाणामुळे पृथ्वीचे वातावरण ही उष्णता बाहेर सोडू शकत नाही. परिणामी प्रत्येक नवा 'अल निनो' जुने विक्रम मोडताना दिसत आहे.




भारतासाठी मान्सून हा केवळ पाऊस नसून देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. जून ते सप्टेंबरदरम्यान होणा-या पावसावर आपली अन्न सुरक्षा आणि ग्रामीण अर्थव्यवस्था अवलंबून असते. ऐतिहासिक नोंदी असे सांगतात की, ज्या ज्या वेळी अल निनो सक्रिय झाला आहे, त्या वर्षी भारतात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहिले आहे. 'सुपर अल निनो'च्या परिस्थितीत हा धोका अधिक गंभीर होतो.आधुनिक काळातील पहिली नोंदवलेली 'सुपर अल निनो' स्थिती १९८२-८३ मध्ये उद्भवली होती. या काळात भारताच्या अनेक भागांत पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा खूपच कमी राहिले. विशेषत उत्तर आणि मध्य भारतात खरीप पिकांचे प्रचंड नुकसान झाले होते. या घटनेमुळे शास्त्रज्ञांना प्रथमच प्रशांत महासागरातील उष्णतेचा आणि भारतीय मान्सूनचा इतका जवळचा संबंध असल्याचे अधिक स्पष्टपणे उमजले.

त्यानंतर १९९७-९८ मध्ये आतापर्यंतची सर्वात भीषण 'सुपर अल निनो' स्थिती निर्माण झाल्याचे मानले जाते. यादरम्यान प्रशांत महासागराचे तापमान विक्रमी पातळीवर पोहोचले होते. सुदैवाने, त्या वर्षी 'इंडियन ओशन डायपोल' (हिंदी महासागरातील स्थिती) सकारात्मक असल्याने भारतावर होणारा परिणाम काहीसा कमी झाला. तरीही देशातील अनेक राज्यांत पावसाने ओढ दिली होती आणि मान्सूननंतरच्या उष्णतेने नागरिक हैराण झाले होते. या घटनेने जागतिक तापमानात मोठी वाढ घडवून आणली होती.२०१५ -१६ या वर्षीचा 'सुपर अल निनो' हा नजीकच्या इतिहासातील सर्वात मोठा धक्का होता. २०१५ मध्ये भारतात पावसाचे प्रमाण सरासरीच्या केवळ ८६ टक्के राहिले, ज्यामुळे देशातील जवळजवळ ६०० जिल्ह्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. महाराष्ट्रातील मराठवाडा आणि विदर्भात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली होती आणि लातूरला रेल्वेने पाणीपुरवठा करावा लागला होता, ही घटना याच काळात घडली होती. या 'सुपर अल निनो'मुळे २०१६ हे वर्ष त्या काळातील जगातील सर्वात उष्ण वर्ष ठरले होते. ऐतिहासिक आकडेवारीनुसार, अशा वर्षांत तांदूळ, डाळी आणि तेलबियांच्या उत्पादनात १० ते १५ टक्क्यांपर्यंत घट झाल्याची नोंद आहे.

यंदाही अशी स्थिती राहिल्यास पावसाच्या कमतरतेमुळे देशातील जलाशयांची पाणीपातळी खालावू शकते. याचा सर्वाधिक फटका खरीप हंगामातील पिकांना, विशेषत भातशेतीला बसण्याची भीती आहे. केवळ पावसाची कमतरता नव्हे, तर मान्सूनच्या काळात तापमान नेहमीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता असल्याने पिकांच्या वाढीवर आणि उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अन्नधान्याच्या किमती वाढून महागाईचा प्रश्नही उग्र होऊ शकतो.हवामान शास्त्रज्ञांच्या मते, जर या वर्षी 'सुपर अल निनो' पूर्ण ताकदीने उभा राहिला तर त्याचे खरे चटके पुढील वर्षी अधिक तीव्रतेने जाणवतील. वातावरणातील तापमान वाढण्यासाठी 'अल निनो'च्या विकासानंतर काही काळ जावा लागतो. या गणितानुसार, २०२६ पेक्षा २०२७ हे वर्ष मानवी इतिहासातील आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष ठरू शकते. यापूर्वी १९८२-८३, १९९७-९८ आणि २०१५-१६ मध्ये अशा शक्तिशाली घटना घडल्या होत्या, ज्यांनी जागतिक तापमानाचे सर्व विक्रम मोडीत काढले होते. यावेळचा धोका त्यापेक्षाही मोठा असल्याचे मानले जात आहे.

हवामान अंदाजांमध्ये 'स्प्रिंग प्रिडिक्शन बॅरियर' नावाचा एक प्रकार असतो. वसंत ऋतूमध्ये वर्तविलेले अंदाज अनेकदा बदलतात.

कारण या काळात वातावरणात वेगाने बदल होत असतात. २०१४ मध्येही अशाच मोठय़ा 'अल निनो'ची शक्यता वर्तवली गेली होती. मात्र पुढे तो कमकुवत झाला होता. तरीही सध्याची समुद्रातील उष्णता आणि वा-यांची दिशा पाहता धोका वास्तविक वाटत आहे. या वैज्ञानिक इशा-याचा मुख्य उद्देश सरकार आणि प्रशासकीय यंत्रणांना सावध करणे हा आहे. वेळेत नियोजन केल्यास दुष्काळ निवारण, पाणी व्यवस्थापन आणि पीक पद्धतीत बदल करून होणारे नुकसान कमी करता येऊ शकते. निसर्गाच्या या बदलत्या चक्राशी जुळवून घेणे हे आता मानवासमोरचे सर्वात मोठे आव्हान आहे.

**रंगनाथ कोकणे**

# नग्न करून बांधून मारहाण..!

## पुसदमध्ये अमानुष अत्याचारानंतर इसमाचा मृत्यू – कायद्याचा धाक संपलाय का?

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - शहर पोलीस स्टेशन हद्दीतील काकडदाती येथे घडलेली क्रूर व संतापजनक घटना समाजमन सुन्न करणारी ठरली आहे. एका ४० वर्षीय इसमाला नग्न करून, हात-पाय बांधून बेदम मारहाण करण्यात आल्याने त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना केवळ खून नसून, मानवी संवेदनांना काळिमा फासणारी अमानुष वृत्ती दर्शवणारी असल्याची तीव्र प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १ एप्रिल रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास सखाराम हूलकाने यांना काकडदाती येथे काही व्यक्तींनी पकडून निर्दयपणे मारहाण सुरू केली. धक्कादायक बाब म्हणजे, त्यांना पूर्णपणे नग्न करून हात-पाय बांधण्यात आले होते. या घटनेची माहिती मिळताच फिर्यादी शिवानंद हूलकाने घटनास्थळी पोहोचले असता, सखाराम हे गंभीर जखमी अवस्थेत जमिनीवर पडलेले दिसून आले. घटनेनंतर जखमी सखाराम यांना प्रथम घरी आणण्यात आले, त्यानंतर सायंकाळी त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले. मात्र, चार दिवस मृत्यूशी झुंज देत अखेर ४ एप्रिल रोजी रात्री त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी पुसद शहर पोलीस ठाण्यात विठ्ठल नागोराव भाकरे, रोहन विठ्ठल भाकरे, प्रशांतकुमार उर्फ पवन भाकरे आणि योगेश उत्तम भाकरे यांच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, सर्व आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. या अमानुष कृत्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसल्याने विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. एखाद्या व्यक्तीला नग्न करून सार्वजनिकरीत्या मारहाण करणे ही केवळ गुन्हेगारी नसून, सामाजिक अध:पतनाची भीषण चिन्हे असल्याचे मत व्यक्त होत आहे. या घटनेनंतर नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. अशा घटनांमुळे कायद्याचा धाक उरला आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार सेवानंद वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुसद शहर पोलीस करीत आहेत.



## श्री सेवा फर्निचर काळी (दौ.) तर्फे शालेय विद्यार्थ्यांना पेपर पॅडचे वाटप

महागाव - तालुक्यातील काळी (दौ.) येथे असलेल्या श्री सेवा फर्निचर चे (संचालक) निकेश दत्तराव जाधव रा.सातघरी (नाईकनगर) यांच्या शैक्षणिक दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांना साहित्य (पेपर पॅड) वाटप या उपक्रमाच आयोजन त्यांनी केला "शिक्षणातूनच प्रगतीचा मार्ग सुकर होतो." याच उद्देशाने आज जि.प.उ.प्राथमिक मराठी शाळा सुधाकरनगर, नाईकनगर, पेढी, सातघरी, बोंढारा या पाच गावातील जि.प.शाळेतील संपूर्ण विद्यार्थ्यांना पेपर पॅडचे वाटप करण्यात आले. आगामी परीक्षांच्या काळात विद्यार्थ्यांना लेखन सराव सोपा व्हावा, हा या मागचा मुख्य हेतू आहे. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून या उपक्रमाचे सार्थक झाल्यासारखे वाटते. असे निकेश जाधव यांनी म्हटले. सोबतच ग्रामीण व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणे आज काळाची गरज आहे.

# धक्कादायक वास्तव ! वणीत आयपीएल सट्ट्याचा 'डेथ वॉरंट'

## कर्जबाजारी तरुणाई आत्महत्येच्या उंबरठ्यावर, उध्वस्त होतात संसार

जनमाध्यम प्रतिनिधी




वणी - शहरात सध्या आयपीएलच्या झगमगाटामागे एक भयावह वास्तव उघड होत असून,सट्टेबाजीच्या माध्यमातून तरुणाईला आर्थिक आणि मानसिक खाईत ढकलले जात असल्याचे चित्र समोर येत आहे. हा केवळ सट्ट्याचा खेळ नसून, अत्यंत नियोजनबद्ध 'फायनान्सियल ट्रॅप' असल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सट्ट्यात मोठ्या प्रमाणावर पैसे गमावलेले युवक हतबल झाल्यावर त्यांना मदतीच्या नावाखाली काही टोळक्यांकडून कर्ज पुरवले जाते.मात्र हे कर्ज साधे नसून,दरमहा १० ते २० टक्के व्याजाने दिले जात असल्याचे समोर येत आहे. कर्ज देताना संबंधितांकडून कोरे चेक, घर-जमिनीची कागदपत्रे तारण म्हणून घेतली जात असल्याने अनेक युवक आर्थिक गुलामीत अडकत आहेत. या सट्टा-जाळ्यामुळे काही युवकांनी आपली दुकाने,घरे, शेती विकल्याच्या घटना समोर येत आहेत. तर काहींनी मानसिक तणावातून आत्महत्येचा मार्ग स्वीकारल्याचीही चर्चा शहरात सुरू आहे.त्यामुळे हा प्रश्न केवळ आर्थिक न राहता सामाजिक संकटाच्या दिशेने जात असल्याचे स्पष्ट होत आहे. या संपूर्ण प्रकारामागे वणीतील काही 'बडे मासे' आणि पडद्यामागील खरे सूत्रधार सक्रिय असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. तरुणाईला वाचवण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

> 'सट्टा, फायनान्स'चा सापळा, पडद्यामागील सूत्रधार सक्रिय?

## • वेचक

### पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न



घाटंजी - पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारांवर आधारित निवासी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन दि. 4 व 5 ऐप्रिलला घाटंजी येथील नगरपरिषदेचे सास्कृतिक भवन येथे उत्साहात संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन राजूभाऊ तोडसाम (आमदार, आर्णी विधानसभा मतदारसंघ, भारतीय जनता पक्ष) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तालुका अध्यक्ष विजय बैस, शहराध्यक्ष महेश पवार,सुरेशजी डहाके,महिला अध्यक्षा सौ.वर्षा नरेश पेदोर, तसेच नगर परिषदेचे उपाध्यक्षा सौ.सोनल ठाकरे, शहराध्यक्षा सौ.साधना माडूरवार आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिरामध्ये पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या "एकात्म मानववाद" या विचारधारेवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. समाज विकास, नेतृत्व कौशल्य, संघटन बळकटीकरण आणि ग्रामीण विकास या विषयांवर विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत कार्यकर्त्यांना समाजसेवेसाठी प्रेरित केले. मोठ्या संख्येने कार्यकर्ते व युवकांनी सहभाग नोंदवून निवासी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शेवटी सर्वांनी मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

### प्रा.अर्चना हरिमकर यांची ओबीसी महिला जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती!



पुसद - येथील सामाजिक कार्यकर्त्या प्रा.अर्चना दीपक हरिमकर यांची ओबीसी महिला जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)कडून मुंबई येथे आयोजित पक्ष कार्यक्रमात राजा राजापूरकर प्रदेशाध्यक्ष ओबीसी यांच्या मार्फत नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांचे हस्ते, राष्ट्रीय नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत हे नियुक्ती पत्र देण्यात आले. अर्चना हरिमकर ह्या पुसद येथील नामांकित शाळेत अध्यापनाचे कार्य करीत असून सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय महिला असून महिला सक्षमीकरनासाठी त्यांची पक्षस्तरावर नियुक्ती जिल्ह्यासाठी महत्वपूर्ण राहणार आहे. पक्षाची विचारधारा राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनां अभिप्रेत असणारी संघटना व पक्ष बांधणी करून शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांचे पुरोगामी विचार तळागाळा पर्यंत पोहचवण्यासाठी त्या प्रयत्नशील राहनार असल्याचे प्रा.अर्चना हरिमकर वृत्त संस्थांशी बोलताना म्हणाल्या.

### प्रदेश युवा काँग्रेस सचिव शेख तालीब अहेमद यांचा राजीनामा

उमरखेड - प्रदेश कार्यकारिणीवर पाठविण्यात आलेल्या स्थानिक नेतृत्वाने विधानसभा लोकसभा निवडणूकीत विरोधी काम करणाऱ्या चौघांच्या नावाची शिफारस केली त्यामध्ये एकाही मुस्लिम कार्यकर्त्याचे नाव पाठविण्यात आले नसल्याने पक्ष नेतृत्वावर तिव्र नाराजी व्यक्त करीत प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव शेख तालीब अहेमद यांनी दि. 3 एप्रील रोजी स्थानिक शासकिय विश्रामगृहावर आयोजित पत्रकार परिषदेत काँग्रेस पक्षाच्या पदाचा राजीनामा दिल्याचे जाहीर केले. युवक कांग्रेसचे प्रदेश सचिव शेख तालीब अहेमद यांनी आपला राजीनामा प्रदेश अध्यक्ष शिवराज मोरे , प्रदेश सरचिटनीस साहेबराव कांबळे यांच्याकडे आपल्या पदाचा राजीनामा पाठविला असल्याचे पत्रकार परिषदेत सांगून स्थानिक नेतृत्वाने निष्ठावान कार्यकर्त्यांवर अन्याय करीत प्रदेश कार्यकारिणी सदस्य नियुक्ती करीता उमरखेड मधून विधानसभा लोकसभा निवडणूकीत पक्षाविरोधी काम करणाऱ्या चौघांची शिफारस केली . त्यामध्ये प्रत्येक निवडणूकीत राब राब राबणाऱ्या एकाही मुस्लिम कार्यकर्त्यांच्या नावाची शिफारस प्रदेश सरचिटनीस साहेबराव कांबळे , सचिन नाईक यांच्या नेतृत्वातील स्थानिक काँग्रेस नेत्यांनी केली नाही . स्थानिक नेत्यांचे जिल्ह्यात कुठलेही वजन उरले नसल्याची आगपाखड शेख तालीब यांनी करून आपण पक्षासाठी कोणत्याही पदाची अथवा निवडणूक लढविण्याची कुठलीही लालसा न बाळगता पक्ष संघटन मजबुती करीता माझ्या समाजासाठी काम करीत असतांना स्थानिक पक्षनेतृत्वाने समाजावर अन्याय करून मुस्लिम समाजाच्या एकाही कार्यकर्त्याला पक्षात स्थान न दिल्याने आपण ठामपणे राजीनामा देत आहोत असे शेख तालीब यांनी पत्र परिषदेत सांगीतले.

# बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयात सिव्हिल एक्सप्लोटेक – २०२६ उत्साहात संपन्न

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयात, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग व सिविल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशन (CESA)यांच्या संयुक्त विद्यमाने, सिविल एक्सप्लोटेक- २०२६ या तांत्रिक महोत्सवाचे उद्घाटन २५ मार्च २०२६ रोजी उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य डॉ.अविनाश वानखडे, विभागप्रमुख डॉ. झीशान अहमद, प्रा. प्रदीप दुधाट , प्रोफेसर इन्चार्ज स्टुडंट्स अफेअर, प्रा. हितेश बरखडा आयआयसी(IIC) संयोजक, प्रा. प्रणव चव्हाण प्रोफेसर इन्चार्ज सेसा(CESA) हे व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल डॉ. अविनाश वानखडे यांनी विभागाचे व विभागातील विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. अशा कार्यक्रमांनी विद्यार्थ्यांतील कल्पनाशक्ती वाढीस लागून त्यांचे भविष्यातील वाटचालीस आकार देते व यशस्वी जीवनाचा मार्ग शोधण्यात मदत करते, असे त्यांनी यावेळी नमूद केले. या कार्यक्रमात विविध विषयातील गुणवंत विद्यार्थ्यांना व विविध क्षेत्रात रोजगार संधी प्राप्त झालेल्या २३ विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी प्रा. एस एस झांबानी, प्रा. अनिल गादेवार , प्रा. के.डी. मनवर, प्रा. डी. एस. चव्हाण, प्रा. व्ही. व्ही. बुरसे व प्रा.ए.व्ही. पाईकराव उपस्थित होते. या महोत्सवाअंतर्गत स्काय राईज, आईस्क्रीम स्टीम टॉवर चॅलेंज, ड्राफ्टिंग डायनामा ऑटोकॅड ड्राफ्टिंग,कल्पना सादरीकरण, टेक्निकल फोटोग्राफी, मॉडल मेकिंग अशा विविध तांत्रिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपली कला व कौशल्य प्रभावीपणे सादर केले. महोत्सवाचा समारोप व बक्षीस वितरण समारंभ ०१ एप्रिल २०२६ रोजी पार पडला. स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरस्कार व पारितोषिके देऊन गौरविण्यात आले व सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सिव्हिल इंजिनिअरिंग स्टुडंट असोसिएशन व विभागातील सर्व प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले तसेच हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी समन्वयक श्रीकृष्ण संजय शिंगणे ,पवन शिवा गुडीकांडूला व अभिषेक गजानन गवळे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विभागातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# अवैध रेती साठ्यावर तहसीलदार यांची धडक कारवाई

## जनमाध्यमच्या बातमीचा इम्पॅक्ट



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - दैनिक जनमाध्यमने उघड केलेल्या पिंपळगाव परिसरातील बालाजी पार्क येथील अवैध रेती साठ्याच्या वृत्ताची प्रशासनाने गंभीर दखल घेत अखेर कारवाईचा बडगा उगारला आहे.

४ एप्रिल रोजी तहसीलदार योगेश देशमुख यांनी स्वतः कारवाई करत सुमारे 40 ब्रास रेतीचा साठा जप्त केला असून संबंधितांवर दंडात्मक कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.या प्रकरणात



हेमंत श्रीकृष्ण भोयर यांना 6 एप्रिल रोजी तहसील कार्यालयात हजर राहून संबंधित रेती साठ्याबाबतची परवानगी व रॉयल्टीच्या पावत्या सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सादर करण्यात येणाऱ्या कागदपत्रांच्या आधारे पुढील कठोर कारवाई केली जाणार असल्याचे तहसीलदारांनी स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे, जनमाध्यमने सातत्याने या अवैध प्रकारावर प्रकाश टाकल्यानंतरच प्रशासनाने हालचाल केल्याचे स्पष्ट झाले आहे. सार्वजनिक जागेवर साठवण्यात आलेल्या या रेतीमुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली होती. अखेर या बातमीची दखल घेत कारवाई करण्यात आल्याने जनमाध्यमच्या पत्रकारितेचा प्रभाव पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

यापुढे अशा प्रकारचा अवैध रेती साठा कुठेही आढळल्यास तत्काळ माहिती द्यावी, संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन तहसीलदार योगेश देशमुख यांनी दिले आहे. दरम्यान, या कारवाईमुळे शहरातील इतर ठिकाणी सुरू असलेल्या अवैध रेती व्यवहारांवरही लगाम बसणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# एलपीजी ग्राहकांची गर्दी..! केवायसीसाठी रांगा, तातडीने उपाययोजनांची मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी



राळेगाव - शहरातील एलपीजी गॅस एजन्सीसमोर ग्राहकांच्या लांबलचक रांगा लागल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. शासनाकडून एलपीजी धारकांसाठी केवायसी अनिवार्य करण्यात आल्यामुळे तसेच नव्या नियमांच्या अंमलबजावणीमुळे ग्राहक मोठ्या संख्येने एजन्सीकडे धाव घेत आहेत. यामध्ये संभाव्य गॅस तुटवड्याची भीतीही नागरिकांमध्ये दिसून येत आहे.

राळेगाव शहर व तालुक्यातील सुमारे २५ हजार नोंदणीकृत ग्राहकांना केवायसी प्रक्रियेसाठी तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे एका दिवशी केवळ ४० ते ५० ग्राहकांचीच केवायसी होत असल्याने अनेकांना निराश परतावे लागत आहे. यामुळे महिला, शेतमजूर व ग्रामीण भागातील नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पदाधिकाऱ्यांनी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन परिस्थितीवर चर्चा केली. कर्मचारी संख्या वाढविणे, घरपोच सेवा बळकट करणे, सावली व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे तसेच गावागावात केवायसी शिबिरे आयोजित करण्याची मागणी करण्यात आली. प्रशासनाने यावर तातडीने उपाययोजना करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# अनु.जातीचे अबकड आरक्षण त्वरित लागू करावे : विजय रणखांब

जनमाध्यम प्रतिनिधी



महागांव - शासनाने अनुसूचित जातीचे अबकड आरक्षण त्वरित लागू करुन अनु.जातीतील ५९ जातीला न्याय द्यावा अशी मागणी बहुजन शक्ती संस्थापक अध्यक्ष तथा लसाकमचे विजय रणखांब यानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

१ऑगस्ट 2024 रोजी माननीय सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातीमध्ये अ ब कड आरक्षणाचे उपवर्गीकरण करून प्रत्येक राज्यांनी अनुसूचित जातीतील वंचितांना न्याय दयावा असे आदेश दिलेले आहेत. देशातील इतर राज्यामध्ये अनुसूचित जातीचे अ ब कड आरक्षणाचे उपवर्गीकरण करून ईतर राज्यात अबकड आरक्षण उपवर्गीकरण लागू करण्यात आले आहे. मागील अनेक वर्षापासून वंचित जातींनी अ ब क ड आरक्षण उपवर्गीकरणची मागणी केलेली असून शासनाकडे या पूर्वीचे लहुजी साळवे आयोगाचा व शासनाने नेमलेल्या अभ्यास समीतीचा अहवाल प्राप्त झालेला असून माजी न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल सुद्धा शासनाकडे प्राप्त झालेला आहे. अबकड आरक्षण उपवर्गीकरण साठी राज्यभर मोठया प्रमाणात आंदोलने धरणे,उपोषणे, रास्ता रोको सर्व सामाजीक संघटना, पक्ष,कार्यकर्ते, नेते, यांनी केले आहे. आणी आंदोलने सुरुच आहेत. वंचित जातीतील सर्व समाज बांधव अबकड आरक्षण उप वर्गीकरणाच्या प्रतीक्षेत आहे .एकीकडे शासनाने नोकर भरतीची प्रक्रिया सुरू केलेली आहे. यामुळे वंचित जातींचे मोठया प्रमाणावर सामाजिक नुकसान होउ शकते. म्हणुन शासनाने प्रथम अनु. जातीचे अबकड आरक्षण उपवर्गीकरण लागू करावे नंतरच नौकर भरती प्रकीया करावी . डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न होत की शेवटच्या घटकापर्यंत आरक्षण मीळाले पाहिजे, अबकड आरक्षणामुळे सामाजीक समता, न्याय मात्र नक्कीच मीळणार आहे. म्हणूनच शासनाने अबकड आरक्षण उपवर्गीकरणास उशीर करु नये असेही विजय रणखांब यानी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

# बेंबळा प्रकल्पाचा अप्रत्यक्ष सिंचनाला मोठा हातभार पाटसऱ्यांच्या दुरुस्तीची मागणी तीव्र

जनमाध्यम प्रतिनिधी



राळेगाव - बाभूळगाव, कळंब, राळेगाव व मारेगाव या चार तालुक्यांतील सुमारे ५२ हजार हेक्टर क्षेत्राला सिंचन क्षमता देणारा बेंबळा मुख्य कालवा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा ठरत आहे. ११३ किमी लांबीच्या मुख्य कालव्यातून पाणी शेवटपर्यंत पोहोचत असले, तरी लघु वितरिका व पाटसऱ्यांच्या अपुऱ्या देखभालीमुळे अनेक शेतांपर्यंत थेट सिंचन पोहोचत नसल्याने शेतकऱ्यांत नाराजी आहे.

मात्र, या परिस्थितीतही प्रकल्पाचा अप्रत्यक्ष सिंचनासाठी मोठा लाभ होत आहे. वितरिका जाळ्यातून होणाऱ्या पाझरामुळे परिसरातील विहिरी, विंधन विहिरी आणि नाल्यांमध्ये वर्षभर पाणी उपलब्ध राहत असून, शेतकरी सूक्ष्म सिंचनाच्या साहाय्याने रब्बी व उन्हाळी पिके घेत आहेत. त्यामुळे कृषी उत्पादनात वाढ होत असल्याचे दिसून येते. दरम्यान, थेट सिंचनाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी पाटसऱ्या व लघु वितरिका दुरुस्ती अत्यावश्यक असल्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. बेंबळा प्रकल्पांतर्गत स्थापन ११३ पाणी वापर संस्थांचे सक्षमीकरण, तसेच नियमित देखभाल व स्थानिक सहभाग वाढविल्यास सिंचन व्यवस्थेत सुधारणा होऊ शकते, असे मत व्यक्त होत आहे.

# यवतमाळ जिल्हा कृषी महोत्सव २०२६ मध्ये विषमुक्त शेतीचा गजर

## देशट्टीवार यांच्या स्टॉलवर तुफान गर्दी

जनमाध्यम प्रतिनिधी



पांढरकवडा - यवतमाळ जिल्ह्यात आयोजित करण्यात आलेल्या कृषी महोत्सव २०२६ मध्ये थेट शेतकरी ते थेट ग्राहक या संकल्पनेला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.यवतमाळ जिल्हाधिकारी विकास मीना साहेब शेतकरी रविंद्र देशटीवार याच्या स्टॉलवर भेट दिले विषमुक्त आणि नैसर्गिक शेतीबाबत चर्चा केली.

प्रगतिशील शेतकरी रवींद्र देशट्टीवार यांनी आपल्या शेतातील विषमुक्त उत्पादनांचे आकर्षक प्रदर्शन व विक्री करत उपस्थितांचे लक्ष वेदून घेतले. देशट्टीवार यांनी आपल्या स्टॉलवर विषमुक्त वायगाव हळद पावडर ओलीकच्ची हळद लोणच्यासाठी नैसर्गिक पद्धतीने पिकवलेले चिकू झाडाला पाळ पडलेले, शेवग्याच्या शेंगा तसेच गावरान पपई यांची विक्री केली विशेष म्हणजे केमिकलचा वापर न करता पूर्णपणे नैसर्गिक पद्धतीने तयार केलेले या उत्पादनांना ग्राहकांनी मोठी पसंती दर्शवली.चिकूच्या नैसर्गिक गोडीमुळे आणि गुणवत्तेमुळे ग्राहक विशेष आकर्षित झाले.या स्टॉलवर दिवसभर तुफान गर्दी पाहायला मिळाली.यवतमाळकरांना थेट शेतातून आलेला ताजा विषमुक्त आणि दर्जेदार शेतमाल खरेदी करण्याची संधी मिळाली यामुळे ग्राहकांमध्ये समाधानाचे वातावरण होते.रवींद्र देशट्टीवार यांनी सांगितले की ते सुभाष पाळेकर यांच्या नैसर्गिक शेती पद्धतीचा अवलंब करत आहेत.गावराणी गायचे शेण व गोमूत्र यांचा वापर करून जीवामृत घनजीवामृत,निम अर्क व दशपर्णी अर्क यांसारख्या नैसर्गिक घटकांचा उपयोग करून पिकांची लागवड केली जाते.त्यामुळे उत्पादन पूर्णपणे विषमुक्त आणि आरोग्यदायी राहते.थेट शेतकरी ते ग्राहक या विक्री पद्धतीमुळे मध्यस्थ टाळले जात असून शेतकऱ्यांना योग्य दर मिळतो तसेच ग्राहकांनाही दर्जेदार मिळतो.या उपक्रमातून देशट्टीवार यांना चांगला आर्थिक फायदा होत असल्याचे त्यांनी सांगितले.

# निरोगी आरोग्यासाठी



**गं**भीर आजारांना स्वतःपासून दूर ठेवायचे असेल तर शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत असणं आवश्यक आहे. यासाठी पौष्टिक आहाराचे सेवन आणि नियमित वर्कआउट करणे गरजेचेआहे. फिटनेसबाबतचे महत्त्व लोकांना पटू लागले आहे. दरम्यान आरोग्याप्रति जागरुक ता निर्माण करण्यासाठी जगभरात प्रत्येक वर्षी ७ एप्रिल रोजी आरोग्यदिन साजरा केला जातो. निरोगी जीवन जगता यावे, यासाठी प्रत्येकाने आपल्या जीवनशैलीमध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे गरजेचे आहे.

जगातील प्रत्येक व्यक्ती आज कोणत्या-न्-कोणत्या शारीरिक-मानसिक समस्येमुळे ग्रस्त आहे. या धावपळीच्या आयुष्यात लोक इतकी व्यस्त झाले आहेत की त्यांना शांत झोप घेण्यासाठी तसेच पौष्टिक आहाराचे सेवन करण्यासाठीही पुरेसा वेळ मिळत नाही. ताणतणा वामुळेही आपल्या आरोग्यावर वाईट परिणाम होताहेत. हा समस्यांपासून दूर राहण्यासाठी आहार आणि जीवनशैलीमध्ये छोट-मोठे बदल करून आपण निरोगी आयुष्य जगू शकता. जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने आरोग्य निरोगी राहण्यास मदत मिळेल, असे पाच साधे-सोपे उपाय जाणून घेऊ

**पौष्टिक आहार**

निरोगी आरोग्यासाठी पौष्टिक व संतुलित आहाराचे सेवन करणे अतिशय गरजेचे आहे.

दिवसातून कमीत कमी तीन वेळा पौष्टिक आहाराचे सेवन करावे, असा सल्ला तज्ज्ञमंडळींकडून दिला जातो. तसंच रात्री हलका आहार करण्यावर भर द्यावा.

आपल्या आहारात विशेषत: फळे, भाज्या, अन्नधान्य, प्रथिनेयुक्त पदार्थांचा समावेश करावा. यामुळे तुमच्या आरोग्यास पोषक घटकांचा पुरवठा होण्यास मदत मिळेल.

**तणावापासून राहा दूर**

आरोग्याशी संबंधित कित्येक समस्या ताणतणावामुळेच उद्भवतात. तणावामुळे वजन वाढणे यासह अन्य गंभीर समस्यांचाही सामना करावा लागतो. शारीरिक तसंच मानसिक समस्या उद्भवू नयेत, यासाठी तणावावर नियंत्रण मिळवणे अत्यंत गरजेचे आहे. एखाद्या गोष्टीमुळे स्वतःला किती त्रास करून घ्यावा, हे सर्व काही तुमच्यावरच अवलंबून असते. तुमच्या आयुष्यात कोणती गोष्ट अधिक महत्त्वाची आहे, हे सर्वप्रथम समजून घ्यावे. डॉक्टरांचा सल्ला घेऊन, एक्सरसाइज, ध्यानधारणा इत्यादी उपाय केल्यास मानसिक आरोग्यास बरेच लाभ मिळतील.

**मानसिक आरोग्याची काळजी घ्या**

स्वतःच्या व इतरांच्या गरजा पूर्ण करण्याच्या प्रयत्नात बहुतांश जणांचे मानसिक आरोग्याकडे पूर्णतः दुर्लक्ष होते. पण निरोगी आरोग्य जगण्यासाठी मानसिक आरोग्यही चांगले असणे खूप महत्त्वाचे आहे.

मानसिक आरोग्यच आपल्या सर्वांगीण आरोग्याचा पाया आहे, हे विसरू नका. मानसिक आरोग्य निरोगी राहण्यासाठी योग आणि ध्यानधारणा करणे हे उत्तम पर्याय आहेत. याशिवाय चांगल्या व तुमच्या आवडत्या कामांमध्ये सहभाग नोंदवा व आनंदी राहा.

**नियमित व्यायाम करा**

शरीर निरोगी आणि सक्रिय ठेवण्याचा एक चांगला मार्ग म्हणजे व्यायाम करणे. अमेरिकन हार्ट असोसिएशन कडून प्रत्येक आठवड्यात १५० मिनिटे व्यायाम करण्याचा किंवा आठवड्यातून किमान तीन वेळा व्यायाम करण्याचा सल्ला दिला गेलाय.

जितक्या चांगल्या पद्धतीने आपण वर्कआउट कराल, तितकेच तुम्हाला अधिक लाभ मिळतील, हे लक्षात ठेवा. व्यायामादरम्यान डान्स, एरोबिक्स यासारख्या गोष्टींचा आपण समावेश करू शकता.

नियमित स्वरुपात या साध्या सोप्या नियमांचे पालन केल्यास तुमच्या शारीरिक व मानसिक आरोग्यास बरेच लाभ मिळतील. तसेच आपल्याला एक वेगळाच आनंद देखील अनुभवता येईल.

# सुदृढ आरोग्य : समृद्ध जीवनाचा पाया

**द**रवर्षी ७ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगभरात 'जागतिक आरोग्य दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक साजरा करण्याचा नसून, मानवजातीसमोर उभ्या असलेल्या आरोग्यविषयक प्रश्नांचा गांभीर्याने विचार करण्याचा, आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा आणि प्रत्येक व्यक्तीपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्याचा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे. आजच्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाची प्रगती झपाट्याने होत असताना, आरोग्याच्या क्षेत्रात अनेक सकारात्मक बदल झाले असले तरीही अनेक नवीन आव्हानेही समोर आली आहेत. त्यामुळे 'आरोग्य' हा विषय केवळ वैयक्तिक न राहता सामाजिक, आर्थिक आणि जागतिक पातळीवर अत्यंत महत्त्वाचा बनला आहे.

आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे नव्हे, तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दृष्ट्या पूर्णपणे सुदृढ असणे ही त्याची व्यापक संकल्पना आहे. अनेकदा आपण आरोग्याचा विचार फक्त शरीराशी संबंधित करतो, परंतु मानसिक आरोग्य, सामाजिक वातावरण, जीवनशैली, आहार, पर्यावरण आणि आर्थिक परिस्थिती यांचा आरोग्यावर मोठा प्रभाव असतो. उदाहरणार्थ, ताणतणाव, असंतुलित जीवनशैली, अपुरी झोप, व्यसनाधीनता आणि चुकीचा आहार यामुळे अनेक आजार निर्माण होतात. त्यामुळे आरोग्याचा विचार करताना सर्वसमावेशक दृष्टीकोन आवश्यक आहे.

आजच्या आधुनिक जीवनशैलीत बदलांमुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. शहरीकरण, औद्योगिकीकरण, प्रदूषण आणि वाढती स्पर्धा यामुळे माणूस अधिक तणावग्रस्त बनत आहे. फास्टफूड संस्कृती, शारीरिक हालचालींचा अभाव, तंत्रज्ञानावर अवलंबित्व यामुळे मधुमेह, हृदयविकार, स्थूलता, रक्तदाब यांसारख्या आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. ग्रामीण भागातही परिस्थिती वेगळी नाही. तेथे आरोग्यसेवेचा अभाव, पोषणाचा अभाव, स्वच्छतेची कमतरता आणि आर्थिक अडचणी यामुळे विविध आजार पसरतात.

महिलांचे आरोग्य हा एक अत्यंत महत्वाचा आणि दुर्लक्षित विषय आहे. अनेक ठिकाणी महिलांना योग्य पोषण मिळत नाही, गर्भधारणेदरम्यान योग्य वैद्यकीय सेवा मिळत नाहीत आणि सामाजिक बंधनांमुळे त्यांचे आरोग्य दुर्लक्षित राहते. त्यामुळे मातामृत्यू आणि बालमृत्यू दर वाढतो. महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे आणि त्यांना सशक्त बनवणे ही काळाची गरज आहे.

बालकांचे आरोग्य हा समाजाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कुपोषण, लसीकरणाचा अभाव, स्वच्छतेची कमतरता आणि शिक्षणाचा अभाव यामुळे बालकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. बालकांना योग्य आहार, स्वच्छता, शिक्षण आणि



आरोग्यसेवा दिल्यास त्यांचे सर्वांगीण विकास साधता येतो. यासाठी पालक, शिक्षक आणि शासन यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

मानसिक आरोग्य हा आजच्या काळातील एक गंभीर प्रश्न बनला आहे. ताण, चिंता, नैराश्य, एकाकीपणा आणि स्पर्धेचा दबाव यामुळे अनेक लोक मानसिक समस्यांना सामोरे जात आहेत. विशेषतः तरुणांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये मानसिक तणावाचे प्रमाण वाढत आहे. मानसिक आरोग्याविषयी समाजात अजूनही गैरसमज आणि भीती आहे. त्यामुळे मानसिक समस्यांबाबत खुलेपणाने चर्चा करणे, समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करणे आणि मानसिक आरोग्याला तितकेच महत्त्व देणे आवश्यक आहे.

पर्यावरण आणि आरोग्य यांचा अतूट संबंध आहे. हवा, पाणी आणि अन्न यांची गुणवत्ता थेट आरोग्यावर परिणाम करते. प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार, त्वचेचे आजार आणि इतर अनेक समस्या निर्माण होतात. जलप्रदूषणामुळे पाण्याद्वारे पसरणारे आजार वाढतात. त्यामुळे पर्यावरण संरक्षण ही केवळ नैसर्गिक जबाबदारी नसून आरोग्याचे रक्षण करण्यासाठी अत्यावश्यक आहे.

कोविड-१९ महामारीने संपूर्ण जगाला आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित करून दिले. या महामारीने आरोग्यसेवेतील कमतरता, संसाधनांची कमतरता आणि आरोग्यविषयक असमानता उघड केली. त्याचबरोबर स्वच्छता, मास्क, लसीकरण आणि सामाजिक अंतर यांचे महत्त्वही लोकांना समजले. या अनुभवातून शिकून आरोग्य व्यवस्थेला अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. शासनाच्या विविध आरोग्य योजनांमुळे आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, लसीकरण मोहिमा, पोषण आहार योजना यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होत आहे. तथापि, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पारदर्शकता आणि जनजागृती आवश्यक आहे. आरोग्य शिक्षण हा आरोग्य सुधारण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. लोकांना योग्य माहिती दिल्यास ते स्वतःच्या आरोग्याची काळजी घेऊ शकतात. स्वच्छता, संतुलित आहार, नियमित व्यायाम, योग, ध्यान, व्यसनमुक्ती यांसारख्या गोष्टींचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि समाजातील विविध घटकांनी यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

आयुर्वेद, योग, नैसर्गिक चिकित्सा यांसारख्या पारंपरिक पद्धतींचाही आरोग्य सुधारण्यात महत्त्वाचा वाटा आहे. आधुनिक वैद्यकशास्त्रासोबत या पद्धतींचा समन्वय साधल्यास अधिक प्रभावी आरोग्यसेवा देता येऊ शकते. विशेषतः योग आणि ध्यान यामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे. कोणत्याही व्यक्तीला आर्थिक किंवा सामाजिक कारणांमुळे आरोग्यसेवा नाकारली जाऊ नये. 'सर्वांसाठी आरोग्य' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन, समाज आणि व्यक्ती यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. जागतिक आरोग्य दिन हा आपल्याला आपल्या जीवनशैलीचा पुनर्विचार करण्याची संधी देतो. आपण आपल्या दैनंदिन जीवनात छोटे छोटे बदल करून मोठे परिणाम साधू शकतो. संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, ताणतणावाचे व्यवस्थापन, स्वच्छता आणि सकारात्मक विचार या गोष्टींचा अंगीकार केल्यास आपण सुदृढ जीवन जगू शकतो. शेवटी, आरोग्य हीच खरी संपत्ती आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. 'सुदृढ व्यक्ती-सुदृढ समाज-सुदृढ राष्ट्र' ही संकल्पना साकार करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे हीच जागतिक आरोग्य दिनाची खरी भावना आहे.

**डॉ. राजेंद्र वगाटे**

# भोंदूगिरीला कायमची बंदीची गरज

**रा**ज्यात गेल्या काही दिवसांपासून नाशिकच्या अशोक खरात या भोंदूबाबाचे कारनामे महाराष्ट्राची मती गुंग करणारे आहेत. भोंदूगिरीचा फैलाव आणि त्याला साथ देणारी सत्तेतील राजकीय मंडळी महिलांच्या लैंगिक शोषणाला तितकीच जबाबदार आहेत. एसआयटी चौकशीत उघडकीस येणारी एक-एक बाब केवळ धक्कादायकच नाही तर समाजातील अंधश्रद्धा, सत्तेची मूक साथ आणि प्रशासनातील निष्क्रियता याचे भयावह चित्र उभे करतात. महिलांचे लैंगिक शोषण, आर्थिक गैरव्यवहार आणि प्रभावशाली व्यक्तींशी असलेली जवळीकया सगळ्या बाबींचा विचार करता अशोक खरातला निश्चित राजाश्रय होता, अशी शंका निर्माण होते. या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे महिलांच्या हक्कांचे रक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या पदांवर असणाऱ्यांची भूमिका अत्यंत संशयास्पद आहे. यात काही शंका नाही.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्याबाबतीत निर्माण झालेला वाद हा केवळ वैयक्तिक दृष्टीने नसून ते संस्थात्मक अपयशाचे उदाहरण आहे. समाजमाध्यमांवर फोटो व्हायरल झाल्यानंतरही पडला चिकटून राहाण्याची भूमिका आणि माध्यमांना दिलेली धमकीची भाषा ही लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावरच आघात करणारी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हस्तक्षेप करून रुपाली चाकणकर यांचा राजीनामा घ्यावा लागणे म्हणजे अशोक खरात प्रकरणाचे गांभीर्य किती खोलपर्यंत आहे, ही बाब स्पष्ट होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दीपक केसरकर यांच्यासह अन्य नऊ मंत्र्यांचे अशोक खरातशी कथित संबंध उघड होत असताना केवळ रुपाली चाकणकर यांचाच राजीनामा घेऊन हा विषय थांबविता येणार नाही.




जेव्हा सत्ताधारी, लोकप्रतिनिधी, सनदी अधिकारी आणि प्रभावशाली व्यक्ती अशा भोंदूंच्या संपर्कात येतात तेव्हा त्यांच्या कार्यपद्धतीला अप्रत्यक्षपणे वैधता येते. हीच वैधता पुढे जाऊन महिलांच्या लैंगिक शोषणाला कारणीभूत ठरते. त्यावेळी पीडितांना न्याय मिळवून देण्याचा मार्ग कठीण होतो.

आजपर्यंत हरियाणातील रामपाल, गुरूमीत रामरहीम आणि गुजरातमधील आसाराम बापू यांनी आपल्या आश्रमांमध्ये अनेक महिलांचे लैंगिक शोषण केले होते. आवाज उठविणाऱ्या पीडितांची हत्याही केली होती. या भोंदूंना अटकही झाली. परंतु, त्याचा बोध समाज आणि राजकीय नेत्यांनी घेतलेला दिसत नाही. पुरोगामी महाराष्ट्राने देशात अंधश्रद्धा निर्मूलनाचा पहिला कायदा केला. परंतु, याच राज्यात भोंदूगिरी करणाऱ्या अशोक खरातसारख्या नीच प्रवृत्तीच्या माणसाला राजाश्रय मिळावा यापेक्षा महाराष्ट्राचे दुर्दैव काय असणार. आता पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी अशोक खरातचे आर्थिक जाळे, राजकीय संबंध आणि प्रशासकीय साखळी याचा सखोल तपास होणे अत्यंत गरजेचे आहे.

**प्रा. मधुकर चुटे**
मो.९४२०५६६४०४

# अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे धनी पद्मभूषण बॅरिस्टर रामराव देशमुख

**वि**दर्भाच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक तसेच सहकारी क्षेत्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलणारे ज्येष्ठ नेते, विचारवंत आणि कुशल संघटक म्हणजे बॅरिस्टर रामराव देशमुख होत. त्यांच्या कार्याचा व्यापक आवाका, विचारांची प्रगल्भता आणि समाजहिताची तळमळ यांमुळे त्यांनी आपल्या कार्यकाळात अढळ स्थान निर्माण केले. बॅरिस्टर रामराव देशमुख यांचे व्यक्तिमत्त्व हे खऱ्या अर्थाने अष्टपैलू होते. त्यांच्या ठाम विचारसरणी, प्रभावी नेतृत्वगुण आणि दूरदृष्टी यांचा संगम त्यांच्या प्रत्येक कृतीतून प्रकर्षाने जाणवत असे. कोणतेही कार्य हाती घेताना त्यामागे समाजहिताचा व्यापक दृष्टिकोन असे, हीच त्यांच्या कार्याची वैशिष्ट्यपूर्ण ओळख होती.

बॅरिस्टर देशमुख हे मूलतः टिळकवादी विचारसरणीचे होते; मात्र त्यांच्या विचारांत व्यापकता आणि समन्वयाची भूमिका दिसून येते. त्यांनी कधीही संकुचित दृष्टीकोन स्वीकारला नाही. विविध विचारधारांच्या नेत्यांशी त्यांनी सुसंवादाचे आणि स्नेहाचे संबंध जपले. पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, जयवंत टिळक, बाळासाहेब खापर्डे यांच्याशी त्यांचे सुसंवाद होते. तसेच सी. डी. देशमुख, धनंजयराव गाडगीळ आणि उद्योगपती शंतनुराव किर्लोस्कर यांच्याशीही त्यांचे निकटचे संबंध होते. डॉ. ना. भा. खरे यांच्याशीही त्यांचे घनिष्ठ संबंध राहिले.



राजकीय क्षेत्रात त्यांनी अत्यंत जबाबदारीने विविध पदे भूषविली. सन १९३३ मध्ये स्थापन झालेल्या डेमॉक्रॅटिक स्वराज्य पक्षाचे ते अध्यक्ष होते. जनतेच्या समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या नेतृत्वामुळे अनेक विकास कामांना गती मिळाली. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. एडवर्ड मेमोरियल मराठा एज्युकेशन फंड, विदर्भ प्रबोधन मंडळ दर्यापूर, टिळक मंदिर ट्रस्ट, पुणे या संस्थांच्या विकासात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. विदर्भ प्रबोधन मंडळ, दर्यापूर तसेच शिवाजी शिक्षण संस्था यांसारख्या संस्थांमध्ये त्यांनी निर्माण केलेली शिस्त आणि कार्यपद्धती आजही प्रेरणादायी आहे.

सहकार क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली. ग्रामीण भागाच्या विकासासाठी सहकार हा प्रभावी मार्ग आहे, या विचारावर त्यांचा ठाम विश्वास होता. यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरविले. हा सन्मान त्यांना तत्कालीन राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यांच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा, प्रामाणिकपणा आणि निःस्वार्थी वृत्ती हे गुण प्रेरणादायी आहेत. त्यांनी समाजहितासाठी आयुष्य व्यतीत केले आणि आजही त्यांचे कार्य समाजात जाणवते.

**आदित्य देशमुख**
**(अधिवक्ता)**
रुख्मिणीनगर, अमरावती
मो. ९८५००९०१६८

**आरोग्य दिनानिमित्त**

# आरोग्य जपा, आनंदी रहा

**ज**नमानसात प्रत्येकाचे सुदृढ आरोग्य राहण्यासाठी जागरुकता निर्माण करणे व लोकांना सुंदर आरोग्यासाठी प्रोत्साहीत करण्याकरीता जागतिक आरोग्य संघटना द्वारे प्रति वर्ष ०७ एप्रिल हा जागतिक आरोग्य दिन साजरा केला जातो.

जागतिक आरोग्य संघटना ७ एप्रिल १९४८ रोजी स्थापित झालेल्या या संघटनेमध्ये जगातील एकूण १९२ देशांचा सहभाग आहे. सर्व प्रथम जनतेच्या आरोग्याविषयी जास्तीत जास्त समस्या कडे लक्ष केंद्रित करणे हे या संघटनेचे मुळ उदिष्ट आहेत. संघटनेची आरोग्यविषयक माहिती केवळ रोग व त्यावरील उपाय यावरच सर्वस्वी अवलंबून न राहता त्यामध्ये शारीरिक व मानसिक आरोग्याबरोबरच सामाजिक तेचाही पर्यायाने विचार केला जातो

रोग निवारण व रोग नियंत्रण ह्यासाठी सर्व प्रथम वैधकिय मदत पुरविण्यास सहकार्य करणे, नागरिकांना प्रकृतिविषय सोयी तथा सुविधा उपलब्ध करूण देणे, कार्याबाबत जनजागृती निर्माण




करणे इत्यादी बहुसंख्य कामे संघटणे मार्फत केली जातात. दैनंदिन जीवनात बदललेली जीवन शैली व आरोग्याकडे केलेले दुर्लक्ष यामुळे रोजच्या जीवनात व्यक्तिंना अनेक लहान मोठ्या आजारांना सामोरे जावे लागते. आजार होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे हवामानातील दिनचर्येतील, प्रवासातील व प्रदुषणामुळे शरीरात वारंवार बदल होतांना दिसतात. वाढते ताणतणाव, सकस आहारातील दुर्लक्ष व व्यायामाचा अभाव हेही आजाराला कारणीभूत आहे. रोजची धावपळ सततचा प्रवास तसेच दैनंदिन जीवनपद्धतीत वेग आर्थिक महत्वाचा घटक ठरतो आहे. निसर्ग सृष्टी ही विविध वस्तु, रंग व आकार इत्यादिनी बहरलेली तथा नटलेली आहे या सुंदर अशा सृष्टीचे सौंदर्य आपण आपल्या पंच ज्ञानेंद्रियांने उपयोगी शकतो.

अखंड भारत देशाच्या या विशाल लोकसंख्येत तरुणांचे प्रमाण लक्षणीय असल्याने उदंड मनुष्य बळ ही भारताची बहुमुल्य ताकद आहे.

मुलांसाठी खेळण्याचा विरंगुळा कामगारांसाठी स्वस्त वाहन, भटक्यांचा जीवलग साथी आरोग्य रक्षणाचा किफायतशीर व बहुगुणी पर्याय हाताळणे व दुरूस्तीसाठी सर्वात सोपी तसेच लोकांसाठी आरोग्य देणारे साधन म्हणजे एकमेव सायकल होय. कोणत्याही इंधनावर सायकल अवलंबून नाही, निरोगी आयुष्य जगता येते. हृदयाला बळकती मिळते, रक्त वाहिन्यांची तंदुरुस्ती कायम राहते, स्नायु बळकट होतात त्यांची लवचिकता वाढते, तनाव कमी होतात, मन तजेलदार राहते , शरीरात स्फूर्ती येते पैशाची बचत होते तसेच ध्वनी प्रदूषण आणि वायू प्रदुषण याला आळा बसतो. अशा धकाधकींच्या जीवन शैली मध्ये व्यायाम हा आरोग्यासाठी एक उत्तम व योग्य मार्ग आहे त्याकरिता सर्व प्रथम व्यायाम करणे आरोग्याच्या दृष्टीकोनातून येणाऱ्या काळात एकदम छान आहे. अशा या आरोग्य दिनाच्या निमित्ताने आपल्या जीवनशैली साठी सुसंस्कृत, निरोगी शरीर व सुंदर विश्व बनविण्यासाठी एकत्रित तथा समुह द्वारे राहणे आवश्यक आहे म्हणूनच हा दिवस सर्वत्र जगभर साजरा केला जातो.

**अविनाश कृ. राजगुरे**
न्यु कृष्णार्पण कॉलनी, अमरावती
मो.९३२६९२५५३१

# विद्यार्थ्यांमध्ये फोफावत आहे 'डिजिटल आजार'

**आ**जच्या डिजिटल युगात मोबाईल आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. मात्र, शालेय विद्यार्थ्यांमध्ये मोबाईलचा वाढता वापर आता चिंतेचा विषय ठरत असून, त्याचे गंभीर शारीरिक आणि मानसिक परिणाम दिसून येत आहेत.

**मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे विविध दुष्परिणाम:**

**१. शारीरिक समस्या:-** डोळ्यांचे विकार: तासनतास स्क्रीनकडे पाहिल्यामुळे डोळ्यांवर ताण येणे, डोळे कोरडे पडणे, दृष्टी कमी होणे आणि लहान वयातच चष्मा लागणे यांसारख्या समस्या वाढल्या आहेत.

मान आणि पाठदुखी: सतत खाली मान घालून मोबाईल वापरल्याने 'टेक्स्ट नेक' सारखे आजार उद्भवत आहेत, ज्यामुळे मणक्यावर आणि मानेच्या स्नायूंवर ताण येतो.

लठ्ठपणा: मुले मैदानी खेळ खेळण्याऐवजी एका जागी बसून मोबाईलमध्ये गुंतल्यामुळे शारीरिक हालचाल कमी झाली आहे, परिणामी मुलांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण वाढत आहे.

**२. मानसिक आणि वर्तणुकीतील बदल:-** एकाग्रतेचा अभाव: मोबाईलमधील गेम्स आणि सोशल मीडियामुळे विद्यार्थ्यांची अभ्यासातील एकाग्रता कमी होत आहे



**३. झोपेच्या तक्रारी:** रात्री उशिरापर्यंत मोबाईल वापरल्याने झोपेचे चक्र बिघडते. अपुऱ्या झोपेमुळे चिडचिड होणे, थकवा जाणवणे आणि स्मरणशक्तीवर परिणाम होणे अशा समस्या निर्माण होतात

स्वभाव बदल: मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये एकाकीपणा, नैराश्य आणि रागीटपणा वाढत आहे. आभासी जगाच्या ओढीमुळे ती सामाजिक जीवनापासून दूर जात आहेत.

**४. शैक्षणिक नुकसान:-** मोबाईलच्या नादात विद्यार्थी अभ्यासाकडे दुर्लक्ष करतात, ज्यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर विपरीत परिणाम होतो. लिखाण आणि वाचनाची गोडी कमी होऊन केवळ स्क्रीन स्क्रोलिंग करण्याची सवय जडत आहे .

तंत्रज्ञान वाईट नाही, पण त्याचा अतिवापर घातक आहे. पालकांनी मुलांच्या मोबाईल वापरासाठी ठराविक वेळ निश्चित करून देणे आणि त्यांना मैदानी खेळांकडे वळवणे ही काळाची गरज आहे. सुजाण पालकत्व आणि संयमित वापर यातूनच आपण भावी पिढीला या 'डिजिटल आजारांपासून' वाचवू शकतो.

**सुधीर पंजाबराव केने**
वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विद्यालय, मालखेड रेल्वे
मो.९४२००६१६४१

# मतदार यादीवर भाजपचा 'मिशन मोड'

**वर्धा/जनमाध्यम**

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादी शुद्धीकरणाचा मुद्दा तापत असतानाच भारतीय जनता पक्षाने 'SIR' मोहिमेला जोरदार राजकीय धार दिली आहे. एकही मतदार मतदानापासून वंचित राहता कामा नये, आणि एकही घुसखोर मतदार यादीत राहणार नाही, असा इशारा देत किरीट सोमय्या यांनी वर्ध्यातील कार्यकर्त्यांना थेट रणशिंग फुंकले.

स्थानिक हरिराम टॉवर येथे रविवारी पार पडलेल्या मतदार यादी पुनरावलोकन (SIR) कार्यशाळेत सोमय्या यांनी भाजप कार्यकर्त्यांना 'बूथ जिंकला तर निवडणूक जिंकली' हा मंत्र देत घराघरांत पोहोचण्याचे आदेशच



## एकही मतदार वंचित नाही, घुसखोरांना थारा नाही - किरीट सोमय्या

दिले.वर्धा विधानसभा क्षेत्रातील तब्बल ३४६ बूथवरील कार्यकर्त्यांची उपस्थिती ही आगामी राजकीय लढतीची चुणूक मानली जात आहे.

देशभरात केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या एंई मोहिमेचा पहिला टप्पा ११ राज्यांत पूर्ण झाला असून, आता महाराष्ट्रात दुसरा टप्पा राबवला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर भाजपने संघटनात्मक ताकद मैदानात उतरवत मतदार यादीवर लक्ष केंद्रीत केले आहे.यावेळी रामदास तडस, सुरेश वाघमारे, संजय गाते, निलेश किटे यांची प्रमुख उपस्थिती होती.सोमय्या यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, मतदार यादीत दुबार नावे, बनावट नोंदी आणि घुसखोरी हा लोकशाहीसाठी धोका आहे. त्यामुळे भाजपचा प्रत्येक कार्यकर्ता BLO सोबत खांद्याला खांदा लावून काम करणार आहे.

त्यांनी कार्यकर्त्यांना घराघरांत जाऊन जनजागृती करण्याचे आवाहन करत या मोहिमेला 'लोकशाही स्वच्छतेचे अभियान' असे संबोधले.

नवीन SIR प्रक्रियेनुसार जुन्या मतदार याद्या रद्द होऊन प्रत्येक नागरिकाला आपले नाव नव्याने नोंदवावे लागणार आहे. २००२ पूर्वी नाव असलेल्या मतदारांना BLO कडून फॉर्म घरी दिला जाणार असून, नवमतदारांनी आवश्यक कागदपत्रांसह नोंदणी करावी लागणार आहे. त्यामुळे ही प्रक्रिया केवळ प्रशासकीय नसून राजकीयदृष्ट्याही अत्यंत महत्त्वाची ठरत आहे.दरम्यान, विरोधकांकडून या मोहिमेवर संशय व्यक्त केला जात असताना भाजप मात्र 'निर्दोष मतदार यादी'चा नारा देत आक्रमक भूमिकेत आहे.

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीच रणांगण बनणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

कार्यशाळेचे प्रास्ताविक संजय गाते यांनी केले, तर मार्गदर्शन रामदास तडस व सुरेश वाघमारे यांनी केले. संचालन निलेश पोहेकर यांनी केले.

# संक्षिप्त

## थुंकण्यावरून महिलेस मारहाण

**सेलू** - पोलिस ठाण्याच्या हद्दीत आकोली येथे रस्त्यावर थुंकल्याचा जाब विचारणाऱ्या महिलेवर मारहाण झाल्याची घटना घडली. आशा नारायण जुवारे या नातवाला फिरवत असताना गावातील मनोहर भानुदास हिवरे याने रस्त्यावर थुंकले. याबाबत जुवारे यांनी त्यास हटकले असता वाद निर्माण झाला. त्यानंतर मनोहर हिवरे व त्याची पत्नी वैशाली हिवरे यांनी संगनमत करून जुवारे यांना मारहाण केल्याची तक्रार पोलिसांत दाखल करण्यात आली. या प्रकरणी सेलू पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. किरकोळ कारणावरून घडलेल्या या घटनेमुळे परिसरात आश्चर्य व्यक्त होत आहे.

## २०० रुपयांवरून काठीने मारहाण

**वर्धा** - खरांगणा (मो.) पोलिस ठाण्याच्या हद्दीत कासारखेडा येथे केवळ २०० रुपयांच्या उधारीवरून मारहाणीची घटना घडली. संभाजी गणपत नेहारे यांनी गावातील सुरज भोंडे यांच्या पत्नीला काही दिवसांपूर्वी २०० रुपये उधार दिले होते. त्या पैशांची मागणी केल्यानंतर संभाजी हे घरी परत जात असताना सुरज भोंडे याने त्यांना अडवून वाद घातला. माझ्या पत्नीला पैसे कसे मागतोस असे म्हणत त्याने काठीने मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी खरांगणा पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## धु-यावरील वादातून कोयत्याने हल्ला

**वर्धा** - मदनी येथील शेतशिवारात धु-यावरील खोड काढण्याच्या कारणावरून वाद होऊन कोयत्याने हल्ला केल्याची घटना उघडकीस आली. अंकित दिगडे यांचे शेजारील शेतकरी साहेबराव व सुरज भोंडे हे धु-यावरील खोड काढत होते. याबाबत अंकित यांनी त्यांना हटकले असता वाद निर्माण झाला. संतापाच्या भरात दोघांनी अंकितवर कोयत्याने हल्ला करून जखमी केले. जखमीवर उपचार सुरू असून त्याच्या तक्रारीवरून खरांगणा पोलिसांनी साहेबराव व सुरज भोंडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे शेतशिवारातही तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## कोयत्याने दहशत; तिघांवर गुन्हा

**वर्धा** - रामनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत कोयत्याच्या जोरावर नागरिकांमध्ये दहशत पसरवणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अभिजीत सायरे, जुनेद पठाण व सुरज उर्फ टोली धाडवे अशी आरोपींची नावे आहेत. हे तिघे कारला चौक परिसरातील पेट्रोलपंपाजवळ गुपचूपच्या हातगाडी परिसरात कोयते घेऊन उभे राहून नागरिकांना घाबरवत होते. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. माहिती मिळताच रामनगर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपींवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## व्यसनाधीन तरुणाची आत्महत्या

**ससमुद्रपूर** - तालुक्यातील तावी येथे एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. स्वप्नील शांताराम कष्टी (वय २७) असे मृताचे नाव आहे. तो दारूच्या व्यसनाला बळी पडला होता, अशी माहिती समोर आली आहे. मानसिक तणावातून त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच गिरड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## दुचाकीच्या धडकेत चिमुकला जखमी

**सिंदी/रेल्वे**- येथे स्कूल बसमधून उतरलेल्या सात वर्षीय मुलास दुचाकीने धडक दिल्याची घटना घडली. तुषार निलेश पाटील (वय ७) असे जखमी मुलाचे नाव आहे. तो बसमधून उतरून रस्ता ओलांडत असताना दुचाकी चालक प्रज्वल उमाटे याने त्याला धडक दिली. या अपघातात तुषार जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी सिंदी रेल्वे पोलिसांनी आरोपी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. परिसरात वाढत्या बेफाम वाहनचालकांबाबत नागरिकांत संताप व्यक्त होत आहे.

# साडीच्या कुंपणाने रानडुकरांना 'आऊट'

### गरीब शेतकऱ्यांची भन्नाट शक्कल; शेतीला मिळाला स्वस्त 'सुरक्षा कवच'



**साहूर/जनमाध्यम**

वन्य प्राण्यांच्या सततच्या हल्ल्यांनी हैराण झालेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांनी आता जगण्याची नवी वाट शोधली आहे. तारजाळी, झटका मशीन परवडत नसल्याने या शेतकऱ्यांनी चक्क साड्यांचे कुंपण उभारून पिकांचे संरक्षण करण्याची अनोखी आणि स्वस्त शक्कल लढवली आहे. या रंगीबेरंगी कुंपणांनी परिसरात सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे

साहूर परिसर जंगलव्याप्त असल्याने येथे बिबट, रानडुक्कर, हरीण यांचा मोठ्या प्रमाणात वावर आहे. या वन्य प्राण्यांमुळे तूर, कापूस, सोयाबीन, गहू, हरभरा यांसारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. दरवर्षीच्या या हानीमुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोलमडत असून काहींना आत्महत्येच्या उंबरठ्यावर जावे लागत आहे.श्रीमंत शेतकरी तारजाळी किंवा विजेच्या झटक्याची व्यवस्था करून पिकांचे संरक्षण करतात.

मात्र गरीब शेतकऱ्यांकडे अशी साधने उभारण्याची क्षमता नसल्याने त्यांनी अत्यंत कल्पकतेने साड्यांचा वापर सुरू केला. जुन्या किंवा स्वस्तात मिळणाऱ्या साड्या एकत्र करून शेताभोवती कुंपण तयार केले जाते.

या साड्या वाऱ्यामुळे हलत राहतात, त्यामुळे रात्रीच्या अंधारात शेतात कुणीतरी उभे असल्याचा भास वन्य प्राण्यांना होतो. परिणामी, रानडुक्कर आणि इतर प्राणी शेतात प्रवेश टाळतात, असे शेतकरी सांगतात. कमी खर्चात मिळणारे हे 'दृश्य संरक्षण' अनेकांसाठी दिलासा ठरत आहे.

सध्या रब्बी हंगामातील हरभरा व गहू पिके बहरात असताना वन्य प्राण्यांचा उपद्रव वाढल्याने शेतकरी चिंतेत होते. मात्र साडीच्या कुंपणामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाल्याचे चित्र आहे.दरम्यान, शेतकऱ्यांनी संकटातून मार्ग काढला, पण शासनाने कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

ग्रामीण भागातील या 'साडी कुंपण' प्रयोगाने गरज हीच शोधाची जननी असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

# धूमस्टाइलचा थरार की मृत्यूचा सापळा



**सिंदी (रेल्वे)/जनमाध्यम**

शहरातील रस्ते आता वेगाच्या उन्मादाने पेटले असून सुसाट बाईकर्सनी अक्षरशः दहशत माजवली आहे. धूमस्टाइलने वाहन चालवणाऱ्या तरुणांमुळे सामान्य नागरिकांचे जगणे असुरक्षित झाले आहे. मात्र या सगळ्यावर पोलिस प्रशासनाची 'कुंभकर्णी झोप' कायम असल्याने संतापाची लाट उसळली आहे

गुरुवारी घडलेल्या धक्कादायक अपघाताने या बेफाम वेगाला काळा चेहरा दाखवला. शाळेच्या बसमधून उतरून घरी जात असलेल्या अवघ्या ७ वर्षांच्या तुषार निलेश पाटील या चिमुकल्याला भरधाव बाईकस्वाराने जबर धडक दिली. या भीषण अपघातात तुषार गंभीर जखमी झाला असून सेवाग्राम रुग्णालयात त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या घटनेने संपूर्ण शहर हादरले असून पालकवर्गात भीतीचे सावट पसरले आहे.गेल्या काही दिवसांत शहरात अल्पवयीन आणि बेफाम तरुणांकडून दुचाकींचा बेदरकार वापर वाढला आहे. गल्लोगल्ली वेगाची शर्यत, स्टंटबाजी आणि नियमांची उघडपणे पायमल्ली यामुळे रस्त्यावर चालणाऱ्यांचे जीव टांगणीला लागले आहेत. पादचारी, महिला आणि शाळकरी मुले हे याचे सर्वाधिक बळी ठरत आहेत. रस्त्यावर पाऊल ठेवतानाही जीव मुठीत धरावा लागतो, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक देत आहेत.

या पार्श्वभूमीवर शुक्रवारी जागृत सिंदीकरांनी आणि सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी सिंदी रेल्वे पोलिस ठाण्याचे ठाणेदार नरेंद्र निस्वादे यांना निवेदन देत तातडीने कारवाईची मागणी केली. अल्पवयीन वाहनचालक आणि त्यांच्या पालकांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, शहरात वेगमर्यादा आणि वाहतूक नियमांची कडक अंमलबजावणी करावी, अशी ठाम भूमिका नागरिकांनी मांडली. पालकांच्या दुर्लक्षामुळे अल्पवयीन मुले वाहन घेऊन रस्त्यावर उतरतात आणि काही क्षणांच्या थरारासाठी स्वतःसह इतरांचेही जीव धोक्यात घालतात. परिणामी, निरपराध नागरिकांना त्याची किंमत मोजावी लागत आहे.

या निवेदनावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नगरसेवक आशिष देवतळे, तुषार हिंगणेकर, गंगाधर कलोडे, अमोल सोनटक्के, धनराज झिलपे, बंटी बेलखोडे, रवी वाघमारे, दत्ता कोपरकर, सुनिल बोंबले, भिमराव फुलमाळी, रामेश्वर घंगारे, गुड्डू कुरेशी, तळवेकर, विकास झाडे, राजू दांडेकर आदींची उपस्थिती होती.

दरम्यान, 'आता तरी पोलिसांनी डोळे उघडणार का असा प्रश्न नागरिक विचारत असून, आणखी एखादा बळी जाण्याआधी प्रशासनाने कडक पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी पुढे येत आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १३०
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# रस्ते चकचकीत पण कडा मृत्यूचा सापळा

**साहूर/जनमाध्यम**

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणि पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत गावागावांत रस्त्यांचे जाळे उभे राहत असताना, त्याच रस्त्यांच्या कडाच आता अपघातांचे मुख्य कारण ठरत असल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे. डांबरी व सिमेंट रस्त्यांवर भर दिला जात असला तरी कडांची योग्य बांधणी न केल्याने दुचाकीस्वारांसाठी हे रस्ते 'मृत्यूचे सापळे' ठरत आहेत.

रस्त्याचे काम पूर्ण करताना दोन्ही बाजूंच्या कडा भरण्याकडे कंत्राटदार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात, असा आरोप नागरिकांकडून होत आहे. परिणामी, समोरून येणाऱ्या मोठ्या वाहनाला साईड देताना दुचाकी खाली उतरते आणि पुन्हा रस्त्यावर चढवताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागते. अनेकदा या कडांमुळे वाहन घसरून अपघात घडतात.

परिसरातील अनेक रस्त्यांवर हीच स्थिती दिसून येते. काही ठिकाणी कडा भरल्या असल्या तरी माती व मुरूम दबल्याने त्या पुन्हा खोल झाल्या आहेत. विशेषतः तळेगाव-वरूड मार्गावर सिमेंट रस्ता उंचावल्याने कडेला पाच ते सहा फूट खोल खड्ड्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत थोडीशी चूकही जीवघेणी ठरू शकते.मुरूमात मातीचे प्रमाण अधिक असल्याने तो लवकर बसतो आणि कडा पुन्हा खोल होतात. यामुळे चारचाकी वाहनांना मार्ग काढणे सोपे असले तरी दुचाकीस्वारांना मात्र जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. आतापर्यंत अनेक छोटे-मोठे अपघात या कारणामुळे घडले असून काहींना जीव गमवावा लागल्याच्या घटना घडल्या आहेत.सर्वात चिंताजनक बाब म्हणजे, या गंभीर समस्येकडे संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांत तीव्र नाराजी आहे. रस्ते झाले, पण सुरक्षितता कुठे असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.दरम्यान, संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून रस्त्यांच्या दोन्ही बाजूंच्या कडा योग्य पद्धतीने भराव्यात, नियमित देखभाल करावी आणि अपघात टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

# मोबाईल सोडून पुस्तकांची गोड मैत्री

### नरसुल्यात बालवाचक साहित्य संमेलनाचा जल्लोष

**आंजी(मोठी)/जनमाध्यम**

निसर्गाच्या कुशीत वसलेल्या नरसुला गावात पुस्तक दोस्ती अभियानाच्या वतीने आयोजित बालवाचक साहित्य संमेलन थाटात पार पडले. वाचन हे पेरण असतं, तर लिहणं म्हणजे उगवण या विचाराने भारलेल्या या उपक्रमाने चिमुकल्यांच्या आयुष्यात नवचैतन्य फुलवले.

या एकदिवसीय शिबिरात लहानग्यांची उत्साही उपस्थिती, हातात हात आणि चेहऱ्यावर आनंदी भाव असे मनोहारी चित्र पाहायला मिळाले. निवृत्त मुख्याध्यापिका सिंधु चिंचखेडे (वय ७५) यांच्या हस्ते ग्रंथपूजन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. पुस्तक दोस्तीसारखा सुंदर उपक्रम मी आयुष्यात पाहिला नाही, असे सांगत त्यांनी या चळवळीला पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांना चार गटांमध्ये विभागून विविध उपक्रमांद्वारे वाचनाची गोडी निर्माण करण्यात आली.झाशी राणी गटातील मुलींनी अभ्यास कंटाळवाणा वाटायचा, पण आता पुस्तकांशी मैत्री करायला आवडेल, असे सांगत प्रेरणादायी अनुभव मांडले. तर भगतसिंग गटातील विद्यार्थ्यांनी मोबाईल आणि टीव्हीच्या अति वापराबाबत प्रांजळ कबुली देत आता ज्ञानवर्धक कार्यक्रमच पाहू, असा निर्धार व्यक्त केला.कल्पना चावला गटातील बालमैत्रिणींनी अंतराळवीर होण्याची स्वप्ने



रंगवली, तर विवेकानंद गटातील विद्यार्थ्यांनी प्रशासनात जाऊन समाजसेवा करण्याची जिद्द व्यक्त केली. या संमेलनाने केवळ वाचनाची गोडीच नाही तर जीवनमूल्यांची बीजेही रोवली.या यशस्वी आयोजनासाठी अभय बालपांडे, समीर येनूरकर, जितेंद्र चिंचखेडे, विनोद गोमासे, प्रफुल्ल चिंचखेडे यांनी पुढाकार घेतला. तसेच वैशाली चिंचखेडे, शितल सावरकर, प्राजक्ता लोखंडे, प्रणिता हिंगे, मनीषा चिंचखेडे, उमेश कापकर, शीलवंश थूल, विजय कोल्हे, सार्थक ढाकुलकर यांचेही मोलाचे योगदान लाभले.या संमेलनामुळे गावात वाचन संस्कृतीची नवी पहाट उगवली असून पुस्तकांशी मैत्री, उज्ज्वल भविष्याची खात्री हा संदेश ठामपणे पोहोचला.

# धम्मसेवेतून उभा राहिला स्मृती मानाचा कोनशिला

### नामदेवराव ढाले स्मृती किचन शेडचे लोकार्पण

**वर्धा/जनमाध्यम**

धम्म चळवळीतील समर्पित कार्यकर्ते स्व. नामदेवराव ढाले यांच्या स्मृती प्रित्यर्थ उभारण्यात आलेल्या किचन शेडचे लोकार्पण सम्यक बुद्ध विहार, प्रबुद्ध नगर (मसाळा) येथे उत्साहात पार पडले. समाजकार्याची परंपरा जपत ढाले परिवाराने उभारलेले हे किचन शेड धम्मकार्याला नवी दिशा देणारे ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त झाली.

या कार्यक्रमात सम्यक बुद्ध विहार सांस्कृतिक सभागृह समितीच्या उपाध्यक्ष जिजाबाई राऊत यांच्या हस्ते किचन शेडचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अनिल ढाले (मुंबई), डॉ. जागृती ढाले, सुनील ढाले, हरीका ढाले, भैय्या ढाले, सुनंदा ढाले यांच्यासह ढाले परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच इंदुमती कांबळे, मोरेश्वर कांबळे,



सिंधुताई वनकर, देवरावजी वनकर, तातोबाजी येसनकर, लता येसनकर, दिवाकरराव मुन, सुनिता मुन, डॉ. दिलीप दबडे, नम्रता दबडे, पुष्पा फुलझेले, कान्होपात्रा वैद्य, मंदा कांबळे, प्रेमलता रिंगणे, स्नेहलता कांबळे, प्रांजली भगत, छाया कांबळे, विमल मुन, रेखा भानसे, उज्वला वाघमारे, नम्रता भानसे, सीमा मगर, प्रगती दबडे, अर्चना थुल, आचल थुल, लक्ष्मा म्हैसकर, चंदा उमरे, शोभा बोरकर, हंसराज बोरकर, अॅड. नरेंद्र पाटील, करुणा शंभरकर, विद्या नाईक, रवी निखाते, संघरत्न रामटेके, मिलिंद ढाले, रंजनाताई ढाले, सागर थुल, सुहानी ढाले, मनोज राऊत, मनोहर गोसावी आदी मान्यवर उपस्थित होते.या किचन शेडमुळे विहारात होणाऱ्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना मोठी सोय होणार असून, समाजोपयोगी कार्याला चालना मिळेल, अशी भावना व्यक्त करण्यात आली. स्व. नामदेवराव ढाले यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार यावेळी ढाले परिवाराने व्यक्त केला.कार्यक्रमाचे संचालन सुनील ढाले यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनिल ढाले यांनी मानले. उपस्थितांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे कार्यक्रमाला भावनिक व प्रेरणादायी वातावरण लाभले.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

प्रो.नं.९८०/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.०४.०४.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय
किरकोळ अर्ज क्र./१५४/२०२६ दिनांक ०२.०५.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -** १. प्रवीण भाष्करराव साखरे
वय ३७ वर्षे, धंदा - शेती
२. चंद्रकांत भाष्करराव साखरे, वय ३४ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.गायवाडी, ता.दर्यापूर, जि.अमरावती

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **भाष्कर उर्फ भास्कर जगन्नाथ साखरे** हे दिनांक **०५.०२.२०२४** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **भाष्कर उर्फ भास्कर जगन्नाथ साखरे** यांचे नांवे (अ) मौजा गायवाडी, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेत गट नं.३७५/२, क्षेत्र १ हे.०५ आर, (ब) मौजा गायवाडी, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेत गट नं.३८०/१, क्षेत्र १ हे.५६ आर व पो.ख.० हे.०६ आर, (क) मौजा गायवाडी, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील नमुना ८-अ नुसार अनु.क.१२९, माल.क.१२९, एकुण क्षेत्र २१५४, (ड) मौजा दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील न.प.दर्यापूर हद्दीतील प्लॉट ज्याचा भूमापन नं. व उपविभाग १०८/१/अ/ब/४२, यात क्षेत्र १.१०.०० चौ.मी. येणे वर्णनांच्या ग्रामीण भागातील मालमत्ता असून नमुद मालमत्तेची अंदाजे किंमत रु.२०,०००/- एवढी आहे.

आज दि.**०४.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

# १६ सिलेंडर चोरीचा पर्दाफाश दोन सराईत ताब्यात

## -आरोपींकडून जनावर चोरीचेही गुन्हे निष्पन्न



अमरावती/प्रतिनिधीः- गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ट्रान्सपोर्ट नगर येथून १६ गॅस सिलेंडर चोरी झाल्याचा प्रकार उघडकीस आला असून, गुन्हे शाखेने या प्रकरणात दोन सराईत गुन्हेगारांना अटक करून मोठा खुलासा केला आहे. या कारवाईत चोरीचे सिलेंडर आणि गुन्ह्यात वापरलेली कार असा एकूण सुमारे ५ लाख ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.ही घटना ४ एप्रिल २०२६ रोजी ट्रान्सपोर्ट नगर परिसरात घडली होती. याबाबत फिर्यादी मोहम्मद साजीद मोहम्मद नासीर (वय ३६, रा. अकबर नगर, अमरावती) यांनी तक्रार दिली होती. त्यानुसार अज्ञात आरोपींविरुद्ध गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास सुरू असताना गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे आरोपी हे चपराशीपुरा परिसरात स्विफ्ट डिझायर कारमध्ये (एमएच ४० एससी ५१५८) १६ सिलेंडरसह थांबले असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी छापा टाकून दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले. त्यांची ओळख शेख अतीक शेख रऊफ (वय ३१, रा. बिस्मिल्ला नगर, अमरावती) आणि मोहम्मद कासीफ मोहम्मद अकबर (वय २३, रा. फिरदोश कॉलनी, अकोला, ह.मु. कारंजा, जि. वाशिम) अशी झाली. चौकशीत त्यांनी १६ सिलेंडर चोरीची कबुली दिली. पोलिसांनी घटनास्थळावरून चोरीचे सर्व १६ सिलेंडर आणि गुन्ह्यात वापरलेली कार जप्त केली आहे. तपासादरम्यान या आरोपींनी अमरावती शहर आयुक्तालय हद्दीत जनावर चोरीचेही गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यानुसार गाडगेनगर, बडनेरा आणि भातकुली पोलीस ठाण्यांतील तीन स्वतंत्र गुन्हे उघडकीस आले आहेत. एकूण चार गुन्ह्यांचा पर्दाफाश या कारवाईत करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ, शिवाजी बचाटे तसेच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पथकात पोलीस अधिकारी व अंमलदारांनी सहभाग घेतला.

**पाहिजे**

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
**--पत्ता--**
सी-१२, सातुर्णा,
एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड,
अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/
८००७३४२३३५

# वंचितने जिल्हाधिकारी कार्यालयावर पेटवली चूल

## गॅस टंचाई विरोधात सिलेंडर घेऊन निर्दशने



**अमरावती/प्रतिनिधीः-** इराण-इसराइल-अमेरिका यांच्यामध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशभरात गॅस टंचाई भासत आहे. सिलेंडरसाठी मारामारी सुरू आहे.अशात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आज सोमवार ६ एप्रिलला दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयावर चूल पेटवत सिलेंडर घेऊन आंदोलन करण्यात आले.

राज्यभरात गॅस टंचाई सुरू आहे. गॅसच्या कमतरतेमुळे दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे. हजारो छोट्या व्यवसायांनी आपली दुकाने बंद केले आहे. अनेक ठिकाणी चहा नाश्त्याचे पदार्थ इडली, डोसा, तळले जाणारे पदार्थाची विक्री बंद झाली आहे.

गॅस सिलेंडरसाठी होणारी कृत्रिम टंचाई थांबवावी, सिलेंडरचा काळाबाजार रोखवावा, २५ दिवसा नंतर गॅस मिळेल ही अट शिथिल करण्यात यावी, काळाबाजार करणाऱ्या लोकांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कम्युनिटी किचन सुरू करावे, ही परिस्थिती कधी सामान्य होईल हे सरकारने सांगावे, अनेक ठिकाणी केवायसी नाही म्हणून नागरिकांना गॅस सिलेंडर दिले जात नाही, अशा नागरिकांना तात्काळ गॅस सिलेंडर देण्यात यावा.

उज्वला योजना अंतर्गत किती लोकांना सिलेंडर दिले आहे त्याचे ऑडिट करावे या सह इतर मागण्यांसाठी जिल्हाध्यक्ष राहुल मेश्राम यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले.

# रेल्वेने कटून मजूराचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या अंजनगाव बारी येथील रेल्वे ट्रॅकवर ट्रेन ने कटून एका मजुराचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.

कांतीलाल उर्फ कांती किशन भील (वय ३१, हरीखेडा,भोपाळ, मध्य प्रदेश) असे मृतक मजुराचे नाव आहे. माहितीनुसार अंजनगाव बारी जोड रेल्वे ट्रॅकवर काम सुरू आहे. हे काम करण्यासाठी मध्य प्रदेश वरून पंधरा ते वीस मजूर आले आहे.

शनिवारी रात्री जेव्हा सर्व मुले स्वयंपाक करत होते त्यावेळी त्यांना जोरदार आवाज आला. त्यांनी जाऊन पाहिले तर कांतीलाल यांच्या शरिराचे ट्रेनमुळे तुकडे तुकडे झाले होते. त्यांच्या दारूचे नशेमध्ये असण्याची माहिती आहे. यावरून पोलीस तपास करत आहे. अचानक घडलेल्या या घटनेमुळे मजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-३, यांचे न्यायालय**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८५/२०२६
ने.ता.०५.०५.२०२६

**अर्जदार** - साई अजय पवार, वय १३ वर्षे, धंदा - शिक्षण
मार्फत अपाक आई शुभांगी अजय पवार, वय ४९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.गणेश नगर, सुतगिरणी नगर, अमरावती

**-- वि --**

**रिस्पांडंट - निरंक**

Application U/s 8(2) of Hindu Minority and Guardianship Act 1956 for Grant of Permission to Sale out Minor's Share in Properties.

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी अज्ञान पाल्याच्या नांवे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता विकण्याची परवानगी मिळण्याकरीता वि.जिल्हा न्यायाधीश-३, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन पुढीलप्रमाणे--

Description of Property

**A)** Agricultural field situated within the limit of M.N.C.Amravati, Mouja-Badnera, Pragane-Badnera, Tq. Dist. Amravati having its Bhumapan and Sub-Division No.44/1/17 Class-I total admeasuring 0.69.70 assessment of Rs.1.56.82 bounded as under
Towards East - Road Towards West - Agricultural field
Towards North- Open Plot No.3 Towards South - Open Plot No.5

**B)** Property situated within the limits of M.N.C.Amravati, Mouja Jewad, Pragane Badnera, Tq. Dist. Amravati out of Survey No.44(1), Layout converted vide Revenue case No.N.A.A.22/Jewad/2/72-73 order dated 05.10.1973, Plot No.17 having partitioned as east-west southern side having its area 25 ft.x 60 ft. total admeasuring 1500 Sq.ft. with construction of 1210 Sq.ft. which is bounded as under :-
Towards East - 5 Ft.Service Lane Towards West- Road
Towards North - Remaining portion of the same plot.
Towards South - Plot No.18

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द व मालमत्तेबाबत कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाचे असल्यास/अर्जदारांचे सर्व नातलग व हितसंबंधी आणि सर्वत्र लोकास जाहीर नोटीस देण्यात येते की, त्यांनी दि.०५.०५.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वि.जिल्हा न्यायाधीश-३, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हु अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०७.०४.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.६६३/२०२६
**ज्योती -विरुध्द- निरंक**
पुढील ता.१२.०६.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. ज्योती श्रीराम खेडकर, वय ५२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. धुर्वेश श्रीराम खेडकर, वय २० वर्षे, व्यवसाय - शिक्षण
सर्व रा.तक्षशीला महाविद्यालयासमोर श्याम नगर,अमरावती, ता.जि. अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत श्रीराम चंपतराव खेडकर** यांचे दिनांक **२२.०७.२०११** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार ज्योती व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **ज्योती व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०२.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४६४/२०२६
**श्रीमती ज्योती अधिक दोन -विरुध्द- निरंक**
पुढील ता.२१.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Shaikh Anis Shaikh Mubarak, Age 47 Yrs. Occu.: Household
2. Sharifa Bi Sheikh Ais, Age 25 Yrs. Occu.: Education
3. Firdous Jaha Shaikh Sohel, Age 19 Yrs. Occu.: Education

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत राजेंद्र रामकृष्ण मालवे** हे दिनांक 23.01.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **ज्योती अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **ज्योती अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २०९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

प्रो.क्र.३३७/२०२६
दि.२५.०३.२०२६

श्रीमती एस.बी.राठोड, सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती यांचे न्यायालय
आर.एम.जे.सी.क्र.११०/२०२६ ने.ता. ०७.०५.२०२६

**अर्जदार** - बाबुलाल रामचंद्र चंदनपत्री, वय ६२ वर्षे, धंदा - मजुरी
रा.काठीपुरा, अंजनगांव सुर्जी, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती
१. गंगाधर रामचंद्र चंदनपत्री, वय ५८ वर्षे, धंदा - नोकरी
रा.काठीपुरा, अंजनगांव सुर्जी, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती
२. जमना अशोकराव भावरेकर, वय ५८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.शितल किराणा दुकानाजवळ, शोभानगर, अमरावती, ता.जि.अमरावती
३. गंगा लक्ष्मीकांत बुंदेले, वय ५४ वर्षे, धंदा- घरकाम
रा.वल्लभनगर, अकोली रोड, नया अमरावती रेल्वे स्टेशनजवळ, अमरावती

**गैरअर्जदार-**

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार व गैरअर्जदाराचे वडील नामे **रामचंद्र जयसिंग चंदनपत्री** यांचा दिनांक **१६.०५.२०१९** रोजी मृत्यू झाला आहे तसेच अर्जदार व गैरअर्जदार यांची आई नामे **जानकीबाई रामचंद्र चंदनपत्री**, यांचा दिनांक **०४.११.२०२५ रोजी मृत्यू झाला आहे.** अर्जात नमुद केल्याप्रमाणे त्यांचे वारस खालीलप्रमाणे आहेत--

| अ.क्र. | वारसाचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १. | बाबुलाल रामचंद्र चंदनपत्री | ६२ वर्षे | मुलगा |
| २. | गंगाधर रामचंद्र चंदनपत्री | ५८ वर्षे | मुलगा |
| ३. | जमना अशोकराव भावरेकर | ५८ वर्षे | मुलगी |
| ४. | गंगा लक्ष्मीकांत बुंदेले | ५४ वर्षे | मुलगी |

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. **रामचंद्र जयसिंग चंदनपत्री** हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत रामचंद्र जयसिंग चंदनपत्री यांचे नांवे मौजा अंजनगांव सुर्जी, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती यांचे नावे येथील नझूल शिट नं.१७-सी, प्लॉट नं.९७ क्षेत्र ९४.०० चौ.मी. न.प.मालमत्ता क.४७० ही मिळकत आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून एक महिन्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरुन अर्जावर सुनावणी करुन अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २५/०३/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहायक अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, अंजनगांव सुर्जी**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६३५/२०२६
**सुनील -विरुध्द- निरंक**
पुढील ता.१०.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Sunil Ambadas Ingalkar, Age 467 Yrs. Occu.: Service
R/o Shaskiya Niwassthan No.16, Chinab Building, Nyayalayin Karmachari Wasahat, Kanta Nagar, Amravati
2. Sau.Ratnamala Gajanan Lavankar, Age 40 Yrs. Occu.: Household
R/o Pulgaon Road, Neri Punarvasan Arvi, Wardha
3. Smt. Jaya Anil Ingalkar, Age 42 Yrs. Occu.: Household
4. Pallavi Anil Ingalkar, Age 10 Yrs. Occu.: Student
No.3 & 4 R/o Malipura, Nandgaon Peth, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अंबादास पुंजाजी इंगळकर व शकुंतला अंबादास इंगळकर** हे अनुक्रमे दिनांक 03.12.2020 व 25.01.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुनील व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनील व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी सहन्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.९८/२०२६ ने.ता.२४.०४.२०२६

**अर्जदार :** १. दिनेश शिवाजीराव सुरजुसे,
रा.मंगरुळ चव्हाळा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. मधुकर शिवाजी सुरजुसे,
रा.गौतम नगर, कारंजा लाड, ता.कारंजा लाड, जि.वाशिम
३. दिवाकर शिवाजी सुरजुसे, रा.दिग्रस, ता.दिग्रस, जि.यवतमाळ
४. सुधाकरराव शिवाजीराव सुरजुसे,
रा.जनता कॉलनी नं.१, गोपाल नगर, अमरावती
५. निर्मलाबाई सुखदेव मोरे, रा.उंबर्डा बाजा, ता.कारंजा लाड, जि.वाशिम
६. मीरा गोविंदराव भारस्कर,
रा.वडगांव, पो.वडुरा, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** **निरंक**

ज्याअर्थी **मयत शिवाजी पुंजाजी सुरजुसे** यांचा मृत्यू दि.**११.०९.२०१५** रोजी मंगरुळ चव्हाळा, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ते ४ मुले, अ.नं.५ व ६ ह्या मुली आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०४ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-०५, यांचे न्यायालय**
M.A.C.P. M.A.N.R.J.I.No.139/2024 F.F. 28/04/2026

**पिटीशनर - प्रफुल सुधाकर मांडालकर व ईतर**
**-- वि --**
**रिस्पांडंट - गोपालसिंग फुलासिंग गौतम व ईतर**

Non-Applicant :- Gopalsingh Fulasing Gautam
R/o. At Post Rahatgaon, Amravati

APPLICATION U/SEC.166 OF MOTOR VEHICLE ACT 1988 FOR GRANT OF COMPENSATION

ज्याअर्थी वरील पिटीशनर प्रफुल सुधाकर मांडालकर, यांनी जिल्हा व सत्र न्यायालय-०५, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार गोपालसिंग फुलासिंग गौतम, यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक २८.०४.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-०५, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक / /२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
प्र.सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.२६२/२०२६ ने.ता.०५.०५.२०२६

**अर्जदार -** १. श्री.रमेश तंटी जाधव
वय ५२ वर्षे, धंदा - शेती
रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
ह.मु.रेडवा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार यांचे वडील **नामे तंटी रुपा उर्फ रुपू जाधव** हे दि.**०२.०१.२०१४** रोजी **रेडवा,** ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मयत झालेले अर्जदाराची आई **नामे सोमाली तंटी जाधव** ही दिनांक **२२.१०.१९७९** रोजी रेडवा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावलेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २१.०४.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**दिवाणी सहन्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.९४/२०२६ ने.ता.२४.०४.२०२६

**अर्जदार :** १. विठ्ठल पुंडलिक गावंडे
रा.वडाळा, पो.नांदसावंगी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. अवधुतराव पुंडलिकराव गावंडे
रा.नगराळे किराणा जवळ, संजय गांधी नगर नं.२,
पो.रुक्मिणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत कयनाबाई पुंडलिकराव गावंडे** यांचा मृत्यू दि.**१२.१२.२०१३** रोजी वडाळा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ व २ ही मुलं आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०४ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

**स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा**

दिनांक

आज दि.२६/१२/२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी**, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी**, यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **अब्दुल सलाम अब्दुल सत्तार** अर्जात नमूद जन्म दिनांक **३०.१२.२००५** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | | सही |
|---|---|---|
| १) | **सौ.पद्माताईसं.मेसकर (सरपंच)** | **सौ.पद्माताईसं.मेसकर (सरपंच)** |
| २) | **श्री.अतुल सा.दारोकर (उपसरपंच)** | **श्री.अतुल सा.दारोकर (उपसरपंच)** |
| ३) | **इजाजोद्दीन मोइनामदार (त.मु.अ.)** | **इजाजोद्दीन मोइनामदार (त.मु.अ.)** |
| ४) | **क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.)** | **क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.)** |
| ५) | **श्री.नंदकिशोर भि.वासनकर (ग्रा.पं.)** | **श्री.नंदकिशोर भि.वासनकर (ग्रा.पं.)** |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

## जाहीर नोटीस

सवत्र आम जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **श्री.पंकज कांताप्रसाद मिश्रा,** रा.शिक्षक कॉलनी, भक्तीधाम रोड, चांदूर बाजार, जि.अमरावती यांची खालील वर्णन केलेली मालकी हक्काची मिळकत (शेती) खरेदीखतान्वये विकत घेण्याचा व्यवहार केलेला असून त्या स्थावर मिळकतीचे (शेतीचे) वर्णन येणेप्रमाणे--

**स्थावर मालमत्तेचे वर्णन -** नोंदणी पोटतुकडी चांदूर बाजार शहर चे कक्षेतील मौजे-खेड भाग-२, जि.अमरावती येथील सर्व्हे नं./ गट नं.२५७/२/क, एकुण क्षेत्रफळ १ हे.८७ आर, पो.ख.० हे.०७ आर यापैकी मालकीची व ताब्यातील १ हे.१४ आर + पो.ख.० हे.०७ आर, आ.रु.५.००, भो.वर्ग-१, याची चतुःसिमा पुढीलप्रमाणे--
पुर्वेस - नांद्रेकर यांचे शेत
पश्चिमेस - नांद्रेकरे यांचे शेत
उत्तरेस - सरकारी रस्ता
दक्षिणेस - ई-क्लास पडीत

तरी वर उल्लेखीत मिळकत (शेती) खरेदी खताद्वारे, बक्षीसपत्राद्वारे, भाडे पट्टयाद्वारे, वारसा हक्काने, विनिमयाने, कर्जाद्वारे, गहाणाद्वारे, बोझाद्वारे, धारणाधिकारने, वहिवाटीद्वारे, जप्तीद्वारे, लिलावाद्वारे, ताबा, हक्क, संबंध, बक्षीस, कूळ, वारसाचा वाद असल्यास योग्य त्या मूळ दस्तासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर जाहीर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी उजर कळवावा. अन्यथा माझे पक्षकार सदर मिळकतीचे (शेतीचे) खरेदीखत नोंदवून घेण्यास सक्षम व पात्र राहतील व तसेच तद्नंतर येणाऱ्या उजर व आक्षेपास गृहित धरल्या जाणार नाही, करीता ही जाहीर नोटीस प्रकाशित करीत आहे.

**दिनांक ०६.०४.२०२६**

(ॲड.राहुल अ.देशमुख)
MAH/2065/2001
पत्ता-प्रल्हादलीला-३९, गोपाल नगर
बडनेरा रोड, अमरावती
मो.९८२३६६०३५२

**दिवाणी सहन्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.१०४/२०२६ ने.ता.१६०४.२०२६
वनमाला विघे अधिक चार - विरुध्द - किशोर गौरखेडे

**अर्जदार :** १. सुशिला उर्फ वनमाला रामेश्वर विघे,
रा.नया अकोला, जि.अमरावती
२. पुष्पलता प्रभाकरराव ठाकरे,
रा.मंगरुळ दस्तगीर, ता.धामणगांव रेल्वे
३. मंगला रमेश राऊत,
रा.यशोदा नगर, ता.जि.अमरावती
४. उज्वला संजय इंगोले,
रा.शिवार्पण कॉलनी, व्हीएमव्ही रोड, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** १. किशोर दिगांबर गौरखेडे,
रा.शिवणी रसुलापूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

ज्याअर्थी **मयत दिगांबर अथुजी गौरखेडे** यांचा मृत्यू दि.**२४.०४.२०११** रोजी तसेच त्यांची पत्नी नामे **मंदाकिनी दिगांबर गौरखेडे** यांचा मृत्यू दि.**०२.०४.२०१३ रोजी** शिवणी रसुलापूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ते ४ ह्या विवाहित मुली आहेत व गैरअर्जदार नं.१ हा मुलगा आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०४ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### शकील खान यांचा सन्मान

**अमरावती**-श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचालित, वीर वामनराव जोशी प्राथमिक शाळेत संस्थेचे प्रधानसचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य व शालेय समिती अध्यक्षा डॉ. माधुरी चेंडके यांच्या मार्गदर्शनात शाळेत विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते.शाळेत आयोजित करण्यात आलेल्या रमजान ईद स्नेह मिलन सोहळ्यात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी समर्पित असणारे ऑटो चालक शकील खान सलीम खान यांचा शाळेचे मुख्याध्यापक दिलीप सदार यांचे हस्ते शाल व प्राचार्य डॉ. सुभाष गवई लिखित 'गोविंदभाई कहीन' हे पुस्तक प्रदान करून सर्व कर्मचारी व पालकांच्या उपस्थितीत त्यांचा यथोचित सन्मान व सत्कार करण्यात आला.मागील सात वर्षांपासून शाळेच्या विद्यार्थ्यांची उत्तम प्रकारे ने-आण करून शाळेला सहकार्य करणाऱ्या शकील खान यांच्या कार्याची दखल घेत त्यांचा सन्मान व सत्कार करून त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्वांनी त्यांच्या प्रामाणिक सेवाभावाचे विशेष कौतुक केले.यावेळी शाळेच्या मोनिका पाटील, ज्योती मडावी, सुजित खोजरे, आसावरी सोवळे, सचिन वंदे, मनीषा श्रीराव, विलास देठे, अमोल पाचपोर इत्यादी कर्मचाऱ्यांसह पालकांची व विद्यार्थ्यांची भरगच्च उपस्थिती होती.

### २१ ला प्रबोधनाची मेजवानी

**बडनेरा**-बडनेरा येथील नवी वस्ती परिसरातील समता चौकात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त २१ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता आयोजित करण्यात येत आहे. प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.सत्यपाल महाराज यांचे शिष्य तसेच इंजिनियर पवन दवंडे हे ओजस्वी शैलीतून उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. हा कार्यक्रम विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. यशस्वीतेसाठी समितीचे लईक पटेल, अध्यक्ष मनोज गजभिये, सचिव सिद्धार्थ बनसोड, उपाध्यक्ष अशोक नंदागवळी यांच्यासह सदस्य सुनील इंगोले, मच्छिंद्र भटकर, पप्पू गडलिंग आदी कार्यकर्ते उपस्थित.

### गॅस टंचाईच्या विरोधात चुलीवर भाकरी करून वंचित बहुजन आघाडीचे आंदोलन

# तहसीलदारांना दिली भाकरी व कांदा भेट

**तिवसा/ वार्ताहर**

'नरेंदर कब मिलेगा सिलेंडर' अशा आक्रोशपूर्ण घोषणा देत चुलीवर भाकरी करून प्रशासन तथा शासनाचे लक्ष वेधण्यासाठी गॅस टंचाईच्या विरोधात वंचित बहुजन आघाडीचे वतीने तिवसा तहसील कार्यालयावर तीव्र आंदोलन करण्यात आले.

काही दिवसांपूर्वी वंचित बहुजन आघाडीचे माजी सरपंच शंकरराव शिरसाट हे गॅस मिळण्यासाठी रांगेत उभे असताना त्यांचा मृत्यू झाला होता तसेच अमरावती जिल्ह्यात रिद्धपूर येथे सुद्धा एका तरुणाचा मृत्यू झाला होता.गॅस च्या तुटवड्यामुळे स्वयंपाक घरातील गॅस बंद झाला आहे, चहा टपरी, छोटे व्यावसायिकांनी आपले दुकान बंद केले आहे. मेस मध्ये गॅस नसल्याने अनेक विद्यार्थी शहरातून गावाकडे परत आले आहे, अनेक





ठिकाणी वाढीव दराने सिलेंडर विक्री सुरू असून त्याचा थेट परिणाम जनतेच्या खिशावर होत आहे, या ज्वलंत प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी राजव्यापी आंदोलनाची हाक दिली होती, प्रतिसाद म्हणून तिवसा तालुका वंचित बहुजन आघाडीचे वतीने तहसील कार्यालयासमोर चुलीवर भाकरी करून तहसीलदारांना भाकर व कांदा भेट देण्यात आला.

याप्रसंगी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा महासचिव सागर भवते यांनी नायब तहसीलदार यांचे समोर तालुक्यात होत असलेल्या सिलेंडरचा टंचाई व काळाबाजार होत असल्याबाबत यावर कारवाई करून सर्वसामान्य जनतेला दिलासा द्यावा अशी मागणी केली.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष दादाराव गडलिंग, युवा आघाडी जिल्हा महासचिव सागर भवते, जिल्हा सदस्य प्रमोद मुंद्रे, विनोद खाकसे, मुस्ताक शहा, डॉ धर्मेंद्र दवाले, सिद्धार्थ कटरने, प्रवीण निकाळजे, अनिल सोनोने, नितीन थोरात, अवधूत सोनाने, मिलिंद खाकसे, अनिल गाडगे, रूपाली मुंद्रे शांता कापसे, सोनाली पाटील, नलिनी अढाऊ, अलका कापसे, सुमन हेंडवे, वंदना कापसे, दुर्गा अढाऊ, वंदना कापसे, सविता दहाट, अनिता ढोके, राजकन्या ससाणे सह वंचित बहुजन आघाडी, युवा आघाडी, महिला आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पीडीएमसी येथील जागतिक क्षयरोग दिना निमित्त 'सीएमई'चे आयोजन

**अमरावती/ का.प्र.**

जागतिक क्षयरोग दिनाचे औचित्य साधून, अमरावती येथील डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय (PDMMC) येथे 'कंटिन्युइंग मेडिकल एज्युकेशन' (CME) कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सूक्ष्मजीवशास्त्र (Microbiology) आणि श्वसनविकारशास्त्र (Respiratory Medicine) विभागांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश क्षयरोगाचे निदान, उपचार आणि प्रतिबंध यां मधील अद्ययावत घडामोडींबाबत वैद्यकीय व्यावसायिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा होता.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सन्माननीय अधिष्ठाता डॉ. ए. टी. देशमुख, डॉ. पी. आर. भिसे, डॉ. फिरोज खान (CTO), डॉ. रोहणकर, डॉ. गौरव दुबे आणि डॉ. रघुवंशी



(MO) यांची प्रमुख उपस्थिती होती. अधिष्ठाता डॉ. ए. टी. देशमुख यांनी सत्राचे उद्घाटन केले आणि भारता समोरील सार्वजनिक आरोग्याचे मोठे आव्हान असलेल्या क्षयरोगा विरुद्ध लढण्यासाठी सातत्यपूर्ण वैद्यकीय शिक्षणाच्या महत्त्वावर भर दिला. डॉ. पी. आर. भिसे यांनी 'क्षयरोगाचे प्रयोगशाळा निदान: मूलभूत ते अद्ययावत तंत्रज्ञान' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. सुषमा पांडे यांनी 'ब्रथ ऑफ लाईफ - पल्मोनरी पॅथोफिजियोलॉजी' या विषयावर अभ्यास पूर्ण मांडणी केली. डॉ. आशिष साबू क्षयरोग रुग्णांना सहन करावा लागणारा मानसिक भार आणि सर्वांगीण उपचारांचे (Holistic Care) महत्त्व यावर प्रकाश टाकला. डॉ. परीक्षित ठाकरे यांनी 'क्षयरोगातीलटीपीटी' (TPT) या विषयावर सत्र घेतले. डॉ. अजय जावरकर (प्राध्यापक व विभागप्रमुख, समुदाय औषधशास्त्र): 'क्षयरोग निर्मूलन आराखडा-२०२६' सादर केला. डॉ.आकांक्षा चौधरी यांनी क्षयरोग निदानातील उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि भविष्य' या विषयावरील व्याख्यानाने कार्यक्रमाचा समारोप केला कार्यक्रमाच्या शेवटी आभार मानण्यात आले.

या 'सीएमई'ने ज्ञान देवाणघेवाणीसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आणि क्षयरोग निर्मूलनाप्रतीसंस्थेची कटिबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित केली.

## शुक्रवारी गझलनवाज भीमराव पांचाळे यांचा नागरी सत्कार आणि गझल मैफिल

**अमरावती / वार्ताहर**

मराठी गझल सातासमुद्रापार पोहोचवणारे ज्येष्ठ गझलनवाज भीमराव पांचाळे यांच्या गझलगायकीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा सपत्नीक जाहीर नागरी सत्कार व गझल मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच भीमराव पांचाळे यांची पुस्तक तुला करण्यात येणार आहे, हा विशेष कार्यक्रम इलेक्ट्रॉनिक मीडिया असोसिएशन अमरावती यांच्या वतीने १० एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. या संदर्भात ६ मार्च रोजी पत्रकार परिषद घेण्यात आली.

या पत्रकार परिषदेमध्ये इलेक्ट्रॉनिक असोसिएशनचे अध्यक्ष नितेश राऊत यांनी



कार्यक्रमाबद्दल सविस्तर माहिती दिली. १० एप्रिल रोजी होणाऱ्या कार्यक्रमासाठी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे राहणार आहेत. उद्घाटन अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते होणार असून, इलेक्ट्रॉनिक मीडिया असोसिएशनचे अध्यक्ष नितेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्यास विविध पक्षांचे लोकप्रतिनिधी आणि मान्यवर उपस्थित राहणार आहेत. खासदार अनिल बोंडे, लोकसभा खा. बळवंत वानखडे, आ. सुलभा खोडके, संजय खोडके, रवी राणा, प्रताप अडसड,केवलराम काळे, प्रवीण तायडे,उमेश यावलकर, प्रहार पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू, यशोमती ठाकूर, नवनीत राणा तसेच प्रवीण पोटे, हेमंत काळमेघ, गुणवंत देवपारे यांची उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय विभागीय आयुक्त नयना गुंडे, पोलिस आयुक्त राकेश ओला, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलीस अधीक्षक विशाल आनंद आणि अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांचीदेखील प्रमुख उपस्थिती राहणार आहे. त्यांच्या या प्रदीर्घ आणि समृद्ध कलाप्रवासाचा गौरव करण्यासाठी अमरावतीत हा विशेष सोहळा रंगणार आहे. सत्कार समारंभानंतर लगेचच भीमराव दादा पांचाळे यांच्या बहारदार गझल मैफिलीला प्रारंभ होणार आहे. त्यांच्या लोकप्रिय आणि हृदयस्पर्शी गझलांचा आस्वाद घेण्याची संधी अमरावतीकरांना या निमित्ताने मिळणार आहे. विशेष म्हणजे हा कार्यक्रम सर्वांसाठी निशुल्क खुला असून, रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. या पत्रकार उपाध्यक्ष स्वप्निल उमप, सचिव सुरज दहाट, अमोल देशमुख, अनिरुद्ध दवाळे, ज्येष्ठ पत्रकार यशपाल वरठे,संजय शेंडे, सुरेंद्र आकोडे,अमर घटारे,छगन जाधव,शुभम बायस्कर, अनिकेत दहातोंडे उपस्थिती होते.

## आयआयएमसीत मराठी पत्रकारिता प्रवेश प्रक्रिया सुरू

### १० मे पर्यंत करू शकतात अर्ज

**अमरावती/ का.प्र.**

भारतीय जन संचार संस्थान (आयआयएमसी) मध्ये मराठी पत्रकारिता डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक सत्र २०२६-२७ करीता प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १० मे २०२६ असून प्रवेश अर्ज गूगल फॉर्म द्वारे किंवा आयआयएमसीच्या अमरावती कार्यालयात भरता येईल.

मराठी पत्रकारितेत पी. जी. डिप्लोमा एक वर्षाचा अभ्यासक्रम असून तो पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पत्रकारिता आणि मीडियाच्या क्षेत्रातील रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहे. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची सामायिक चाचणी परीक्षा (CET) घेण्यात येणार आहे. ही परीक्षा ५ जून रोजी भारतीय जन संचार संस्थानच्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरातील पश्चिम क्षेत्रीय केंद्रावर आयोजित करण्यात येणार आहे.

त्याचबरोबर पुणे आणि मुंबई येथे देखील परीक्षा केंद्र असेल. मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेतील पदवी प्राप्त विद्यार्थी मराठी पत्रकारिता अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अर्ज करू शकतात.जे विद्यार्थी त्यांच्या बॅचलर पदवीच्या अंतिम वर्षात किंवा सेमिस्टर परीक्षेत बसले आहेत किंवा जे विद्यार्थी परीक्षा देणार आहेत ते देखील अर्ज करण्यास पात्र आहेत. प्रवेश करीता वयोमर्यादेची अट असून अनारक्षित प्रवार्गासाठी २५ वर्ष,




ओबीसी करीता २८ वर्ष तर अनुसूचित जाती / जमाती आणि दिव्यांग उमेदवारा करीता ३० वर्ष आहे.इच्छुक उमेदवारांनी प्रवेश अर्ज व गूगल फॉर्म लिंक करीता आयआयएमसीच्या अधिकृत वेबसाइट https://iimc.gov.in/language-courses-२६-२७ वर संपर्क करावा. प्रवेश प्रक्रिया संबंधी अधिक माहितीसाठी किंवा अडचणी संदर्भात डॉ. राजेश सिंह कुशवाहा (९४१५८६२३७७), डॉ. विनोद निताळे (९८६००४६७०६), जयंत सोनोने (७०३००५००४५) यांच्याशी दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधावा.

विद्यार्थ्यांना व्हॉट्सॲपद्वारे माहिती मिळवायची असल्यास सदर मोबाईल क्रमांकावर संदेश पाठवू शकतात, अशी माहिती संस्थानचे क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा यांनी दिली आहे.

### आरोग्यम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलतर्फे

## आरोग्य निदान व तपासणी शिबीर उत्साहात



**अमरावती/ का.प्र.**

आधुनिक युगात वाढत्या आजारांच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्यांना सुलभ, दर्जेदार व वेळेवर आरोग्य सेवा मिळावी, या उद्देशाने आरोग्यम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च व ओलावा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गानूवाडी परिसरातील श्री हनुमान मंदिर येथे भव्य आरोग्य निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले.

एमआयडीसी हायवे परिसरातील नागरिकांसाठी 'डॉक्टर आपल्या दारी' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवत सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत चाललेल्या या शिबिरात परिसरातील तब्बल १३० पेक्षा अधिक कुटुंबांनी सहभाग घेत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. शुगर, बीपी, हाडांचे विकार, डोळ्यांचे आजार, महिलांचे आजार, बालरोग अशा विविध आजारांवर तज्ञ डॉक्टरांनी तपासणी करून आवश्यक औषधोपचारही दिले.या शिबिराला आरोग्यम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल चे ख्यातनाम तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती लाभली. त्यामध्ये डॉ. रोहित हातगावकर, स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ डॉ. उर्वशी हातगावकर, अस्थिरोग तज्ञ डॉ. अक्षय हटवारे, नेत्ररोग तज्ञ डॉ. राजश्री हटवारे, आहारतज्ञ डॉ. ऋतुजा शिंगरूप आणि बालरोग तज्ञ डॉ. चेतन चव्हाण यांनी नागरिकांना आरोग्य विषयक तपासणी व उपचारपर मार्गदर्शन केले.आरोग्यम हॉस्पिटल व ओलावा फाउंडेशन द्वारे 'डॉक्टर आपल्या दारी' या उपक्रमातून गानूवाडी परिसरातील नागरिकांना आरोग्याचा अमूल्य मंत्र मिळाला असून, आरोग्यदायी समाजाच्या दिशेने एक प्रभावी पाऊल असल्याचे समाधान गानुवाडी परिसरातील नागरिकांना व्यक्त केले.

## गुरुवारला शिक्षक समिती शाखा धामणगावचे त्रैवार्षिक अधिवेशन

**अमरावती/ धामणगाव रेल्वे**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, शाखा धामणगाव रेल्वे च्या वतीने दि. ०९ एप्रिल गुरुवारला दुपारी २:०० वाजता धामणगाव रेल्वे शाखेचे त्रैवार्षिक अधिवेशन लोया भवन,जुना धामणगाव येथे आयोजित केलेले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षक समितीचे जिल्हा नेते तथा शिक्षक सहकारी बँकेचे अध्यक्ष गोकुलदास राऊत तर कार्यक्रमाचे उद्घाटक जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार यांच्या हस्ते होणार असुन यावेळी विशेष सत्कारमुर्ती राज्याध्यक्ष विजय कोंबे हे उपस्थित राहणार आहे.

प्रमुख पाहुणे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर, राज्य महीला प्रतिनिधी प्रवीणा कोल्हे, जिल्हा सल्लागार शिक्षक समिती संभाजी रेवाळे, गटविकाअधिकारी डॉ. प्रफुल्ल भोरखडे, जिल्हा सरचिटणीस शैलेन्द्र दहातोंडे, स.गट विकास अधिकारी योगेश वानखडे, गटशिक्षण अधिकारी संदीप बोडखे, सारिता काठोळे (जिल्हाध्यक्षा महिला आघाडी), विनिता घुलक्षे (जिल्हा सरचिटणीस महिला आघाडी) आल्हाद तराळ (जिल्हा अध्यक्ष, म.रा.प्रा.शि. समिती डीसीपीएस सेल) प्रेमसुख ठोंबरे (सरचिटणीस, म.रा.प्रा.शि. समिती डीसीपीएस सेल) सत्कार मुर्ती सेवानिवृत्त शिक्षक, अधिकारी व कर्मचारी वर्ग धामणगाव रेल्वे उपस्थित राहणार आहे.

या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन तालुकाध्यक्ष योगिराज मोहोड, सरचिटणीस विवेक ठाकरे, कार्याधौयक्ष विक्रांत टेकाडे, कोषाध्यक्ष अजय बावणे, रूपाली देशमुख महिला आघाडी अध्यक्षा, सविता सुपटकर, करूणा भबूतकर, कार्याध्यक्ष, अर्चना आसोले, सुरेश मनोहरे, तेजेश राठोड, धिरज देशमुख, प्रविण मडावी, मार्गदर्शक विजय केने, शरद थोटे, केशव पोटे, ओमप्रकाश धनस्कर, रामेश्वर गावंडे समस्त महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिति परिवार धामणगाव रेल्वे यांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांना अग्निशमनचे धडे

**अमरावती** - महापालिका अग्निशमन विभागाच्यावतीने ज्ञानमाता हायस्कूल येथे विद्यार्थ्यांना अग्निशमनचे धडे देण्यात आले.मुख्य अग्निशमन अधिकारी दिनेश हंबर्डे, अग्निशमन अधिकारी अजय पंधरे यांच्या आदेशानुसार, फायर प्रात्यक्षिक करण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक फादर आरोक्य सामी उपस्थित होते. दरम्यान केंद्रप्रमुख प्रेमानंद सोनकांबळे व पाळी प्रमुख मनोज इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशमन वाहनांचे प्रात्यक्षिक झाले. फायरमन अमोल साळुंके, फायरमन योगेश सावळे, वाहन चालक शेख तोसीफ यांनी आग म्हणजे काय, आगीचे वर्गीकरण, आग विझवण्याच्या पद्धती, एलपीजी गॅस लिकेज लागल्यावर काय केले पाहिजे व काय करू नये या विषयांवर प्रात्यक्षिक व जनजागृती केली.

एलपीजी गॅस सिलेंडर आग लागल्यास आपत्कालीन परिस्थितीमध्ये अग्निशमन दलाशी कशा प्रकारे संपर्क साधावा, आगीत किंवा धुरात अडकलेल्या नागरिकांचे सुटका करण्याच्या पद्धती विद्यार्थ्यांना सांगण्यात आल्या.

# गॅस एजन्सीची मागणी जोर, शहरी केंद्रांवरील गर्दी वाढली

**आसेगाव पूर्णा / वार्ताहर**

आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशभरात पेट्रोल व घरगुती गॅस सिलेंडरचा तुटवडा जाणवत असून त्याचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागाला बसत आहे. आसेगाव पूर्णा सारख्या मोठ्या लोकवस्तीच्या गावात गॅस एजन्सी नसल्यामुळे नागरिकांना सिलेंडरसाठी शहरी भागात जावे लागत आहे.

यामुळे शहरातील गॅस एजन्सी केंद्रांवर ग्राहकांच्या लांबच लांब रांगा लागत असून वेळ आणि पैशांचा मोठा अपव्यय होत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक व शेतकरी वर्गाला याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.ग्रामीण भागात गॅस एजन्सी नसल्यामुळे वितरण व्यवस्थेवर ताण वाढत असून गर्दी नियंत्रण करणे कठीण होत आहे. त्यामुळे आसेगावसारख्या ठिकाणी स्वतंत्र गॅस एजन्सी सुरू केल्यास नागरिकांची गैरसोय मोठ्या प्रमाणात दूर होईल आणि शहरी भागावरील ताणही कमी होईल, असे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

आसेगाव पूर्णा हे अमरावती– परतवाडा महामार्गावर वसलेले असून अमरावती, परतवाडा, चांदूरबाजार व दर्यापूर या चार



शहरांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या चौफुलीवर आहे. त्यामुळे हे गाव परिसरातील सुमारे २५ गावांचे केंद्रबिंदू ठरले आहे. शैक्षणिक, आरोग्य व दैनंदिन कामांसाठी नागरिकांना नेहमीच येथे ये-जा करावी लागते. तसेच आठवडी बाजारासाठीही मोठ्या प्रमाणावर नागरिक येथे येतात.मात्र, येथे गॅस एजन्सी नसल्यामुळे नागरिकांना अमरावती, परतवाडा किंवा चांदूरबाजार येथे जाऊन सिलेंडर घ्यावा लागतो. यामुळे वेळ व पैशांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागतो. आसेगाव पूर्णा येथे भारत, इंडियन किंवा एचपी गॅस कंपनीचे अधिकृत केंद्र सुरू झाल्यास परिसरातील शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय दूर होऊन त्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

'आम्हाला गॅस सिलेंडरसाठी वारंवार शहरात जावे लागते. त्यामुळे वेळ आणि पैशांचा मोठा अपव्यय होतो. घरकाम, लहान मुलं आणि शेती यामध्ये समतोल राखताना अडचणी येतात. आसेगावमध्येच गॅस एजन्सी सुरू झाली तर मोठा दिलासा मिळेल.'

**आशा गोटे,** गृहिणी, आसेगाव पूर्णा

'आसेगावसारख्या मोठ्या गावात गॅस एजन्सी नसणे ही गंभीर बाब आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना मूलभूत सुविधा मिळणे आवश्यक आहे. शासनाने तातडीने लक्ष देऊन येथे गॅस एजन्सी मंजूर करावी. यासाठी आम्ही पाठपुरावा करणार आहोत.'

**सुनीता शिरभाते,** माजी पंचायत समिती सदस्य, चांदूरबाजार

